

वडाळीभोईस विठ्ठल मंदिर प्राणप्रतिष्ठा../६

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

अमेरिका, युरोपला उच्चांकी निर्यात ../६



■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८५ ■ अंक : २१४ ■ नाशिक, शनिवार, दि. २७ एप्रिल २०२४ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा


## महत्त्वाचे

### भारतीय विद्यार्थिनीला अमेरिकेत अटक

**नवी दिल्ली :** कॅम्पस परिसरात अनधिकृत विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखालील पॅलेस्टाइन समर्थक आंदोलनात भाग घेतल्याबद्दल भारतीय वंशाची विद्यार्थिनी अचिंथ्य शिवलिंगम हिला अमेरिकेतील प्रिन्स्टन विद्यापीठातून अटक करण्यात आली आहे. तिच्यावर आता शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे. गाझामधील इस्रायल-हमास युद्धाविरुद्ध यूएसमधील प्रमुख विद्यापीठांमध्ये सतत निषेध सुरू असताना हा प्रकार घडला आहे. तमिळनाडूतील कोईम्बतूर येथे जन्मलेल्या आणि कोलंबस, ओहायो येथे राहिलेल्या शिवलिंगमला गुरुवारी दुसऱ्या सहकारी विद्यार्थी हसन सय्यदसह अटक करण्यात आली.

### वंदे भारत, तेजस एक्स्प्रेस पावसाळ्यात रद्द?

**नवी दिल्ली :** यंदा कोकण रेल्वे मार्गावरील मान्सून वेळापत्रकाची नोंद प्रवासी आरक्षण प्रणालीत न केल्यामुळे बुकिंग पोर्टलवर वंदे भारत, तेजस एक्स्प्रेससारख्या गाड्या १० जून २०२४ पासून रद्द, असा संदेश दाखवत आहे. त्यामुळे प्रवाशांमध्ये गोंधळ उडालेला आहे. सध्या पावसाळी वेळापत्रक सुरू होण्याआधीच रेल्वे प्रवाशांना बसत असून, मान्सून वेळापत्रकाची नोंद प्रवासी आरक्षण प्रणालीत न केल्यामुळे बुकिंग पोर्टलवर १० जूनपासून वंदे भारत, तेजस एक्स्प्रेससारख्या वेगवान आणि सर्वाधिक पसंतीच्या गाड्या दिसत नाहीत. यामुळे या गाड्या रेल्वे प्रशासनाने रद्द केल्या की काय, असा सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

### काश्मीरच्या सोपोरमध्ये २ दहशतवादी ठार

**श्रीनगर :** उत्तर काश्मीरमधील सोपोरमध्ये शुक्रवारी सुरक्षा दलांनी दोन दहशतवाद्यांचा खात्मा केला. सुरक्षा दलांनी गुरुवारी येथे कारवाई सुरू केली. दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत दोन जवान जखमी झाले आहेत. यावेळी एका नागरिकाच्या खांद्यावर गोळी लागली. त्याला जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले, तेथून त्याला श्रीनगरला रेफर करण्यात आले. नौपोरा भागात एका घरात दहशतवादी लपल्याची माहिती मिळाली होती. सुरक्षा दलांनी तेथे नाकाबंदी केली. दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार केला आणि तेथे चकमक सुरू झाली. गुरुवारी रात्री अंधार पडल्याने कारवाई थांबवण्यात आली. काल सकाळी पुन्हा गोळीबार सुरू झाला, ज्यामध्ये दोन दहशतवादी मारले गेले.

### लग्नात सिलिंडरचा स्फोट, ६ जणांचा मृत्यू

**दरभंगा :** दरभंगा येथे लग्नादरम्यान सिलिंडरचा स्फोट झाल्याने सहा जणांचा मृत्यू झाला आहे. गुरुवारी रात्री ११ वाजेनंतर हा अपघात झाला. गावातील लोकांनी सांगितले की, छगन पासवान यांच्या मुलीचे लग्न होते. शेजारील रामचंद्र पासवान यांच्या निवासी संकुलात लग्नाची मिरवणूक काढण्यात आली होती. यावेळी लग्नाच्या मिरवणुकीत फटाके फोडण्यात आले. फटाक्यांच्या ठिणग्यांमुळे मंडपात आग लागली. जवळच अन्न शिजवले जात होते. काही वेळातच आग सिलिंडरपर्यंत पोहोचली. सिलिंडरला आग लागताच त्याचा स्फोट झाला. अपघातानंतर वधू-वरांना जवळच्या मंदिरात नेण्यात आले. तिथे दोघांनी लग्न केले.

### रवी किशनला न्यायालयाचा दिलासा

**नवी दिल्ली :** अभिनेते आणि भाजप खासदार रवी किशन यांना दिंडोशी न्यायालयाकडून दिलासा मिळाला आहे. २५ वर्षीय महिलेने रवी किशन यांची डीएनए चाचणी करण्याची मागणी केली होती, मात्र न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली आहे. मुंबईतील रहिवासी असलेल्या अपर्णा सोनी यांनी न्यायालयात धाव घेत असा दावा केला की, रवी किशन यांच्यापासून त्यांना शिनोवा नावाची मुलगी झाली आहे. रवी किशन यांना आपली मुलगी काका म्हणते, मात्र रवी किशन हेच तिचे बायलॉजिकल वडील आहेत. रवी किशन यांची बाजू मांडणारे वकील अमित मेहता यांनी हा दावा फेटाळून लावत त्यांच्या अशिलाचा अपर्णा सोनी यांच्याशी काहीही संबंध नसल्याचा युक्तिवाद केला.

# व्हीव्हीपॅट पत्रिकांची मतमोजणीही नाही, सुप्रीम कोर्टाचा निर्णय




**नवी दिल्ली :**

सर्वोच्च न्यायालयाने बॅलेट पेपरबाबतच्या सर्व याचिका फेटाळल्या आहेत. त्यामुळे इव्हीएम मशीनवरतीच निवडणुका होणार आहेत, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

मतदान यंत्रातील मतांची आणि व्हीव्हीपॅट पत्रिकांच्या १०० टक्के पडताळणीसंदर्भातल्या सर्व याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावल्या आहेत. त्यामुळे आता यापुढील निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्यात येणार नसून, या मतदान यंत्रावरच होतील. सर्वोच्च न्यायालयाने इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनमधील मतांची आणि व्होटर व्हेरिफायबल पेपर ऑडिट ट्रेल पत्रिकांची १०० टक्के पडताळणीची मागणी करणाऱ्या सर्व याचिका फेटाळून लावल्या आहेत. त्यामुळे बॅलेट पेपरवर मतदान होणार नसल्याचं स्पष्ट झालं आहे.

सर्वोच्च न्यायालयाने बॅलेट पेपरबाबतच्या सर्व याचिका फेटाळल्या आहेत. त्यामुळे आता निवडणुका ईव्हीएमवरच होणार आहेत, असं सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. काल सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या सर्व याचिकांवर सुनावणी सुरू होती. ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटच्या १०० टक्के मोजणीसाठी सुप्रीम कोर्टात दाखल केलेल्या याचिकेवर काल निकाल देण्यात आला आहे. नेहा राठी, अरुण कुमार अग्रवाल यांनी वकील प्रशांत भूषण यांच्यामार्फत /-...४

### पडताळणी सात दिवसांच्या आत

निकालाच्या ७ दिवसांच्या आत उमेदवार पुन्हा पडताळणीची मागणी करू शकतात. मात्र, या सगळ्याचा खर्च उमेदवाराला करावा लागणार असल्याचं न्यायालयाने सुनावणीमध्ये सांगितलं आहे. यावेळी हा निकाल आम्ही दोन्ही न्यायमूर्ती एकमताने देत आहोत, असं देखील न्यायमूर्तींनी न्यायालयात सुनावणीवेळी सांगितलं आहे.

# राज्यात 53.71 टक्के मतदान

### देशात सरासरी ६४.७० टक्के अनेक ठिकाणी ईव्हीएम पडले बंद

**मुंबई :**

देशभरातील ८८ मतदारसंघांत काल दुसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडले. या सर्व मतदारसंघांमध्ये मतदानाची वेळ संपेपर्यंत अर्थात संध्याकाळी सहा वाजेपर्यंत सरासरी ६४.७० टक्के मतदान झालं. तर यांपैकी महाराष्ट्रात आठ मतदारसंघांत ५३.७१ टक्के मतदान झालं. यामध्ये वर्धा लोकसभा मतदारसंघात सर्वाधिक ५६.६६ टक्के मतदानाची नोंद झाली. निवडणूक आयागानं ही आकडेवारी जाहीर केली आहे.

देशातील १३ राज्यांमध्ये एकूण ८९ मतदारसंघांत दुसऱ्या टप्प्यातील मतदान शुक्रवारी २६ एप्रिल रोजी पार पडलं. यासाठी १६ कोटी मतदार पात्र होते, पण त्यांपैकी सुमारे ९ कोटी मतदारांनीच मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये ९ मतदारसंघ हे अनुसूचित जातीसाठी तर ७ मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी राखीव होते.

यामध्ये केरळमधील सर्व २० मतदारसंघांतील मतदान पूर्ण झालं आहे. तर महाराष्ट्रातील १३ मतदारसंघांतील मतदान संपलं. त्याचबरोबर दुसऱ्या टप्प्यात आसाममधील ५, बिहारमधील ५, छत्तीसगडमधील ३, कर्नाटकातील १४, मध्य प्रदेशातील ७, महाराष्ट्रात ८, मणिपूरमध्ये १, राजस्थानात १३, त्रिपुरात १, उत्तर प्रदेशात ८, पश्चिम बंगालमध्ये ३ आणि जम्मू व काश्मीर या राज्यांत १ मतदारसंघात काल मतदान पार पडलं.

दुसऱ्या टप्प्यात काल झालेल्या मतदानामुळे प्रकाश आंबेडकर (अकोला), रवी राणा (अमरावती), रविकांत तुपकर (बुलडाणा), रामदास तडस (वर्धा) यांच्यासह /-...४



दुसऱ्या टप्प्यात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, ५ केंद्रीय मंत्री, २ माजी मुख्यमंत्री आणि ३ चित्रपट तारे रिंगणात आहेत. याशिवाय राहुल गांधी, शशी थरूर आणि हेमा मालिनी यांच्या जागांवरही मतदान झाले.

### उत्तर प्रदेशात टक्का घटला

१३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील ८८ जागांवर मतदान झाले. त्रिपुरामध्ये सर्वाधिक ७७.९३ टक्के मतदान झाले. महाराष्ट्र, बिहार आणि उत्तर प्रदेशमध्ये सर्वांत कमी ५३ टक्के मतदान झाले.

### मतदारसंघनिहाय टक्केवारी

▶ वर्धा - ५६.६६ टक्के ▶ अकोला -५२.४९ टक्के ▶ अमरावती - ५४.५० टक्के ▶ बुलढाणा - ५२.२४ टक्के ▶ हिंगोली - ५२.०३ टक्के ▶ नांदेड - ५२.४७ टक्के ▶ परभणी -५३.७९ टक्के ▶ - वाशिम -५४.०४ टक्के

### वाढत्या उन्हाचा मतदानाला फटका?

गेल्या काही दिवसांपासून विदर्भ आणि मराठवाड्यात कुठे उन्हाचा तडाखा बघायाला मिळतोय, तर कुठे अवकाळी पावसाचा फटका बसताना दिसत आहे. त्यामुळे संभाव्य वातावरण बघता सकाळच्या सत्रात मतदारांनी अधिकाधिक मतदान करण्याला पसंती दिली आहे.

## संतप्त तरुणाने ईव्हीएमचे केले दोन तुकडे

**नांदेड :**

नांदेड जिल्ह्यातून धक्कादायक घटना घडल्याचे दिसून आले. येथील एका मतदान केंद्रावर चक्क कुऱ्हाडीचा घाव घालून ईव्हीएम मशीनचे दोन तुकडे करण्यात आले आहेत. तर, मतदान केंद्रावरील निवडणूक कर्मचाऱ्यांवरही हल्ल्याचा प्रयत्न झाला. या घटनेने जिल्ह्यात खळबळ उडाली असून, पोलिसांनी संबंधित व्यक्तीला ताब्यात घेतले आहे.

नांदेडमध्ये मतदाराने आपला संताप व्यक्त करताना चक्क ईव्हीएम मशीन फोडलं, त्यावेळी कर्मचाऱ्यावरही हल्ल्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. नांदेड जिल्ह्यातील रामतीर्थ मतदान



केंद्रावर हा गंभीर प्रकार घडला आहे. भानुदास एडके या व्यक्तीने मतदान केंद्रात प्रवेश करत मशीन आणि बॅलेट मशीन कुऱ्हाडीने तोडून टाकली. या व्यक्तीने मतदान केंद्रातील कर्मचाऱ्यावरही हल्ला करण्याचा प्रयत्न केला. या फोडलेल्या मशीनमध्ये अंदाजे ५०० मतदान झाले होते. पण, कंट्रोल युनिट सुरक्षित असल्याने झालेले मतदानही सुरक्षित असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

## अमोल कोल्हेंचा अर्ज ठरला वैध

**शिरूर :**

लोकसभेत विद्यमान खासदार अमोल कोल्हे यांच्या उमेदवारी अर्जावर आक्षेप घेण्यात आला होता. अपक्ष उमेदवार आफताब शेख यांनी धर्मेंद्र परदेशी यांच्यामार्फत तशी तक्रार केली होती. तक्रारीनंतर निवडणूक आयोगाने यांची पडताळणी केली. अमोल कोल्हे यांनी स्वतःदेखील त्यांच्या वकिलांशी याबाबत बरीच चर्चा केली. अखेर चौकशीअंती अमोल कोल्हे यांचा उमेदवारी अर्ज वैध ठरविण्यात आला आहे. पुण्यातील विश्रामबाग पोलीस स्टेशनमध्ये एक गंभीर गुन्हा दाखल आहे, असं असताना त्याचा उल्लेख नामनिर्देशनपत्रात कोल्हेंनी केला नाही, असा आरोप करत त्यांच्याविरोधात तक्रार दाखल करण्यात आली होती.

## उपमुख्यमंत्री अजित पवारांना आयोगाकडून क्लीन चिट

**मुंबई :**

निवडणूक आयोगाकडून अजित पवारांना प्रचारसभेत विकासनिधीवरून केलेल्या वक्तव्याबाबत क्लीन चिट घेण्यात आला आहे. अजित पवारांनी केलेल्या वक्तव्यात उमेदवाराचं नाव नव्हतं म्हणत क्लीन चीट देण्यात आली आहे. बारामती लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक अधिकारी कविता द्विवेदी यांनी याबाबतचा अहवाल पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांना सादर केला आहे.

अजित पवार यांनी बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये केलेली भाषणं चर्चेत आहेत. या भाषणांमधून विरोधकांवर निशाणा साधताना अजित पवार यांनी केलेली वक्तव्यं वादाच्या भोवऱ्यात अडकले होते. विरोधकांकडून देखील प्रचंड टीका करण्याात आली. त्यानंतर आचारसंहितेचा भंग केल्याच्या आरोपातून उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवडणूक आयोगाकडून क्लीन चिट देण्यात




आली. त्याचबरोबर राज्य निवडणूक आयोगाला देखील त्याची एक प्रत पाठवण्यात आली.

बारामती लोकसभा मतदारसंघाचा भाग असलेल्या इंदापूरमधील सभेत बोलताना अजित पवार यांनी विकासनिधी हवा असेल तर उमेदवाराच्या चिन्हासमोरील बटण कचाकचा दाबा, अन्यथा विकासनिधी देताना आपला हात आखडेल असं वक्तव्य केलं होतं. या वक्तव्याला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून आक्षेप घेण्यात आला आणि निवडणूक आयोगाकडे त्याची /-...४

## अभिजित पाटलांच्या कारखान्यावर जप्ती

**पुणे :**

माढा लोकसभेसाठीचे महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रचारार्थ करमाळा तालुक्यात राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते.

या सभेला शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते अभिजित पाटीलही उपस्थित होते. मात्र, करमाळ्यातील सभेत असतानाच अभिजित पाटील यांच्या विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. एकीकडे उपमुख्यमंत्री अजित पवारांना क्लीन चीट मिळाली असताना अभिजित पाटलांवर कारवाई झाल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत.

# नाशिकमधून एक तर दिंडोरीतून दोन अर्ज दाखल

## पहिल्याच दिवशी १२७ अर्ज विक्री

**नाशिक : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्यास काल दि. २६ पासून प्रारंभ झाला असून, पहिल्याच दिवशी नाशिक आणि दिंडोरी मतदारसंघात एकूण ६४ उमेदवारांनी १२७ अर्जांची खरेदी केली. यात नाशिक मतदारसंघात ४७ उमेदवारांनी ८७ अर्जांची खरेदी केली तर दिंडोरी मतदारसंघात १७ उमेदवारांनी ४० अर्जांची खरेदी केली आहे. दिंडोरी लोकसभा मतदारसंघासाठी २ व नाशिक मतदारसंघासाठी १ असे एकूण ३ अर्ज दाखल झाले.

दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे यांच्या दालनात माजी आमदार जे. पी. गावित व सुभाष रामू चौधरी यांनी (कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी) यांनी लोकसभा निवडणुकीसाठी दिंडोरी मतदारसंघातून अर्ज दाखल केले तर नाशिक लोकसभा मतदारसंघातून जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी जलज शर्मा यांच्या दालनात अपक्ष शांतिगिरी महाराज यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

### गोडसेंनी घेतले पाच अर्ज

विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांनी चार तर त्यांच्या सूनबाई भक्ती अजिंक्य गोडसे यांनी १ अर्ज नेला आहे. अजूनही महायुतीच्या उमेदवारांची घोषणा झाली नाही. गोडसेंच्या गळ्यात उमेदवारीची माळ पडते का ते पाहावे लागणार आहे. उमेदवारी घोषित झालेली नसली तरी गोडसे /-...४



### महायुतीचा उमेदवार ठरेना

नाशिक लोकसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ झाला असला तरी अजून महायुतीचा उमेदवार ठरलेला नाही. माणिकराव कोकाटे यांचे नाव आता पुढे आले आहे. आज याबाबत निर्णयाची अपेक्षा आहे.

### भुजबळ समर्थक खैरेंकडून अर्ज खरेदी

नाशिक लोकसभेसाठी भाजपाकडून इच्छुक असणारे माजी सभागृहनेते दिनकर पाटील यांनी दोन अर्ज खरेदी केले. तर शांतिगिरी महाराज यांनी नाशिक लोकसभेसाठी अर्ज दाखल केला असून, त्यांनी चार अर्ज खरेदी केले. तर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे दिलीप खैरे यांनी दोन अर्ज खरेदी केले. तर माजी महापौर दशरथ पाटील यांनीही दोन अर्ज खरेदी केले.

## ब्रिजभूषण सिंह यांची याचिका न्यायालयाने फेटाळली

**नवी दिल्ली :**



महिला कुस्तीपटूंनी दाखल केलेल्या लैंगिक छळाच्या प्रकरणाची पुढील चौकशी करण्याची मागणी आणि याचिका फेटाळलेल्या प्रशिक्षकाच्या कॉल डिटेल्स सादर करण्याची मागणी करणाऱ्या भाजप खासदार आणि बृजभूषण सिंह यांची याचिका दिल्ली राऊस अव्हेन्यू कोर्टाने फेटाळली आहे. बृजभूषण सिंह यांनी घटनेच्या दिवशी आपण भारतात नसल्याचा दावा केला होता. पीटीआय या वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, दंडाधिकारी प्रियंका राजपूत यांनी या प्रकरणी बृजभूषण शरण सिंह यांच्यावर आरोप निश्चित करण्यासाठी ७ मे ही तारीख निश्चित केली आहे. बृजभूषण सिंह यांनी न्यायालयात याचिका दाखल करून आरोपांवरील युक्तिवाद आणि पुढील तपासासाठी वेळ मागितला होता. बृजभूषण सिंह म्हणाले होते की, त्या दिवशी मी भारतात नव्हतो. बृजभूषण सिंह यांच्या वकिलाने दावा केला की दिल्ली पोलिसांनी तक्रारदारासोबत असलेल्या कोचच्या कॉल डिटेल रेकॉर्डवर (सीडीआर) विश्वास ठेवला होता आणि सांगितले की ते ७ सप्टेंबर २०२२ रोजी कार्यालयात गेले होते, जिथे विनयभंग करण्यात आला होता.

## महत्त्वाचे

### मालेगावात गावठी पिस्तूल, तलवार, १८ सिलिंडर जप्त

**मालेगाव : प्रतिनिधी**

मालेगावात विशेष पोलीस पथकाने मागील चार दिवसांत पाच अवैध धंद्यांवर कारवाई केली आहे. यामध्ये दोन लाख ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. गावठी बनावटीच्या पिस्तुलांसह एक धारदार तलवार १८ गॅस सिलिंडर, २९० किलो गोमांस तर सात गोवंश जनावरांचा यामध्ये समावेश आहे. याप्रकरणी तिघा संशयितांना अटक करण्यात आली तर सहा जण फरार झाले आहेत. सहाय्यक पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू पथकाने विविध ठिकाणी कारवाया केल्या आहेत. कमालपुरा भागात रविवारी केलेल्या कारवाईत १९ हजार ५७० रुपये किमतीचे दीडशे किलो गोमांस जप्त करण्यात आले. गोमांस बाळगणाऱ्या साजिद शफीक खान याला पथकाने अटक केली. दुसऱ्या कारवाईत अझरुद्दीन शहाबुद्दीन शेख याच्या ताब्यातून गावठी बनावटीची पिस्तूल व एक तल-वार हस्तगत करण्यात आली. रौनकाबाद भागात राहणारा संशयित सलीमुद्दीन अलीमुद्दीन हा घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरचा काळाबाजार करताना मिळून त्याला अटक करून १८ गॅस सिलिंडर जप्त केले. तर आणखी एका घटनेत कत्तलीच्या इराद्याने निर्दयतेने बांधून ठेवलेल्या सात गोवंश जनावरांची पथकाने सुटका केली. सोहेल खान जाविद हंडी, इलियास खान, सद्दाम भुऱ्या यांनीही जनावरे बांधून ठेवली होती. हे चौघे संशयित फरार झाले आहेत. शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून १४० किलो गोमांस जप्त करण्यात आले. या कारवाईदरम्यान संशयित इकबाल सलीम खान व जावेद खान उर्फ सैतान हा फरार झाला आहे. याप्रकारे विविध पाच गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### जलपरी चोरी करणारे दोघे पोलिसांच्या ताब्यात

**नाशिक :** इलेक्ट्रिक जलपरी चोरी करणाऱ्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून तांब्याची केबल, पाच जलपरी, एक इलेक्ट्रिक मोटार व केबल आणि पिस्टन असा सुमारे ६६ हजारांचा ऐवज हस्तगत करण्यात आला. म्हसरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. रामदास धर्मा दळवी (३४ मुळ रा. बेहेडमाळ पेठ, हल्ली रा. खामखेडा ता. सटाणा) व राजेंद्र जयराम गायकवाड (रा. शंकरनगर, तवलीफाटा) अशी अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत. मधुकर मुरलीधर भोर (रा. नवीन जकातनाका पेठरोड) यांनी फिर्याद दिली आहे. म्हसरूळ पोलिसांनी गुरुवारी (दि.२५) दोघांच्या मुसक्या आवळल्या असून, गायकवाड याच्या घरझडतीत वरील मुद्देमाल पोलीसांच्या हाती लागला. चोरीच्या मोटारी खोलून संशयित स्पेअरपार्ट विक्री करीत असल्याचे पुढे आले असून, त्यांच्या अटकेने काही गुन्हे उघडकीस येण्याची आहे. तपास हवालदार चव्हाण करीत आहेत.

### जुगार व पत्ते खेळणाऱ्या दोघांना पोलिसांनी घेतले ताब्यात

**नाशिक :** जुगार व पत्ते खेळणाऱ्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. दोघांच्या ताब्यातून रोकडसह जुगाराचे साहित्य हस्तगत करण्यात आले. पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जनार्दन शंकर माळी (रा. मायको हॉस्पिटल मागे, कालिकानगर) व रवींद्र केदू अहिरे (रा. एरंडवाडी, पंचवटी) अशी अटक करण्यात आलेल्या जुगारींची नावे आहेत. अंमलदार नितीनकुमार पवार यांनी फिर्याद दिली आहे. दिंडोरीनाका येथील टॅक्सी स्टॅण्ड भागात उघड्यावर काही तरूण जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार गुरुवारी (दि.२५) दुपारच्या सुमारास पथकाने धाव घेतली असता पार्क केलेल्या एका काळीपिवळी टॅक्सीच्या आडोशाला दोघे पत्त्याच्या कॅटवर पैसे लावून अंदर बाहर जुगार खेळताना मिळून आले. ताब्यातून १ हजार ९० रुपयांची रोकड व जुगाराचे साहित्य असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. तपास हवालदार नांदुर्डीकर करीत आहेत.

### कोयता बाळगणाऱ्या तरुणावर कारवाई

**नाशिक :** सिडकोतील विजयनगर भागात कोयता बाळगणाऱ्या तरुणावर पोलिसांनी कारवाई केली. संशयिताच्या ताब्यातून धारदार लोखंडी कोयता हस्तगत करण्यात आला असून, अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तेजस संजय खर्डे (रा. गणपती मंदिराजवळ, शिवपूरी चौक, उत्तमनगर) असे संशयित कोयताधारीचे नाव आहे. विजयनगर येथील बजरंग चौकात एक तरुण कोयता घेऊन फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार गुरुवारी (दि.२५) सायंकाळच्या सुमारास पथकाने धाव घेत संशयिताच्या मुसक्या आवळल्या. त्याच्या अंगझडतीत कोयता मिळून आला. अंमलदार प्रवीण राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुह्याची नोंद करण्यात आली असून, तपास हवालदार बनतोडे करीत आहेत.

### गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**चांदवड : वार्ताहर**

तालुक्यातील कानमंडाळे येथे स्वतःच्या शेतात आंब्याच्या झाडाला सुती दोर बांधून गळफास घेऊन आत्महत्या घटना घडली. चांदवड तालुक्यातील कानमंडळे येथील अर्जुन परसराम जाधव (४३,रा. कानमंडळे) यांनी गुरुवार दि २५ रोजी साडेचार वाजेच्या सुमारास स्वतःच्या शेतात शेत गट नंबर १५६ मधील आंब्याच्या झाडाला सुती दोर बांधून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. या घटनेची माहिती रामदास सयाजी जाधव (४३ रा. कानमंडळे) यांनी वडनेर भैरव पोलीस ठाण्यात दिली. यावेळी वडनेर भैरव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद दाखल केली असून अधिक तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बी. यू. पगारे हे करीत आहेत.

# शहरातील दुकानांवर इंग्रजीत पाट्या कायम

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

मराठी फलकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेली मुदत २५ नोव्हेंबर २०२३ रोजीच संपली, मात्र शहरातील अनेक दुकानांवर इंग्रजी पाट्या दिसत आहेत. नाशिक महापालिका प्रशासनाने नोव्हेंबर महिन्यातच शहरातील दुकानदारांना आपल्या आस्थापनावरील इंग्रजी फलकांबाबत अल्टिमेटम दिला होता. परंतु, बहुतांशी दुकानदारांनी मनपाच्या अल्टिमेटम झुगारले आहे. सध्या महापालिकेचे काही अधिकारी लोकसभा निवडणुकीच्या कामात व्यस्त असल्याने हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. यासंदर्भात आता पुन्हा एकदा बैठक आयोजित केल्याची माहिती देत ९० टक्के दुकानांवर मराठी पाट्या असल्याचा दावा केला आहे. मराठी फलकांबाबत सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने २५ नोव्हेंबरपर्यंत इंग्रजीसह मराठी फलक लावण्याचे आदेश दिले. मात्र, तब्बल चार महिने उलटूनही न्यायालयाने दिलेल्या आदेशावर मनपा काम करत नाही. त्यामुळे आजही शहरातील दुकानांवर इंग्रजी पाट्या दिसत आहेत.

मराठी फलकांबाबत नाशिकमध्ये आक्रमक भूमिका घेत मनसे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी नोव्हेंबर महिन्यात शहरातील कॉलेजरोड परिसरात इंग्रजी फलक असलेल्या दुकानांच्या फलकांना काळे फासले. मराठी फलकांच्या संदर्भात इंग्रजी फलक लावणाऱ्या दुकानदारांच्या तोंडाला पुन्हा एकदा मनसे डागाळणार आहे. त्यासाठीची वेळ अद्याप ठरलेली नाही.



यााबत पक्षाच्या वतीने वेळोवेळी महापालिका प्रशासनाला पत्र दिले होते. इतर राज्यांमध्ये प्रादेशिक भाषेतील फलक असूनही महाराष्ट्रात मराठी भाषेतील फलक नाही, ही एक मोठी गोष्ट आहे. मनसेने वेळोवेळी आक्रमक भूमिका स्वीकारली आहे. पुन्हा एकदा महापालिकेला पत्र देऊन वेळ मारून नेली जाईल, त्यात मराठीचे फलक न लावल्यास मनसे स्टाईलने आंदोलन करण्यात येईल.

- **नितीन माळी** पदाधिकारी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना

शहरातील ५३ हजार खासगी आस्थापनांना इंग्रजीसह मराठी फलक लावण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या होत्या, मात्र संबंधित आस्थापनांनी मराठीत फलक लावल्यानंतरही महापालिकेने कारवाई केली नाही. आता विभागीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून आस्थापनांवर दंडात्मक कारवाई होणार का? असा सवाल उपस्थित होत आहे.

शहरातील ९० टक्के दुकाने आणि संस्थांचे संकेत मराठीत आहेत. याबाबत महापालिका प्रशासन सातत्याने प्रयत्न करत आहे. या टप्प्यात गुरुवारी महापालिका मुख्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

- **विवेक भदाणे,** प्रभारी उपायुक्त, कर, महापालिका

# उद्योगपती कटारिया यांची कसून चौकशी

## पोलिसांनी नोटीस बजावल्यानंतर झाले हजर

**नाशिक : प्रतिनिधी**

बांधकाम व्यावसायिक अशोक कटारिया यांना पोलिसांनी नोटीस बजावल्यानुसार ते शुक्रवारी चौकशीसाठी उपस्थित राहिले. पोलिसांनी कारडा, कटारिया, पारख यांच्या घरासह कार्यालयात झडती घेतली होती. त्यामध्ये संबंधित बांधकाम प्रकल्पांची आणि आर्थिक व्यवहारांची कागदपत्रे जप्त करण्यात आली. त्यानुसार कटारिया यांची चौकशी झाल्याचे समजते.

वरील संशयितांविरुद्ध उपनगर पोलिसांत महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण कायद्यांतर्गत (एमपीआयडी) गुन्हा दाखल आहे. दरम्यान, बांधकाम व्यावसायिक नरेश कारडा यांच्यासह इतर संशयितांविरुद्ध नोव्हेंबर २०२३ पासून आतापर्यंत आठ गुन्हे नोंद आहेत. त्यात सोळा कोटी रुपयांपर्यंत नागरिकांची फसवणूक झाली आहे. सर्व गुन्ह्यांच्या तपासात उपायुक्त परिमंडळ दोनच्या पथकासह उपनगर पोलिसांनी कारडा, कटारिया, पारख यांच्या घरासह कार्यालयात झडती घेतली होती. त्यामध्ये संबंधित बांधकाम प्रकल्पांची आणि आर्थिक व्यवहारांची कागदपत्रे जप्त करण्यात आली. त्यासंदर्भातील चौकशीकरिता कटारिया शुक्रवारी (दि. २६) पोलिसांत हजर झाले.

# सिडको परिसरात महावितरणचा गलथान कारभार

## सततच्या खंडित वीजपुरवठ्यामुळे ग्राहक त्रस्त

**सिडको विशेष : प्रतिनिधी**

शहरासह सिडको महावितरण विभागाच्या हद्दीत विविध भागांत सकाळ, दुपार, सायंकाळ केव्हाही अचानक वीजपुरवठा खंडित होत असल्याचा प्रकार सुरू आहे. एकीकडे तापमानाच्या पारा उंचावत असल्याने सर्वत्र उकाडा जाणवू लागला असून, नागरिक अक्षरशः घामाघूम झाले आहेत. यातच सिडको महावितरण हद्दीत रोज, तसेच दिवसाआड केव्हाही वीजपुरवठा खंडित होण्याचा प्रकार सुरू आहे. तीन, चार, तसेच सहा-सहा तास वीजपुरवठा खंडित होत असल्याने जणू काही अघोषित भारनियमन महावितरण कंपनीकडून करण्यात आले की काय, असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.



सिडकोतील महावितरण हद्दीतील तोरणानगर, उदय कॉलनी, महाले फार्म, राणा प्रताप चौक, पवननगर, उत्तमनगर, उपेंद्रनगर, सावतानगर, त्रिमूर्ती चौक, पाटीलनगरसह विविध भागांत नियमित वीजपुरवठा खंडित होत आहे. गुरुवारी सकाळी सातपासून दुपारी तब्बल तीन वाजले तरीही वीजपुरवठा खंडित होतो. अचानक सहा-सात तास वीजपुरवठा खंडित झाल्याने उन्हाच्या उकाड्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. उकाड्यापासून बचावासाठी घराघरांमध्ये पंखा व कूलरचा वापर होतो. मात्र, वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांची चांगलीच गैरसोय होऊ लागली आहे. खंडित विजेमुळे व्यावसायिकांनी सकाळनंतर दुकाने बंद ठेवली होती.

महावितरण कंपनीच्या सावळ्यागोंधळामुळे सिडकोसह शहराला ऐन उन्हाळ्यात उकाड्याला सामोरे जावे लागले. प्रश्न उकाड्याचाच नाही, तर विजेशी संबंधित किती तरी अत्यावश्यक सेवा आहेत, त्या सर्व ठप्प झाल्या. अगदी दळणही वेळेवर दळून मिळू शकलेले नाही. वीजबिल भरले नाही तर तातडीने वीज खंडित केली जाते. मात्र, महावितरण जेव्हा दिवसाआड वीज खंडित करीत असेल तर नागरिकांचा संताप होणे स्वाभाविक आहे.



वीजपुरवठा खंडित होण्याची दिवसाआड अशी परिस्थिती उद्भवत असेल तर ते गंभीर आहे. त्याचप्रमाणे सध्या वातावरणात कमालीचा बदल होत असल्याने केव्हाही अवकाळी आणि बेमोसमी पाऊस आल्यानंतर वीजपुरवठा खंडित होऊ शकतो. अशावेळी महावितरण कंपनीकडून सतर्कता बाळगावी आणि ज्या ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला असेल अशा ठिकाणी तत्काळ मनुष्यबळ पाठवून तेथील वीजपुरवठा सुरळीत करावा.

- **स्वाती चौधरी,** सामाजिक कार्यकर्त्या तथा वीजग्राहक

# बँकेच्या ताब्यातील घर विक्रीच्या बहाण्याने गंडा

## इस्टेट एजंट्सने नऊ लाखांना फसवले

**नाशिक : प्रतिनिधी**

बँकेने जप्त केलेले घर लिलावातून स्वस्तात मिळवून देतो, असे आमिष दाखवून दोन इस्टेट एजंटांनी सातपूरच्या श्रमिकनगरमधील एकास तब्बल नऊ लाखांना गंडा घातल्याची घटना घडली आहे.

या दोन्ही एजंटांवर सातपूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रमिकनगर येथील अशोक लहामगे यांना बँक ऑफ महाराष्ट्रने पंचवटीतील जप्त केलेला बंगला स्वस्तात मिळवून देतो, त्यासाठी बारा लाख रुपये रोख भरावे लागतील, असे सांगत इस्टेट एजंट राहुल वासुदेव भडांगे, रा. फ्लॅट क्रमांक ३ एकदंत अपार्टमेंट, तांबे मळा, शांतीनगर आणि त्याचा सहकारी सोमनाथ विठ्ठल धात्रक रा. हमालवाडी, हौसिंग सोसायटी,पेठरोड पंचवटी यांनी आपल्याकडून १२ लाख रुपये घेतले. या घराचा लिलाव १५ सप्टेंबर २०२३ ला झाला. लिलावासाठी दहा टक्के पैसे भरले होते. त्यानंतर भडांगे हे १८ सप्टेंबरला आले आणि बारा लाख रुपये कमिशनपोटी घेऊन गेले. त्यानंतर काही दिवसांनी या बंगल्याचे ७०,२०,००० रुपये बँक ऑफ महाराष्ट्र यांच्याकडे जमा केले. त्यानंतर पंधरा दिवसांनी बँकेच्या मॅनेजरने घराचा व्यवहार पूर्ण न झाल्याने ते घर तुम्हाला मिळणार नाही. त्यामुळे लहामगे यांनी संबंधित एजंटांकडे त्यांनी कमिशनपोटी घेतलेले बारा लाख परत मागितले. त्यावर दोन्ही एजंटांनी दोन लाख रुपये रोख आणि एक लाख रुपये फोन पेद्वारे दिले. परंतु उर्वरित रकमेचा आयसीआयसीआय बँकेचा धनादेश भडांगे यांनी दिला होता. परंतु तो बाऊन्स झाला. त्यानंतर भडांगेंशी संपर्क केला असता उर्वरित नऊ लाख देण्यास टाळाटाळ करीत आहेत. पैसे मागितल्यास दमदाटी सुरू केली. पैसे देणार नाही, अशी भाषा वापरत असल्याने लहामगे यांनी अखेर सातपूर पोलीस ठाण्यात दोन्ही एजंटांविरोधात तक्रार दिल्याने सातपूर पोलिसांनी कलम ४२०, ४१७, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# सातपूर अमरधाम येथे ४५ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळला

**सातपूर : वार्ताहर**

स्वारबाबानगर येथील अमरधाम येथे काल एका ४५ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळला. त्यामुळे एकच खळबळ उडाली. इंद्रेश असे मृतदेह आढळलेल्या व्यक्तीचे नाव असून, तो बेवारस असल्याची माहिती सातपूर पोलिसांनी दिली.

प्राप्त माहितीनुसार इंद्रेश हा अनेक वर्षांपासून सातपूर परिसरात कुठलाही परिसरात न राहत आसल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. इंद्रेश हा सातपूर अमरधाम येथेच राहत होता. पोटाची खळगी भरण्यासाठी इंद्रेश आला. अनेक काम करायचा तसेच त्याला फिटीचा आजार अनेक वर्षांपासून जडलेला होता. सातपूर अमरधाम येथे सकाळी गौतमी सोनवणे हे अनेक वर्षांपासून अमरधाम सांभाळण्याचे काम पाहतात. रूटिंगप्रमाणे सोनवणे हे अमरधाम येथे गेल्यानंतर इंद्रेश याचा मृतावस्थेत पडल्यानंतर त्यांनी सातपूर पोलिसांना माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी आणला. शवविच्छेदनानंतर मृतदेह नागरिकांच्या स्वाधीन करण्यात आला.

फिटचा आजार व अति मद्य प्राशन केल्याने त्याचा मृत्यू झाला, अशी चर्चा परिसरात ऐकावयास मिळाली. दरम्यान सातपूर पोलिसांनी सदर घटनेसंदर्भात आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली असून, घटनेचा अधिक तपास सातपूर पोलीस करीत आहेत. मृत्यूचे नेमके कारण समजू शकले नाही. सातपूर अमरधाम येथे गेल्या अनेक वर्षांपासून कोटीची प्रॉपर्टी जरी असली तरी या ठिकाणी अधिकृत केअर टेकर नेमलेला नसल्याची माहिती मिळते, मात्र एवढे होत असताना महानगरपालिका कधी करते तसेच अनेक वर्षांपासून अमरधाम येथे मद्यप्राशन करणाऱ्यांचा धिंगाणा तसेच होणारे मृत्यू महापालिका तसेच पोलीस प्रशासन अडवणार का, याकडे सर्व सातपूरकरांचे लक्ष आहे.

# महावितरणच्या कर्मचाऱ्यावरील हल्ल्याचा निषेध

## आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

मोरगाव (बारामती) येथे महावितरण कार्यालयात वरिष्ठ तंत्रज्ञ रिंकू बनसोडे यांच्यावर वीज ग्राहकाने हल्ला करून त्यांचा बळी घेतला. या घटनेच्या निषेधार्थ नाशिकरोड येथील महावितरणच्या कार्यालयासमोर महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनने श्रद्धांजली सभा घेत या हल्ल्याचा निषेध केला.



रिंकू बनसोडेंच्या खून प्रकरणी फास्ट ट्रॅक कोर्टात सुनावणी घेऊन हल्लेखोराला फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. हल्ल्याची ही घटना पुरोगामी महाराष्ट्राला काळिमा फासणारी आहे. महावितरण कंपनी ही राज्यातील तीन कोटींच्यावर वीज ग्राहकांच्या मालकीची कंपनी आहे. अधिकारी, कर्मचारी हे २४ तास सेवा देत असतात.

शेकडो कर्मचारी शॉक लागून अपघाताने मृत्युमुखी पडलेले आहेत. कोरोना काळात या कर्मचाऱ्यांनी केलेली सेवा ही सर्वोच्च सेवा होती.

विद्युत मंडळाच्या योगदानामुळे महाराष्ट्राची औद्योगिक, कृषी व इतर क्षेत्रात क्रांती झाली आहे. अशा कंपनीतील कर्मचाऱ्याची हत्या सरकारला शोभनीय बाब नाही, असे पदाधिकाऱ्यांनी नमूद केले. यावेळी संघटनेचे पंडित कुमावत, दीपक गांगुर्डे, सतीश पाटील, महेश कदम, महेश वाळूंज, दत्ता चौधरी, अमोल डोळस, अतुल कांबळे, राजेश चौरे, दीपक बागूल, सचिन बनकर, कैलास वारुंगसे, सचिन गायकवाड, संजय चौधरी, प्राची पाटील, दीपाली मोरे, प्रज्ञा भालेराव, अतुल चौधरी, गीतेश्वर वाघेरे, रंजना गुरव, योगिता मोरे, सुनीता तुपे, अर्चना ढगे, वासंती पवार, विजया अमृतकर, अनिता गोडसे, सारिका क्षीरसागर, वनिता साळवे, प्रियांका शेळके, लक्ष्मी सुरळकर, सोनाली शेळके, जमधडे, मधुरा शेलार, अनिता सातपुते, सविता तुरे आदी उपस्थित होते.

# स्विफ्टकार, ॲटोरिक्षासह तीन दुचाकी चोरी

**नाशिक : प्रतिनिधी**

वाहनचोरीची मालिका सुरूच असून, पार्क केलेली स्विफ्टकार, ॲटोरिक्षासह चोरट्यांनी तीन दुचाकी पळवून नेल्या. भद्रकाली म्हसरूळ, सातपूर व नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

कैसर यासिन कोकणी (रा. कोकणीपूरा) यांची तीन लाख रुपये किमतीची स्विफ्ट कार बुधवारी रात्री घराशेजारील बोळीत पार्क केलेली असताना चोरट्यांनी ती पळवून नेली. तर चौकमंडई येथील अजिज बाबू शेख यांची ॲटोरिक्षा बुधवारी (दि.२४) सकाळच्या सुमारास तलावडी भागातील मराठा खानावळ परिसरात पार्क असतांना ती मेहबुब मोहम्मद शेख (रा. किस्मतबाग, कब्रस्तानजवळ) या संशयिताने चोरून नेली. भद्रकाली पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून, संशयित रिक्षाचोरास पोलीसांनी अटक केली आहे. तपास सहाय्यक निरीक्षक पवार व हवालदार बोंबले करीत आहेत. मोटारसायकल चोरीची पहिली घटना आसाराम बापू पुल भागात घडली. विशाल शैलेष घाडगे (रा. कार्बन नाका, शिवाजीनगर) यांनी फिर्याद दिली आहे. घाडगे गुरूवारी (दि.२५) बापू पूल भागात गेले होते. पुलाजवळ लावलेली त्यांची शाईन मोटारसायकल चोरट्यांनी चोरून नेली. म्हसरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास हवालदार फुलपगारे करीत आहेत. दुसरी घटना त्र्यंबकरोडवरील चंद्रभागा लॉन्स परिसरात घडली. हर्षद उखा महाजन (रा. श्रमिकनगर) यांनी तक्रार दाखल केली आहे. महाजन यांची पॅशन दुचाकी रविवारी (दि.२१) सायंकाळच्या सुमारास लॉन्सच्या पार्किंगमध्ये लावलेली असतांना चोरट्यांनी ती पळवून नेली. सातपूर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून तपास हवालदार वाघमारे करीत आहेत. तर पंढरीनाथ केरू पाटील (रा.जुना कारखानारोड) यांची शाईन दुचाकी रविवारी घरासमोर पार्क असतांना चोरट्यांनी चोरून नेली. नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, तपास हवालदार ठेपणे करीत आहेत.

# स्टार्टअप्सच्या पंखांना ६५ कोटींचे बळ

**नाशिक : प्रतिनिधी**

निमा स्टार्टअप समिटमध्ये ६५ कोटींचे करार प्रत्यक्षात येणार आहेत. त्यामुळे उद्योगांना व नवउद्योजकांना उभारी मिळणार आहे. निमा अध्यक्ष धनंजय बेळे यांनी याबद्दल गुंतवणूकदारांना धन्यवाद दिले.




ज्या स्टार्टअप्सनी उत्पादकीय मॉडेल बनविले होते त्यांच्यासाठी निमा समिटमध्ये प्रदर्शनीय दालन उपलब्ध करून दिले होते. सहाय्यासाठी मुंबई, पुणे, बंगळुरु नाशिक तसेच राज्याबाहेरीलही गुंतवणूकदारांना पाचारण करण्यात आले होते. सुमारे ७५ ते ८० गुंतवणूकदार यावेळी उपस्थित होते, त्यांच्यासमोर स्टार्टअपचालकांनी आपल्या स्टार्टअपचे सादरीकरण केले. प्रत्येकाने सादर केलेले नवनवीन संशोधन व उत्पादन बघून गुंतवणूकदारांसह उपस्थित उद्योजकही थक्क झाले. ५० लाख रुपयांपासून २५ कोटींपर्यंतची मागणी स्टार्टअप्स चालकांनी उपस्थित गुंतवणूकदारांकडे केली व त्याला सर्वच गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. ६५ कोटींचे करार प्रत्यक्षात येण्याचा मार्ग सुकर झाला. निमातर्फे आयोजित बँक समिटच्या माध्यमातून अनेक उद्योजकांच्या बँकेशी निगडित असलेल्या समस्यांवर तोडगा काढून बँक आणि उद्योजक यांच्यात सौहार्दाचे वातावरण निर्माण केले होते. अनेक कर्ज प्रकरणे तातडीने मंजूर करण्यातही यश आले होते. आता स्टार्टअप समिटच्या माध्यमातून अनेक स्टार्टअप्सना आर्थिक मदत मिळवून देण्यात निमाचे योगदान मोलाचे राहिले ही आमच्यादृष्टीने गौरवाची बाब असल्याचे निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे यांनी सांगितले.व्यासपीठावर निमाचे सचिव निखिल पांचाळ, उपाध्यक्ष आशिष नहार, राजेंद्र अहिरे, कोषाध्यक्ष राजेंद्र वडनेरे, सहसचिव विरल ठक्कर, स्टार्टअप समितीचे समन्वयक श्रीकांत पाटील, सतीश कोठारी, नितीन आव्हाड, किरण खाबिया, किरण वाजे, सुधीर बडगुजर, प्रकाश गुंजाळ आदी होते.

तत्पूर्वी दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रातील सेमिनारमध्ये इएसडीएसचे संस्थापक पीयूष सोमाणी यांनी आपली यशोगाथा उलगडून सांगताना उद्योजकांना उद्योग कसा करावा, याचा कानमंत्र दिला. गुंतवणूकदारांच्या सत्रानंतर स्टार्टअप व गुंतवणूकदार यांच्यामध्ये परस्पर संवाद बैठका घडून आल्या. त्यामध्ये गुंतवणूकदारांनी ही स्टार्टअप्सकडून सर्व माहिती घेऊन आपले करार अस्तित्वात आणण्याच्या वाटचालीचे पाऊल टाकले. स्टार्टअप समिटला सहकार्य केलेल्या अशोक बिजनेस कॉलेज, नवजीवन कॉलेज, काकासाहेब वाघ कॉलेजच्या विद्यार्थ्यांनाही यावेळेस गौरवण्यात आले.

दोन दिवसांच्या समिटमध्ये नाशिक व इतर शहरांतील जवळपास २००० हून अधिक उद्योजक महिला, व्यापारी शासकीय अधिकारी यांनी भेट दिली. स्टार्टअप समिटचा समारोपप्रसंगी सर्व सहभागी स्टार्टअप व महिला उद्योजिकांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

# येवला शहरात विजेचा लपंडाव

## वीजपुरवठा सुरळीत करा; वीज वितरण कंपनी कार्यालयाला निवेदन

**येवला : प्रतिनिधी**

ऐन उन्हाळ्यात सुरू असलेला शहरातील विजेचा लपंडाव बंद करून वीजपुरवठा सुरळीत करावा, यासंदर्भातील निवेदन क्रीडा प्रबोधिनी या सामाजिक संस्थेच्या वतीने वीज वितरण कंपनी कार्यालयास देण्यात आले आहे. सदर निवेदनात म्हटले आहे की, गेल्या अनेक दिवसांपासून येवला शहरात विजेचा लपंडाव सुरू आहे.

दिवसा अन् रात्रीदेखील वीज खंडित करण्यात येते. त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. येवला शहरात महावितरणच्या भारनियमनाचे संकट नसले, तरीही कोणत्या ना कोणत्या कारणाने वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार सातत्याने सुरू आहेत. रात्री-अपरात्री बत्ती गुल होत असल्याने ऐन उन्हाळ्यात नागरिकांचे हाल होत आहेत. दिवसातून किमान चार ते पाच वेळा वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार घडत असून, महावितरणच्या कारभाराबाबत नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे.

वीजपुरवठा खंडित झाला की, बरीच प्रतीक्षा नागरिकांना करावी लागते. याबाबत महावितरणच्या कार्यालयात फोन उचलला जात नाही. कर्मचारी रजेवर असल्याचे सांगण्यात येते, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, विजेचा लपंडाव तत्काळ थांबवावा, अन्यथा नागरिकांच्या रोषास सामोरे जावे लागेल, असा इशारा उपस्थितांनी दिला असून, सदर निवेदनावर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किशोर सोनवणे, ज्येष्ठ नेते चंद्रमोहन मोरे पाटील, अतुल घटे, विनायक ठाकूर, सागर मोतीवाले, नितीन पगीरे, अनिल सोनवणे, चत्रभुज अट्टल, कृष्णा भरते, रवींद्र निकुंभ, अनिल हलवाई, मनीष पटेल, राजेंद्र गांगुर्डे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.





दावचवाडी : धान्य वितरण करताना पिंपळगाव मार्केट संचालक नाना पाटील, माजी चेअरमन शांताराम शिरसाट, चेअरमन संजय आहेर, व्हा. चेअरमन भाऊसाहेब वाघचौरे, दौलतराव आहेर, डी. के. पाटील, जयराम शिरसाट, प्रकाश आगळे, दिनकर शिरसाट, पुंडलिक वाघचौरे, नानासाहेब आहेर, नारायण आगळे, सचिव व्ही. एन. कोटकर आदी.

# देवपूर गावची रेशन दुकानाची प्रतीक्षा संपली

**दावचवाडी : वार्ताहर**

गेल्या वीस वर्षांपासूनची देवपूर गावची रेशन दुकानाची प्रतीक्षा अखेर संपली. पिंपळगाव कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक ज्ञानेश्वर शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली देवपूर शेतकरी सहकारी सोसायटी चेअरमन संजय आहेर यांच्या हस्ते देवपूर सोसायटीच्या रेशन दुकानाचा शुभारंभ करण्यात आला.

याप्रसंगी कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित असलेले माजी चेअरमन शांतारामबापू शिरसाट व पोलीसपाटील लक्षणराव आहेर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. यावेळी विठोबाराजे शिरसाट, उत्तमराव शिरसाट, सुरेशदादा शिरसाट, नानाभाऊ आगळे, संपतराव आगळे, नितीन वाघचौरे, बाबाजीभाऊ नामदेव आगळे, सोमनाथ कंक वगैरे गावचे प्रमुख नागरिक म्हणून हजर होते. याप्रसंगी सोसायटी चेअरमन संजय आहेर, व्हा. चेअरमन भाऊसाहेब वाघचौरे, संचालक दौलतराव आहेर, डी. के. दादा पाटील, जयराम शिरसाट, प्रकाश आगळे, दिनकर शिरसाट, पुंडलिक वाघचौरे, नानासाहेब आहेर, नारायण आगळे, सचिव विठ्ठलराव कोटकर यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात लाभार्थींना गहू, तांदूळ वगैरे वाटप करण्यात आले. सोसायटी सभासद तथा गावकरी जगन्नाथ काशीद, तानाजी वाघचौरे, दिलीपराव काशीद, नानाभाऊ काशीद, रामभाऊ जाधव, पुंडलिक जाधव, बाळासाहेब जाधव, संजय जाधव, उस्मान सय्यद, सुयेश आहिरे, दीपक वाघ, कैलास वाघ, बाळू कंक, गोधडे, पवार आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# उष्माघाताच्या रुग्णांसाठी वणी रुग्णालयात ३ बेड

**वणी : प्रतिनिधी**

वणी ग्रामीण रुग्णालयात उष्माघातांच्या रुग्णांसाठी ३ बेड आरक्षित करण्यात आल्याची माहिती वैद्यकीय अधीक्षक डॉ. बी. एन. मोरे यांनी दिली.

वणी व परिसरात तापमानाने चाळिशी पार केली असून, याबाबत उपाययोजना करण्याच्या सूचना आरोग्य विभागास दिल्याने ग्रामीण रुग्णालयात स्वतंत्र कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. वाढलेल्या तापमानाचा नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी जिल्हा प्रशासनाने उपाययोजनेच्या सूचना दिल्या आहेत. त्याच सूचनेनुसार वणी ग्रामीण रुग्णालयात स्वतंत्र बेड उपलब्ध करून दिले आहेत.



या उष्णतेचा परिणाम वरिष्ठ नागरिक, लहान मुले, मधुमेह रुग्ण, हृदयरोग रुग्णांना या लाटेचा परिणाम होऊ शकतो, असे वैद्यकीय अधिकारी डॉ. बी. एन. मोरे यांनी आमचे प्रतिनिधीशी बोलताना ही माहिती दिली. ज्या रुग्णांना चक्कर येणे, शरीरातील तापमान वाढणे, लघवी कमी होणे, उलटी होणे, भोवळ येणे, जुलाब होणे, जीव गुदमरणे, डोके दुखणे अशा प्रकारची लक्षणे आढळल्यास त्यांनी ग्रामीण रुग्णालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन वैद्यकीय अधिकारी डॉ. नेहा सिंघल यांनी केले. वणी ग्रामीण रुग्णालयात ही लक्षणे आढळलेल्या सुमारे ८ ते १० रुग्णांवर औषधोपचार करून बरे झाल्यावर घरी पाठविण्यात आले. नागरिकांनी वाढते तापमान लक्षात घेता दुपारी ११ ते ४ वाजेच्या दरम्यान अवश्यकता असेल तरच घराबाहेर पडावे, असेही वैद्यकीय सूत्रांनी सांगितले.

याकरिता नागरिकांनी आपले आरोग्य अबाधित राखण्यासाठी शरीरातील तापमान तापासणे, पिण्याच्या पाण्याचे प्रमाण वाढवणे, जेवण वेळेवर करणे, उपाशी राहू नये, प्रतिकारशक्ती वाढण्यासाठी ओ.आर.एस. घेणे अशा उपाययोजना कराव्यात. नागरिकांनीदेखील भरउन्हात बाहेर पडू नये व आपले आरोग्य सांभाळावे, असे आवाहनही करण्यात आले आहे. उष्मघातापासून बचाव करण्यासाठी प्रत्येकाने पाणी जास्त प्यावे, डिहायड्रेशन होऊ देऊ नये, लिंबू सरबत, लस्सी, ताक, नारळ पाणी प्यावे. उन्हात बाहेर जाताना, गॉगल्स, डोक्यावर टोपी, उपरणे अथवा छत्रीचा वापरा करावा, अशीही खबरदारी घेऊन यापासून बचाव करता येतो. या उष्णतेचा परिणाम पशू-पक्ष्यांवरदेखील झाला असून, पक्षीप्रेमी नागरिकांनी आपल्या घरावर पक्ष्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, असे आवाहन केले आहे.



# जेईईत बी. पी. पाटील महाविद्यालयाचे यश

**पिंपळगाव बसवंत : वार्ताहर**

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांच्यातर्फे आयोजित 'जेईई मेन्स- २०२४' परीक्षेचा निकाल बुधवार (दि. २४ रोजी) जाहीर झाला. या परीक्षेत नाशिकच्या पिंपळगाव बसवंत येथील निफाड एज्युकेशन सोसायटी संचलित बी. पी. पाटील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले असून, त्यांचे सर्व स्तरावर कौतुक होत आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या प्रवेशासाठी आयआयटी व यांसारख्या राष्ट्रीय स्तरावरील अभियांत्रिकी संस्थांमध्ये प्रवेशासाठी पहिल्या टप्प्यात जेईई मेन्स परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेत नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंत येथील निफाड तालूका एज्युकेशन सोसायटीच्या बी. पी. पाटील महाविद्यालयाचा ध्रुव जाधव हा ९८.८८ तर राज राणे ९९.४७. गुण मिळवून देशात रँक टॉपर्समध्ये आले आहे. याचबरोबर या विद्यार्थ्यांसह अन्य विद्यार्थ्यांनी परीक्षेत यश मिळविताना 'आयआयटी'मध्ये प्रवेशाचे स्वप्न साकार केले आहे.

> नेहमी अभ्यासात सातत्य ठेवणे, प्रत्येक विषयाला योग्य वेळ दिला. त्यासाठी बी. पी. पाटील महाविद्यालयाचा शिक्षक महाविद्यालयीन व्यवस्थापक यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. त्यामुळे हे ध्येय गाठण्यासाठी भरपूर ऊर्जा मिळाली आणि यापुढे इंजिनिअरिंग व्हायचे स्वप्न लवकरच पूर्ण करेल!
>
> – **राज राणे,** जेईई मेन्स टॉपर्स विद्यार्थी

टॉपर्स झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सत्कार सोहळा गुरुवार दि. २५ रोजी सकाळी पिंपळगाव बसवंत येथील स्वर्गीय यशवंतराव महाले सभागृहात संपन्न झाला. यावेळी जेईई मेन्समध्ये अव्वल आलेल्या ध्रुव जाधव व राज राणे यांचा निफाड एज्युकेशन संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाचे विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

# श्री नेमिनाथ जैन सस्टेनेबल डेव्हलपमेंट विषयावर व्याख्यान

**चांदवड : वार्ताहर**

येथील श्री नेमिनाथ जैन ब्रह्मचर्याश्रम संचलित नॅक ''अ+'' मानांकित स्व. सौ. कांताबाई भवरलालजी जैन अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या एमबीए विभागातर्फे स्ट्रक्चरल इंजिनिअर बिल्डिंग कन्स्ट्रक्शन कंपनी, वेस्टर्न ऑस्ट्रेलिया येथील डॉ. कृष्णा लावणीया यांचे विद्यार्थ्यांसाठी सस्टेनेबल डेव्हलपमेंट या विषयावर ऑनलाइन व्याख्यान झाले.

सस्टेनेबिलिटी म्हणजे काय? हरितगृह वायू, अल्पायुषी वायू आणि जीवन चक्र ऊर्जा मूल्यांकन, आयएसओ, पर्यावरण लेबलिंग, सीएसआर याबाबत माहिती दिली. पिढी दर पिढीच्या मूलभूत गरजा धोक्यात न आणता पूर्ण करणे, शाश्वत विकासाची पूर्तता करण्याच्या पद्धती, व्यावसायिक धोरणांमध्ये पर्यावरणीय, सामाजिक आणि आर्थिक विचारांचे एकत्रीकरण याबद्दल माहिती दिली. हा उपक्रम एमबीएच्या होलिस्टिक डेव्हलपमेंट सेलमधील इंटरनॅशनल क्लबच्या अंतर्गत राबविण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन इंटरनॅशनल क्लब कोऑर्डिनेटर प्रा. एस. पी. डिंगरे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एमबीए विभागप्रमुख डॉ. अभय बोरा तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जी. तातेड, उपप्राचार्य डॉ. एम. आर. संघवी यांचे मार्गदर्शन लाभले.

सदर कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल संस्थेच्या विश्वस्त समितीचे अध्यक्ष बेबीलाल संचेती, विश्वस्त समितीचे उपाध्यक्ष व महाविद्यालयाचे समन्वयक दिनेशकुमार लोढा, सेक्रेटरी जवाहरलाल आबड, प्रबंध समितीचे अध्यक्ष अजितकुमार सुराणा, उपाध्यक्ष अरविंदकुमार भन्साळी, तसेच प्रबंध समितीचे सहमानद सचिव व महाविद्यालयाचे समन्वयक झुंबरलाल भंडारी व सुनीलकुमार चोपडा आदींसह सर्व विश्वस्त मंडळ व सर्व प्रबंध समितीचे सदस्य आदींनी शुभेच्छा दिल्या.



# दिंडोरी तालुक्यातील शिक्षकांना प्रशिक्षण

**दिंडोरी : प्रतिनिधी**

१८ वर्षांच्या आतील वयोगटातील बालकांना लैंगिक विषयाबाबत सुरक्षित करण्यासाठी अर्पण संस्थेच्या वतीने व पंचायत समिती दिंडोरीच्या शिक्षण विभागाच्या सहकार्याने दिंडोरी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेच्या ९०२ प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले.

दिंडोरी येथे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी असिमा मित्तल, गटविकास अधिकारी नम्रता जगताप, गटशिक्षणाधिकारी चंद्रकांत गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली जनता इंग्लिश स्कूल दिंडोरी येथे पंचायत समिती दिंडोरी व अर्पण संस्था, मुंबई संयुक्त विद्यमाने 'बाललैंगिक शोषणास' प्रतिबंध करणाऱ्या वैयक्तिक सुरक्षा शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रशिक्षणात अर्पण संस्थेचे तज्ज्ञ मार्गदर्शक कुसुम नाईक, शंकर गवस यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षण प्रत्यक्ष अमलात आणण्यासाठी मुख्य कार्यकारी असिमा मित्तल, शिक्षणाधिकारी नितीन बच्छाव, गटशिक्षणाधिकारी चंद्रकांत गवळी, विस्तार अधिकारी वंदना चव्हाण, कैलास पगार, सुनीता आहिरे, सर्व केंद्रप्रमुख, विशेष तज्ज्ञ ज्ञानेश्वर क्षीरसागर, रोहिणी परदेशी, शंकर गवस यांचे सहकार्य लाभले.

# कादवा म्हाळुंगी ते लखमापूर रस्त्याचे काम ग्रामस्थांनी पाडले बंद

**दिंडोरी : प्रतिनिधी**

दिंडोरी तालुक्यातील कादवा म्हाळुंगी ते लखमापूर या रस्त्याचे काम पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून सुरू झाले असून, सदर ठेकेदाराने खडीकरणाचे काम पूर्ण केले आहे. काल सदर रस्त्यावर डांबरीकरणाला सुरुवात केली, मात्र सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याची तक्रार कादवा म्हाळुंगी येथील सरपंच सविता गांगोडे, प्रकाश आहेर, ग्रामपंचयत सदस्या ललिता गांगोडे यांनी केले असून, यावेळी प्रत्यक्ष रस्त्याचे डांबरीकरण सुरू असताना सरपंचांसह सदस्यांनी पाहणी करून ठेकेदार व पंतप्रधान ग्रामसडक योजना अधिकारी पाटील यांच्या निदर्शनास आणून देऊन सदर रस्त्याचे काम बंद करण्यात आले आहे.

सदर रस्त्यावर मोऱ्यांचे काम करताना पाइप टाकून त्यावर माती टाकून खडीकरण करण्यात आले आहे. प्रत्यक्ष येथे सिमेंट तसेच कच यांचा वापर करणे आवश्यक आहे. मात्र, प्रत्यक्षात तसे झालेले नाही. त्यामुळे कादवा म्हाळुंगी येथील ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे. त्याचप्रमाणे या रस्त्याला जे डांबरीकरण केले आहे ते हाताने उकारल्यानंतर पूर्ण निघून जात असल्यामुळे या रस्त्याच्या कामाचा दर्जा निकृष्ट असल्याचे सिद्ध होत असल्यामुळे येथील सरपंच सविता गांगोडे, प्रकाश आहेर, ग्रा. सदस्य गांगोडे यांनी सदर रस्त्याचे काम बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. या रस्त्याची किंमत तीन कोटी वीस लाख रुपये असल्यामुळे खर्चाच्या स्वरूपात या रस्त्याचे काम होत नसल्याचे दिसून येत आहे. अनेक वर्षांनंतर या रस्त्याचे काम रखडलेले होते, मात्र मागील वर्षी या रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाली आणि उशिरा का होईना कामाला सुरुवात झाली, परंतु अधिकारी वर्गाने या रस्त्याच्या कामाकडे दुर्लक्ष केल्याचे येथील ग्रामस्थांचे म्हणे आहे. त्यामुळे येथील ग्रामस्थांनी रस्त्याचे काम बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## महत्त्वाचे

### ध्येयाला परिश्रमाची जोड दिल्यास जीवनात यश मिळते



**अभोणा : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी स्वप्ने बघून ध्येय निश्चित करावे. ध्येयाला परिश्रमाची जोड दिल्यास जीवनात हमखास यश मिळाल्याशिवाय राहणार नाही. जीवनात येणाऱ्या अडचणींवर मात करणे शिकले पाहिजे. त्यासाठी कर्तृत्व, नेतृत्व व दातृत्व हे तीन गुण महत्त्वाचे आहेत. ज्या क्षेत्रातील आवड असेल त्या क्षेत्राचीच निवड करावी, मैत्रीचे बंध जोपासून स्नेह जिव्हाळा निर्माण केल्यास जीवन सुखकर होते, असा मोलाचा सल्ला प्राचार्य डॉ. पी. बी. वाघेरे यांनी दिला. डांग सेवा मंडळ नाशिक संचालित अभोणा येथील डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. वाघेरे बोलत होते. तेव्हा डॉ. रवींद्र पगार व डॉ. एस. के. मगरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर राहुल ठाकरे, सागर चित्ते, हर्षाली थैली, केतन निकम या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन अनुभव कथन केले. प्रास्ताविक प्रा. के. पी. पवार यांनी केले. सूत्रसंचालन ललिता थैल व विवेक मिश्रा यांनी केले. दर्शन पाटील यांनी आभार मानले. त्यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी होते.

### येवल्यातील धडपड मंचच्या वतीने नि:शुल्क उपक्रम



येवला : शहरात धडपड मंच या सामाजिक संस्थेच्या वतीने बालवाचनालय सुरू करण्यात आले. याप्रसंगी मंचाचे पदाधिकारी, कार्यकर्ते. (छाया : विलास पगारे)

**येवला : प्रतिनिधी**

मुलांवर वाचन संस्कार व्हावेत, त्यांना वाचनाची गोडी लागावी, यासाठी गेली २५ वर्षे येवल्यातील धडपड मंचच्या वतीने बालवाचनालय उपक्रम नि:शुल्क चालवला जात आहे. यंदाही १६ एप्रिल १५ जून या कालावधीत सकाळी ८.३० ते १० या वेळेत बालाजी मंदिर येथे बालवाचनालय सुरू झाले असून, बालगोपाळांना दररोज नवनवीन पुस्तके आपल्या घरी नेऊन वाचता येणार आहे. या उपक्रमाचा शुभारंभ डॉ. सागर बोळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रा. दत्तात्रय नागडेकर, पालक सौ. डहाके या उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत लहान वयातच विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे पुस्तके वाचायला मिळाले, तर त्यांच्या जीवनाला एक दिशा मिळते. त्यामुळे वाचन संस्कृतीच्या संवर्धनासाठी सुरू केलेले बालवाचनालय हा अतिशय स्तुत्य उपक्रम असल्याचे सांगितले. प्रत्यक्ष पुस्तक स्वतः निवडून ते हातात धरून वाचण्याचा आनंद काय असतो, याचा अनुभव काय असतो हे जाणून घेण्यासाठी पालकांनी आपल्या पाल्याला मित्रमंडळींसह बालवाचनालयात पाठवून या उपक्रमास भरघोस प्रतिसाद द्यावा व पाल्यांची उन्हाळी सुटी सत्कारणी लावावी, असे आवाहन धडपड मंचचे प्रभाकर झळके यांनी केले. यावेळी गोपाल गुरगुडे, दत्ता कोटमे, मयूर पारवे, मुकेश लचके, सचिन वखारे, सुनील चारणे, विवेक चव्हाण, वरद लचके आदींसह पालक उपस्थित होते.

### वडगाव पंगू येथे मोकाट कुत्र्यांमुळे हरणाचा मृत्यू

**चांदवड : वार्ताहर**

तालुक्यातील वडगाव पंगू येथे पाण्याच्या शोधात असलेल्या हरणाचा मृत्यू झाला. चांदवड तालुक्यातील वडगाव पंगू येथील मारुती आनंदा गोजरे यांच्या शेताजवळ दि. २४ एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास पिण्याच्या पाण्याच्या शोधात असताना त्यावेळी पाच ते सहा मोकाट कुत्र्यांनी जीवघेणा हल्ला केल्याने हरणाचा मृत्यू झाला. वनविभागाने जागोजागी पाणवठे बांधले असले तरी ते कोरडे ठाक पडले असल्याने वन्यप्राणी आता गाव वस्तीकडे वळले आहेत. त्यांच्यावर मोकाट कुत्रे हल्ले करीत आहेत. वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी याची दखल घेतील का, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

# पोद्दार इंटरनॅशनलतर्फे मतदान एक राष्ट्रीय कर्तव्यची रुजवणूक

**ओझर : वार्ताहर**

मतदान एक राष्ट्रीय कर्तव्य आहे. या भावनेची रुजवणूक पोदार इंटरनॅशनल स्कूल ओझर शाळेत करण्यात आली. दरम्यान, विद्यार्थी संविधानिक मंडळाची नियुक्ती करण्यासाठी मतदान प्रकियेचे आयोजन करण्यात आले होते.

आपली जबाबदारी व अधिकार, मजबूत लोकशाहीचा आधार. आपल्या मताने बदल घडेल, समाज सुधारेल। चांगल्या उद्यासाठी आजच मतदान करा. मतदान करणे देशसेवेचाच एक भाग आहे. लोकशाही सुदृढ व सक्षम असेल तर देशाच्या विविधांगी विकासाला चालना मिळण्यास, विकासाला गती येण्यास भरीव मदत होते. याच दृष्टिकोनातून या देशाचा नागरिक म्हणून प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क प्राधान्याने बजावणे नितांत गरजेचे आहे. किंबहुना मतदानाचा हक्क बजावणे म्हणजे राष्ट्रीय



कर्तव्य बजावणे असे म्हणल्यास वावगे ठरणार नाही.

हीच भावना सर्व नागरिकांच्या मनात रुजवण्यासाठी व मतदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना देखील समजण्यासाठी पोदार इंटरनॅशनल स्कूल ओझर येथे विद्यार्थी संविधानिक मंडळाची नियुक्ती करण्यासाठी मतदानाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्राइम मिनिस्टर, स्पोर्ट्स मिनिस्टर, डिसिप्लिन मिनिस्टर, कल्चरल सेक्रेटरी, असेम्ब्ली सेक्रेटरी इत्यादी दहा पदे होती. या दहा पदांसाठी इयत्ता सातवी ते नववी वर्गातील ३० उमेदवार विद्यार्थी उभे होते. या सर्व उमेदवारांसाठी ऑनलाइन पद्धतीने मतदान राबवण्यात आले. या मतदानामध्ये शाळेतील इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग होता. या सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या मताप्रमाणे योग्य व पात्र उमेदवार निवडण्याची संधी उपलब्ध करण्यात आली होती. प्रत्येक विद्यार्थ्याने मतदान करून आपला मतदानाचा हक्क बजावण्याबरोबरच शालेय कामकाज अधिक सक्षम होण्यासाठी आपलाही खारीचा वाटा उपयुक्त होतो ही बाब सर्व विद्यार्थ्यांच्या लक्षात आली. त्याचबरोबरच लोकशाही मधील मतदान प्रक्रिया उत्कृष्टरिता समजली. मतदान प्रक्रिया अतिशय उत्साहात पार पडली. मतदानाचे आयोजन शाळेचे क्रीडाशिक्षक राकेश शर्मा यांनी केले होते.

# कळवण आगारास साडेपंचावन्न लाख उत्पन्न



**वणी : प्रतिनिधी**

खानदेशचे माहेर असलेल्या सप्तशृंगीदेवीच्या चैत्र यात्रोत्सव काळात लालपरीच्या कळवण आगारास सुमारे ५५,५१,२९१/- रुपये इतके उत्पन्न मिळविल्याची माहिती कळवण आगारप्रमुख संदीप बेलदार यांनी दिली.



श्री सप्तशृंगीदेवीचा चैत्र यात्रोत्सव काळात कळवण आगाराने कळवण, नांदुरी, सप्तशृंगगड, नाशिक , मालेगाव या ठिकाणाहून भाविकांची वाहतूक केली. या प्रवाशांची संख्या सुमारे १,६१,७४४ इतक्या प्रवाशांना सेवा दिली. यामध्ये प्रौढ प्रवासी, पुरुष, स्त्रिया, लहान मुले व ७५ वर्षांपुढील महिला व पुरुष अशा या भगवती भक्तांनी प्रवास केला. यातून हे उत्पन्न मिळाल्याची माहिती वाहतूक निरीक्षक सुरेश पवार यांनी दिली.

यात्रोत्सव काळात गडावर जाण्यासाठी खासगी वाहनांना बंदी होती. फक्त एस.टी. बसेसच गडावर जात-येत होत्या. यात्रोत्सव काळात कुठल्याही प्रकारची अडचण निर्माण झाली नाही व प्रवाशांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी आभार मानले.



# त्र्यंबक रोडवरील लॉजवर ग्रामीण गुन्हे शाखेची कारवाई

**नाशिक : प्रतिनिधी**

त्र्यंबकेश्वर रोडवरील अनैतिक व्यवसाय करणाऱ्या हॉटेल व लॉजवर ग्रामीण पोलिसांनी धडक कारवाई सुरू केली असून, त्र्यंबकेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नाशिक - त्र्यंबकेश्वर रोडवर खंबाळे शिवारातील कुंटणखाना चालविणाऱ्या मानस लॉजिंग बोर्डिंगवर छापा टाकून स्थानिक गुन्हे शाखेने एक जण ताब्यात घेतला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, त्र्यंबकेश्वर पोलीस ठाणे हद्दीत नाशिक-त्र्यंबकेश्वर रोडवर खंबाळे शिवारातील मानस लॉजिंग व बोर्डिंग येथे कुंटणखाना चालत असल्याची माहिती ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राजू सुर्वे यांना गोपनीय बातमीदाराकडून मिळाली. या माहितीवरून हॉटेल मानस व लॉजिंग-बोर्डिंग येथे बनावट गिऱ्हाईक पाठवून हॉटेल मानस व लॉजिंग व बोर्डिंग येथे एक पीडित महिलेची सुटका करून कुंटणखाना चालविणारा दलाल किशोर निवृत्ती शिंदे, रा. खंबाळे, ता. त्र्यंबकेश्वर यास ताब्यात घेतले असून, मानस लॉजिंग व बोर्डिंग मालक गणेश भिका मोरे, रा. खंबाळे, ता. त्र्यंबकेश्वर हा फरार आहे. कारवाईवरून त्याबाबत त्र्यंबकेश्वर पोलीस ठाण्यात पिटा कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण आदित्य मिरखेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राजू सुर्वे, सहायक पोलीस निरीक्षक गणेश शिंदे, पोलीस हवालदार नवनाथ सानप, चेतन संवत्सरकर, किशोर खराटे, सतीश जगताप, संदीप नागपुरे, पोलीस नाईक विश्वनाथ काकड, पोलीस शिपाई कुणाल मोरे, नितीन जाधव, महिला पोलीस नाईक योगिता काकड, महिला पोलीस शिपाई छाया गायकवाड, चालक सहायक पोलीस उपनिरीक्षक गोजरे यांच्या पथकाने छापा टाकून कारवाई केली.

**समूळ उच्चाटन करणार**

जिल्हा पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक ग्रामीण पोलिसांनी अवैध व्यवसायाविरोधात मोहीम हाती घेतली असून, जिल्ह्यात चालणाऱ्या अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी ही मोहीम सुरूच राहणार आहे.

**–राजू सुर्वे, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा ग्रामीण**

# शिवनई येथे आरोग्य तपासणी व चिकित्सा शिबिर संपन्न

**नाशिक:**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील प्रकृती वेलनस सेंटर तर्फे दि. २५ एप्रिल २०२४ रोजी शिवनई ता. दिंडोरी येथे आयुर्वेद चिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात मोफत रुग्ण तपासणी व आयुर्वेदीय औषधी वाटप करण्यात आले. यावेळी ८५ पेक्षा अधिक स्थानिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. आयुर्वेदीय चिकित्सा पध्दती जनसामांन्यापर्यंत पोहचावी म्हणून हा उपक्रम महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे मा. कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त) प.वि.से.प., अ.वि.से.प.,वि.से.प. आणि मा. प्रति-कुलगुरु डॉ. मिलिंद निकुंभ यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले. शिबिरामध्ये आयुष विभाग प्रमुख डॉ. गितांजली कार्ले आणि सहाय्यक प्राध्यापक डॉ. अनुश्री नेटके यांनी रुग्ण तपासणी केली व आंतरवासियता विद्यार्थी वेदांत जवादे, संगम चव्हाण, यांचे रुग्ण तपासणीसाठी सहकार्य लाभले. सदर गावामध्ये थायरॉईड विकार, संधीवात, मधुमेह, लहान मुलांच्या पोषण विषयक तक्रारी, त्वचा रोग संबधीत रुग्णांना आयुर्वेदीय मार्गदर्शन आणि मोफत औषध वाटप करण्यात आले.

## पुण्यातून एक, शिरूरमधून अकरा, तर मावळमधून चार अर्ज बाद

**पुणे :** पुणे शिरूर व मावळ लोकसभा मतदारसंघासाठी अर्ज छाननीच्या दिवशी पुण्यातून एक अर्ज बाद झाला तर शिरूरमधून ११ अर्ज बाद झाले आहेत. मावळ लोकसभा मतदारसंघातून चार अर्ज रिंगणातून बाहेर पडले आहेत.पुणे लोकसभा मतदारसंघात अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी ४२ उमेदवारांनी ५८ अर्ज दाखल केले होते. त्यापैकी केवळ एक अर्ज अवैध ठरला आहे. महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या पत्नी मोनिका मोहोळ यांनी सूचक म्हणून अर्ज भरला होता. त्यांना पक्षाचा एबी फॉर्म नसल्याने त्यांचा अर्ज बाद झाला आहे. मात्र मोनिका मोहोळ यांनी अपक्ष म्हणून भरलेला अर्ज वैध ठरला असून पुण्यात ४२ उमेदवारांचे एकूण ५७ अर्ज वैध ठरले आहेत.

# डॉ. भारती पवारांवर आरोप करत भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्षांचा व उपजिल्हाध्यक्षांचा राजीनामा

**दिंडोरी : प्रतिनिधी**



दिंडोरी लोकसभा निवडणुकीत डॉ. भारती पवार यांच्यावर मतदारांची नाराजी असल्याचे चित्र बघावयास मिळत आहे. परंतु आता पक्षांतर्गत खदखद बाहेर निघाली असून, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष योगेश बर्डे यांनी लोकसभा उमेदवार केंद्रीय मंत्री डॉ. भारती पवार यांच्या मनमानी कारभाराला कंटाळून प्राथमिक सदस्यत्व, बूथप्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख या पदांचा राजीनामा देत असल्याचे पत्र जिल्हाध्यक्षांना सुपूर्द केल्याने एकच खळबळ उडाली आहे. त्यांच्यापाठोपाठ युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष वैभव रमेशराव कावळे यांनीही आपल्या युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. या पत्रामध्ये डॉ. भारती पवार यांच्यावरती गंभीर आरोप करण्यात आल्याचे दिसून येत आहे. बर्डे यांनी पत्रात नमूद केले आहे की, केंद्रीय मंत्री डॉ. भारतीताई पवार व त्यांच्या खासगी सचिव यांच्या मागील ५ वर्षांच्या कार्यपद्धतीबद्दल त्यांना व्यक्तिशः व पक्षश्रेष्ठींकडे अनेकदा नाराजी व्यक्त करून कामकाजात सुधारणा करण्याची अनेकदा विनंती केली. परंतु कुठलाही उपयोग झालेला नाही. आता उमेदवारी जाहीर झाल्यानंतर निवडणुकीचा प्रचार सुरू होण्यापूर्वी सर्व कार्यकर्त्यांनी त्यांना समोर बसवून आमचे म्हणणे ऐकून घेण्याची विनंती केली असता त्यांनी उर्मटपणे उत्तरे देण्यास सुरुवात केली. माझी तक्रार थेट राष्ट्रीय अध्यक्षांकडे करा, गाझी उमेदवारी रद्द करून आणा, ज्याला मला विरोध करावयाचा असेल त्याने प्रचारास येऊ नका, अशा पद्धतीची भाषा कार्यकर्त्यांना वापरली, असे पत्रात म्हटले आहे.

# डिव्हाईन फार्मसीच्या संशोधनाला भारत सरकारतर्फे पेटंट

**सटाणा : तालुका प्रतिनिधी**


प्रा. शिवराज जाधव | प्रा. डॉ. दिपक सोनवणे | प्राचार्य डॉ. धनंजय पाटील | प्रा. खेमचंद सुराणा

श्रीशक्ति शैक्षणिक संस्था संचलित येथील डिव्हाईन कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. धनंजय पाटील, प्रा. शिवराज जाधव, प्रा.डॉ. दीपक सोनवणे, व प्रा. खेमचंद सुराणा यांच्या 'पोर्टेबल टिश्यू करिअर' या संशोधनाला भारत सरकारतर्फे पेटंट प्रदान करण्यात आले. सदर पेटंट संशोधन 'टिश्यू' या विषयावर आधारित असून, उपकरण टिश्यू वाहक म्हणून कार्य करते.

पोर्टेबल टिश्यू वाहक या संशोधन प्रयोगाचे उद्देश 'टिश्यू' (ऊती) एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणारे उपकरण आहे. पोर्टेबल टिश्यू वाहक हा ऍक्रेलिक काचेच्या चौकोनी बॉक्स बनविलेला आहे. बॉक्सचा उजव्या बाजूला, बॅटरीद्वारे समर्थित लहान एरेटर आहे. बॅटरी आणि एरेटर वायरद्वारे जोडलेले आहेत. बॉक्सच्या उजव्या बाजूला जोडलेल्या लहान केसमध्ये बॅटरी ठेवली जाते. नियमित मोबाइल चार्जरसह टाइप सी पोर्टद्वारे बॅटरी रिचार्ज करण्याची तरतूद आहे. एरेटरचे आउटलेट बॉक्सच्या आत आहे जेथे प्रयोगाच्या उद्देशाने द्रावणासह ऊतक उपस्थित असेल. बॉक्सच्या वरच्या बाजूला मधल्या चौकोनी झाकण दिलेले आहे जे टिश्यू ठेवण्यासाठी आणि काढून टाकण्यासाठी तसेच फिजियोलॉजिकल सॉल्ट सोल्यूशनसाठी उपयुक्त ठरेल.

या 'पोर्टेबल टिश्यू वाहक' या उपकरणाचा उपयोग 'टिश्यू' (ऊती) वाहक म्हणून असले तरी हे उपकरण अविश्वसनीय शोध व उपयुक्त असे महत्त्वाचे साधन ठरणार आहे. कारण प्रत्येकजण या किटची आवश्यकता असेल तेव्हा प्रयोगशाळेत, रुग्णालयात, रुग्णवाहिकेत कुठेही सहज वापरू शकतो. तसेच हे उपकरण कुठेही नेण्यास, ठेवण्यास आणि हाताळण्यासही सोपे आहे. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. अपूर्व हिरे, संस्थेचे सचिव डॉ. दीपक सोनवणे, संस्थेचे विश्वस्त जयसिंग दात्रे, महाविद्यालयातील नॅक समन्वयक डॉ. चंद्रशेखर पाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी पेटंट संशोधकांचे अभिनंदन केले.

पान नं. १ वरून....

## मतदान ईव्हीएमवरच!

याचिका दाखल केली होती. सुनावणीवेळी भूषण यांनी कोर्टाला काही पर्याय सुचवत निवडणुका या बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात, असं सुचवलं होतं. मात्र, कोर्टाने ते शक्य नसल्याचं निकाल राखून ठेवताना स्पष्ट केलं होतं. काल न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दिपांकर दत्ता यांच्या पीठाने निकाल दिला आहे. लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याच काल मतदान होत असताना हा निकाल दिला आहे. कोर्टाने पुन्हा बॅलेट पेपरवर मतदान घ्यावं, ही मागणी फेटाळली आहे. देशातील निवडणुका या इव्हीएम मशिनवरच होतील.इव्हीएम आणि व्हीव्हीपॅट या दोन्हींची १०० टक्के पडताळणी करता येणार नाही. सध्या ज्या प्रकारे मोजणी होते, तशीच मोजणी होणार आहे. सिंबल युनिट हे ४५ दिवसांसाठी सीलबंद ठेवण्यात येईल.

## राज्यात ५३.७१ टक्के मतदान

देशभरात ओम बिर्ला, राहुल गांधी, हेमा मालिनी, अरुण गोविल, एच. डी. कुमारस्वामी, शशी थरूर, भूपेश बघेल, के. सी. वेणुगोपाल, दानिश अली या महत्वाच्या उमेदवारांचं भवितव्य ईव्हीएममध्ये कैद झाले. मणिपूर येथून एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये काही संशयित एका बूथमध्ये घुसले. काँग्रेसने या घटनेवर लोकशाहीचे अपहरण केल्याचा आरोप केला. याआधी छत्तीसगडमधील गरिआबंद जिल्ह्यात बूथ ड्युटीवर असताना एका पोलिसाने स्वतःवर गोळी झाडली. तो मध्य प्रदेशचा रहिवासी आहे. बंगालमधील बलुरघाट आणि रायगंज या दोन लोकसभा जागांवर केंद्रीय दले महिलांना मतदान करण्यापासून रोखत असल्याचा आरोप तृणमूल काँग्रेसने केला आहे. बंगाल भाजपचे अध्यक्ष सुकांत मजुमदार आणि तृणमूल कार्यकर्त्यांमध्ये बालूरघाटात हाणामारीही झाली. मागील पंचवार्षिक मध्ये दुसऱ्या टप्प्यात भाजपने सर्वाधिक ५० तर मित्रपक्षांनी ८ जागा जिंकल्या. काँग्रेसला २१ जागा मिळाल्या होत्या. इतरांना ९ जागा मिळाल्या होत्या. निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार दुसऱ्या टप्प्यात १,२०२ उमेदवार रिंगणात आहेत. यामध्ये १,०९८ पुरुष आणि १०२ महिला उमेदवार आहेत. दोन उमेदवार तृतीयपंथी आहेत. यापूर्वी १९ एप्रिलला पहिल्या टप्प्यात १०२ जागांवर मतदान झाले होते. आजनंतर पाच टप्प्यातील मतदान १ जूनपर्यंत संपणार आहे. त्यानंतर ४ जून रोजी निकाल जाहीर होणार आहे.

**राजस्थानमध्ये टॉर्चच्या प्रकाशात मतदान**

राजस्थानमधील टोंक-सवाई माधोपूर सीटवर जोरदार वादळामुळे संध्याकाळी १२८ क्रमांकाच्या बूथवरील लाईट गेली. पर्यायी व्यवस्था नसल्याने येथे टॉर्चच्या प्रकाशात मतदान घेण्यात आले.मध्यप्रदेशातील सतना येथील मतदान केंद्र-१३७ मधील वीजेची तार माकडांनी तोडली. त्यामुळे मतदान केंद्रातील लाईट गेली. मोबाईल टॉर्चचा वापर करून येथे अंधारात मतदान करण्यात आले. राज्यात नवनीत राणा, महादेव जानकर, प्रताप जाधव, प्रकाश आंबेडकर, रामदास तडस, रविकांत तुपकर, प्रहारचे बूब यांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले.

## अजित पवारांना आयोगाकडून क्लीनचिट

तक्रार करण्यात आली. त्यानंतर या प्रकरणाची चौकशी कविता द्विवेदी यांच्याकडून करण्यात आली. प्राथमिक चौकशीत अजित पवारांनी केलेल्या वक्तव्यात कोणत्याही उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव त्यांच्याकडून घेण्यात आले नव्हते. त्यामुळे हा आचारसंहितेचा भंग ठरत नाही अस कविता द्विवेदी यांनी सादर केलेल्या अहवालात नमूद करण्यात आलय.

**काय म्हणाले अजित पवार?**

आम्ही केलेल्या कामाला तुम्हाला फायदा होईल, पण जेव्हा तुम्हाला फायदा होईल तेव्हा कुणामुळे फायदा झाला हे विसरू नका. विकासकामासाठी लागेल तेवढा निधी आम्ही देऊ. पण जस आम्ही पाहिजेल तेवढा निधी देतो, त्याप्रमाणे मशीनमध्ये देखील कचाकचा बटण दाबा. म्हणजे मला निधी द्यायला बरं वाटेल. नाहीतर माझा हात आखडता येईल, असे पवार म्हणाले.

**चौकशी करण्याचा निवडणूक आयोगाचा अधिकार:अजित पवार**

अजित पवारांना विचारलं असता, चौकशी करण्याचा निवडणूक आयोगाचा अधिकार असल्याचं अजित पवारांनी म्हटलंय. बारामतीत मेळाव्यात अजित पवारांनी भाषणात म्हटलं की, येणाऱ्या निवडणुकीत मी महायुतीचा धर्म पाळणार हा माझा शब्द आहे. आचार संहिता नियम असतात पाळायचे असतात. ते ग्रामीण भाषेत बोललो, तेच पुण्यात असतो, तर तिथं कचा-कचा नाही चालत ज्या भाषेत चालतं तसेच बोलावं लागतं.

## दिंडोरीतून दोन अर्ज दाखल

यांनी प्रचार सुरू केला आहे.

**भगरे व पवार यांच्यासाठी अर्ज खरेदी**

प्रशांत कल्याण पवार यांनी विद्यमान खासदार भारती पवार यांच्यासाठी ४ अर्ज तर पराग भगरे यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार भास्कर भगरे यांच्यासाठी ४ अर्ज खरेदी केले. तर माजी खासदार हरिश्चंद्र चव्हाण यांच्यासाठी समीर चव्हाण यांनी ३ अर्ज खरेदी केले.दिंडोरी लोकसभेसाठी जिवा पांडू गावित यांनी एक अर्ज दाखल केला तर चार अर्ज खरेदी केले.

# ट्रॅक ब्लेझर्स स्पोर्ट्स अकॅडमी अँड ॲथलेटिक्स स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित दुसऱ्या महाराष्ट्र राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेला सुरुवात

**नाशिक : प्रतिनिधी**



ट्रॅक ब्लेझर्स अँड ॲथलेटिक्स स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या वतीने आणि नाशिक जिल्हा ॲथलेटिक्स आणि महाराष्ट्र ॲथलेटिक्स असोसिएशन यांच्या सहकार्याने नाशिकच्या मीनाताई ठाकरे विभागीय क्रीडा संकुलच्या सिंथेटिक्स ट्रॅकवर आयोजित दुसऱ्या राज्य स्तरीय आठ; ऍथलेटिकस स्पर्धेला काल मोठ्या उत्साहात सुरवात झाली. तीन दिवस सुरू असणाऱ्या या स्पर्धेत महाराष्ट्रातून १८२३ खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे.

यामध्ये ४ वर्षे, ६ वर्षे, ८ वर्षे, १० वर्षे, १२ वर्षे, १४ वर्षे, १६ वर्षे आणि १८ वर्षे वयोगटांच्या मुले आणि मुली या आठ वयोगटांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील आणि विशेषतः ग्रामीण भागातील मुलांच्याकडे असलेले टॅलेंट विकसित करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. परंतु स्पर्धेला सकाळपासून सुरुवात करण्यात आली. यामध्ये वरिष्ठ गटाच्या पुरुष गटामध्ये ३००० मीटर धावणे स्पर्धेत नाशिकच्या एकलव्य स्पोर्ट्स अकॅडमीच्या अमन कुमारने प्रथम, रोहित बिन्नरने दुसरा तर प्रशांत जाधव याने तिसरा क्रमांक मिळविला. महिलांच्या २००० मीटर धावणे प्रकारात १००० मीटर धावणे प्रकारात रॅनिंग ९९ या संस्थेच्या कृष्णा बोराडे, सैराज लिंगायत मोहित कोतवाल या खेळाडूंनी सुंदर खेळाचे प्रदर्शन करून पहिले तिन्हीही क्रमांक आपल्या नावे केले. यामध्ये स्पोर्ट्स अकॅडमीच्या दिशा बोरसेने प्रथम, ट्रॅक ब्लेझर्सच्या गायत्री दरेकर हिने दुसरा तर मनीषा सोनावनेने तिसरा क्रमांक मिळविला. १८ वर्षे मुलांच्या गटात १२०० मीटर धावणे प्रकारात नाशिक ऍथलेटिकस फौंडेशनच्या महेश याने पहिला, नील सारंग याने दुसरा आणि आर्यन ढाणे याने तिसरा क्रमांक मिळविला.

✻ मुंबई:- वीज वाहिन्या, फीडर पीलर किंवा वितरण पेट्यांजवळ कचरा जाळण्यात येत असल्याने वीजयंत्रणेला धोका निर्माण होऊन सर्वसामान्य नागरिकांच्या जीवावर बेतणारे प्रसंग उद्भवण्याची शक्यता आहे. सोबतच विज वितरण कंपनीला मन:स्तापही सहन करावा लागतो. जनतेच्या पैशाचाही अपव्यय होतो, यामुळे वीजयंत्रणेजवळ कचरा टाकू नये तसेच तो जाळू नये असे आवाहन महावितरणने केले आहे.


## जाहीर नोटीस

उपरोक्त जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, **पायल विजय वारघडे** यांचे आजोबा **पांडुरंग भाऊ वारघडे** यांचा **दिनांक २६/०९/२००५** रोजी **सायखेडा** ता. निफाड येथ मृत्यू झाला आहे. ग्रामपंचायत कार्यालय सायखेडा ता. निफाड येथे ग्रामपंचायत रेकार्डला नोंद झालेली नाही. ग्रामसेवक सायखेडा यांनी दिनांक **११/०१/२०२४** रोजी तसा दाखला दिला आहे. याबाबत कोणाचे काही म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर **३०** दिवसाचे आत अगर दिनांक **१५/०४/२०२४** रोजी दुपारी **३.००** वाजता तहसिल कार्यालय निफाड येथे सुनावणी आयोजित केली आहे. सदर अर्जाबाबत कोणाची हरकत असल्यास इकडेस तक्रार/हरकत दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचे हरकत/तक्रार प्राप्त न झाल्यास प्रकरणात उपलब्ध कागदपत्राचे अनुषंगाने निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(विशाल नाईकवाडे)**
**तहसिलदार, निफाड**

## जाहीर नोटीस

**बागलाण येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात**
क्र. अभिलेख/जन्म नोंद आदेश/एसआर/१३३/२०२४

**श्री/श्रीमती. उषा पंडीत गायकवाड** रा. सटाणा, ता. सटाणा, जि.नाशिक **अर्जदार**
**विरुध्द**
**मुख्याधिकारी सटाणा,नगर परिषद** ता. बागलाण जि. नाशिक **सामनेवाला**

अर्ज-जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे जन्माची नोंद होणेबाबत.

याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे जन्माची नोंद होणे कामी, अर्जदार यांनी त्यांचा स्वत:चा **उषा पंडीत गायकवाड** हे **दिनांक १३/०४/१९८३** रोजी **मौजे सटाणा,** तर, बागलाण जि.नाशिक येथे जन्म झालेला आहे. सटाणा नगरपरिषद ता. बागलाण, जि. नाशिक यांचेकडेस त्यांचा स्वत:चा **उषा पंडीत गायकवाड** यांच्या जन्माची नोंद झालेबाबत चौकशी/तपास केला असता सदर नोंद आढळून येत नाही असे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे अर्जदार यांनी सामनेवाले विरुध्द प्रस्तुतचा अर्ज तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, बागलाण यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. त्याअर्थी याव्दारे फर्मविण्यात येते की, सदर किरकोळ फौजदारी अर्जाविरुद्ध कोणाचीही काही हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून **तीस** दिवसांच्या आत किंवा **दिनांक १६/०५/२०२४** रोजी सकाळी ११.०० वाजेपावेतो मे. तहसिलदार बागलाण, ता. बागलाण, जि. नाशिक येथे स्वतः अथवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत आपली हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाची काहीएक हरकत नाही असे समजुन उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी घेऊन जन्माची नोंद घेणे बाबतचा आदेश पारीत करण्यात येईल. आज **दिनांक १६/०४/२०२४** रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

(शिक्का)
**तहसिलदार**
**तथा कार्यकारी दंडाधिकारी बागलाण**

## जाहीर नोटीस

**बागलाण येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात**
क्र. अभिलेख/जन्म नोंद आदेश/एसआर/७८/२०२४

**श्री/श्रीमती. उज्वला अरुण पवार** रा. आराई, ता. सटाणा, जि.नाशिक **अर्जदार**
**विरुध्द**
**ग्रामसेवक आसखेडा, ग्रामपंचायत** ता. बागलाण जि. नाशिक **सामनेवाला**

अर्ज-जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे जन्माची नोंद होणेबाबत.

याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे जन्माची नोंद होणे कामी, अर्जदार यांनी त्यांचा स्वत:चा **उज्वला काळू सोनवणे** हे **दिनांक ०१/१०/१९८९** रोजी **मौजे आसखेडा** ता. बागलाण जि.नाशिक येथे जन्म झालेला आहे. ग्रामसेवक आसखेडा ग्रामपंचायत, ता. बागलाण, जि. नाशिक यांचेकडेस अर्जदार यांनी त्यांचा स्वत:चा **उज्वला काळू सोनवणे** यांच्या जन्माची नोंद झालेबाबत चौकशी/तपास केला असता सदर नोंद आढळून येत नाही असे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे अर्जदार यांनी सामनेवाले विरुध्द प्रस्तुतचा अर्ज तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, बागलाण यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. त्याअर्थी याव्दारे फर्मविण्यात येते की, सदर किरकोळ फौजदारी अर्जाविरुद्ध कोणाचीही काही हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून **तीस** दिवसांच्या आत किंवा **दिनांक १५/०५/२०२४** रोजी सकाळी ११.०० वाजेपावेतो मे. तहसिलदार बागलाण, ता. बागलाण, जि. नाशिक येथे स्वतः अथवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत आपली हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाची काहीएक हरकत नाही असे समजुन उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी घेऊन जन्माची नोंद घेणे बाबतचा आदेश पारीत करण्यात येईल. आज **दिनांक १५/०४/२०२४** रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

(शिक्का)
**तहसिलदार**
**तथा कार्यकारी दंडाधिकारी बागलाण**

## जाहीर नोटीस

**बागलाण येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात**
क्र. अभिलेख/जन्म नोंद आदेश/एसआर/६३/२०२४

**श्री/श्रीमती. रंजना राजाराम पवार** रा. वडबारे, ता. चांदवड, जि.नाशिक **अर्जदार**
**विरुध्द**
**ग्रामसेवक आराई, ग्रामपंचायत** ता. बागलाण जि. नाशिक **सामनेवाला**

अर्ज-जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे जन्माची नोंद होणेबाबत.

याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे जन्माची नोंद होणे कामी, अर्जदार यांनी त्यांचा स्वत:चा **रंजना रंगनाथ मोरे** हे **दिनांक १६/०४/१९७५** रोजी **मौजे आराई** ता. बागलाण जि.नाशिक येथे जन्म झालेला आहे. ग्रामसेवक आराई, ग्रामपंचायत, ता. बागलाण, जि. नाशिक यांचेकडेस अर्जदार यांनी त्यांचा स्वत:चा **रंजना रंगनाथ मोरे** यांच्या जन्माची नोंद झालेबाबत चौकशी/तपास केला असता सदर नोंद आढळून येत नाही असे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे अर्जदार यांनी सामनेवाले विरुध्द प्रस्तुतचा अर्ज तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, बागलाण यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. त्याअर्थी याव्दारे फर्मविण्यात येते की, सदर किरकोळ फौजदारी अर्जाविरुद्ध कोणाचीही काही हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून **तीस** दिवसांच्या आत किंवा **दिनांक १५/०५/२०२४** रोजी सकाळी ११.०० वाजेपावेतो मे. तहसिलदार बागलाण, ता. बागलाण, जि. नाशिक येथे स्वतः अथवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत आपली हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाची काहीएक हरकत नाही असे समजुन उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी घेऊन जन्माची नोंद घेणे बाबतचा आदेश पारीत करण्यात येईल. आज **दिनांक १५/०४/२०२४** रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

(शिक्का)
**तहसिलदार**
**तथा कार्यकारी दंडाधिकारी बागलाण**



## गांवकरी Classified

जाहिरातीसाठी संपर्क
9404434628

### शैक्षणिक.

**शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी प्रवेश देणे आहे. महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ संचालित**

प्रबोधन कन्या वस्तीगृह अंबाठा ता. सुरगाणा जि. नाशिक एकूण प्रवेश ५४ मुलीसाठी इयत्ता ५ ते १० पर्यंत अनु.जाती २६% अनु.जमाती ६९% वि. जा. भ. जं. ३% वि.मा.प्र.वर्ग २% तरि वरिल पत्यावर त्वरित संपर्क साधावा.

### शैक्षणिक.

**शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी प्रवेश देणे आहे. महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ संचालित**

प्रबोधन वस्तीगृह अंबाठा ता. सुरगाणा जि. नाशिक एकूण प्रवेश १२६ मुलांसाठी इयत्ता ५ ते १० पर्यंत अनु.जाती २६% अनु.जमाती ६९% वि. जा. भ. जं. ३% वि.मा.प्र.वर्ग २% तरि वरिल पत्यावर त्वरित संपर्क साधावा.

### पाहिजेत

होलसेल मेडिकल एजन्सीसाठी किमान १० वी पास मुली पाहिजेत. वयोमर्यादा १८ ते ३५ भेटा. महादेव एजन्सीज, गोळे कॉम्प्लेक्स, गोळे कॉलनी, नाशिक.

---

नाशिक शहराजवळ असलेल्या फार्म हाऊसवर बंगला साफसफाई व स्वयंपाकासाठी विवाहित निर्व्यसनी जोडपे पाहिजे. राहण्याची सोय. **संपर्क- सकाळी १० ते ५. मो.नं.९०४९०-३४९९९**

### विकत देणे/घेणे

वृंदावनगर म्हसरूळ- दिंडोरी रोड, नाशिक येथील दुमजली प्रशस्त बंगला विकणे आहे. **संपर्क- ९४२३१७४९८७, ९४२३४८०२४२, ८७८८९३३१०१**

### विकत देणे/घेणे

हफ्त्यावर नाशिक महानगरपालिके लागून ५.७५ हजारात टायटल क्लिअर प्लॉट घ्या... तेही ९,१२ आणि १५ मी. रोडला आपला प्लॉट चॉईस करण्यासाठी आताच कॉल करा. **संपर्क-९५६१३८२७७७**

### पाहिजेत

डॉ.आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह व शिक्षण मंडळ येवला संचलित. डॉ.आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह, येवला स्वयंपाकी पदासाठी संपर्क साधा: **मो.९०९६१८९३०९ अधिक्षक**

### नावात बदल

माझे जुने नाव मुसर्रतबानो इम्रान खान पठाण असे होते आता माझे नवीन नाव **मुसर्रतबानो रऊफ पठाण** असे झाले आहे.**आधार क्रमांक ४२७१ ७९५१ ७०१६ नुसार**

### ज्योतिष

गायत्री ज्योषित- जन्म कुंडली, कुंडली मिलान, कुंडलीवरून भविष्य कथन, खासगी त्रासावर उपाय. **संपर्क-** ज्योतिषाचार्य, कमलेश शास्त्री, इंद्रकुंड, नाशिक. ९१५६१७८९६९

### पाहिजेत

कारसाठी अनुभवी, निर्व्यसनी - नासिकरोड रहिवासी ड्रायव्हर पाहिजे. **अर्जासह भेटा-** कागज पॅकेजिंग प्रा. लि. ३ रा मजला, स्टार झोन मॉल, पासपोर्ट ऑफिसच्यावर, नासिकरोड.

### कर्जविषयक

होम लोन-कॅश सॅलरी असेल, आई.टी.रिटर्न नसेल, कुठलीही अडचण असेल तरीही सिडको, म्हाडा, नाशिकमधील कुठलेही घर घेण्यासाठी, घेतलेल्या घरावर शासकीय/प्रायव्हेट बँकेचे होम लोन करून मिळेल.

**संपर्क- ७०५८६५१९३९, ७२४९२७५९४४, ७०२८८४१९३९, ८४८२९५०७०८**

पत्ता-होम लोन एक्सपर्ट- देविका कन्सल्टन्सी, पवननगर, सिडको, नाशिक.

### नशा मुक्ती

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ... दारु...अंमली पदार्थ... गॅरेंटेड सुटण्यासाठी. **डॉ.पालवे-** (9552619752) व्यसन+ टेन्शन + भिती + चिंता+ नैराश्य + हस्तकंप+ निद्रानाश... **(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर डॉ.पालवे-नशामुक्ती...)**

## महत्त्वाचे

### बेदम मारहाणीत शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू

**कल्याण:** तालुक्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. शेतीच्या वादातून केलेल्या मारहाणीत गंभीर दुखापत झालेल्या शेतकऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झालाय. या प्रकरणी टिटवाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करत तिघांना अटक करण्यात आली आहे.मिळालेल्या अधिक माहितीनुसार, शेतीच्या वादातून काही दिवसांपूर्वी एका गटाकडून दुसऱ्या शेतकरी कुटुंबांला बेदम मारहाण करण्यात आली होती. या मारहाणीत गंभीर जखमी झालेले शेतकरी चांगदेव बनकर व त्यांच्या पत्नीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले होते. चांगदेव यांना वाचवण्यासाठी डॉक्टरांनी शर्थिचे प्रयत्न केले. मात्र उपचारा दरम्यान प्रकृती खालवल्याने चांगदेव यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी टिटवाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तीन जणांना अटक करण्यात आलीये. चांगदेव यांना मारण करणाऱ्या अन्य साथीदारांना देखील अटक करावी अशी मागणी सांगदेव बनकर यांच्या कुटुंबीयांनी केलीये.

### पुण्यात कोयता गँगचा राडा सुरू

**पुणे :** निवडणुकीच्या तोंडावर शहरात सलग चार गोळीबाराच्या घटना घडल्या. त्यानंतर बिबवेवाडी भागात मध्यरात्री टोळक्याने दहशत माजवून वाहनांची तोडफोड केल्याची घटना घडली. तोडफोड प्रकरणात अल्पवयीन मुले सामील झाल्याचे उघडकीस आले आहे. टोळक्याने एक मोटार, चार रिक्षांची तोडफोड केली. याबाबत धोंडीराम महादेव रावळ (वय ५३) यांनी बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी सहा ते सातजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरात गेल्या आठवड्यात गोळीबाराच्या सलग चार घटना घडल्याने कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. गुरुवारी मध्यरात्री टोळक्याने बिबवेवाडी भागात कोयते उगारून दहशत माजविली. टोळक्याने एक मोटार, चार रिक्षांच्या काचा फोडल्या, तसेच रस्त्यात लावलेल्या दुचाकींना धक्का देऊन पाडल्या.या घटनेमुळे परिसरात घबराट उडाली आहे. एकमेकांकडे पाहण्याच्या वादातून टोळक्याने तोडफोड केल्याची माहिती मिळाली आहे. याप्रकरणी पोलिसांनी तपास सुरू केला असून, तिघांना ताब्यात घेतले. तोडफोडीत अल्पवयीन मुले सामील असल्याची माहिती मिळाली आहे.

### समूह विद्यापीठ योजनेला राज्यभरातून अल्प प्रतिसाद

**पुणे :** उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या समूह विद्यापीठाच्या योजनेला राज्यभरातून थंड प्रतिसाद मिळाल्याचे चित्र आहे. आतापर्यंत या योजनेअंतर्गत राज्यभरातून केवळ दोनच संस्थांचे प्रस्ताव दाखल झाले आहेत. त्यामुळे राज्यातील नामांकित शिक्षण संस्थांनी समूह विद्यापीठ स्थापनेसाठी पुढाकार घेतल्याचे अद्याप दिसून येत नाही. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये 'समूह विद्यापीठ' ही संकल्पना मांडण्यात आली आहे. तसेच 'विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये' ही संकल्पना मोडीत काढून २०३५ पर्यंत सर्व शिक्षणसंस्था या पदवी प्रदान करणाऱ्या संस्था, म्हणजेच विद्यापीठे व्हावीत असे उद्दिष्ट आहे. सध्या विद्यापीठांना संलग्नित महाविद्यालयांचे नियमन करावे लागते. समूह विद्यापीठांमुळे शासकीय विद्यापीठांवरील महाविद्यालयांचा भार कमी होणे अपेक्षित आहे. त्या दृष्टीने समूह विद्यापीठांची कल्पना पुढे आली. सध्या राज्यात तीन समूह विद्यापीठे अस्तित्वात आहेत. समूह विद्यापीठ धोरणाअंतर्गत उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मार्गदर्शक सूचना तयार केल्या. त्यानुसार आरोग्य आणि कृषी वगळता इतर सर्व पारंपरिक, व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये समूह विद्यापीठात समाविष्ट होऊ शकतात.

### गडचिरोली जिल्ह्यात रानटी हत्तीचा धुमाकूळ; हल्ल्यात तीन महिला गंभीर

**गडचिरोली :** जिल्ह्यात रानटी हत्तीने पुन्हा धुमाकूळ घातला असून भामरागड तालुक्यातील कियर येथील एका शेतकऱ्यास दुपारी ठार केल्यानंतर रात्री त्याच रानटी हत्तीने हिदूर गावात धुडगूस घालून तीन महिलांना गंभीर जखमी केले. महारी देवू वड्डे (५०), राजे कोपा आलामी (५०) आणि वंजे जुरू पुंगाटी अशी जखमी महिलांची नावे आहेत. यातील दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. महिनाभरापूर्वी कळपातून भरकटलेल्या या हत्तीने तेलंगणा राज्यात दोन शेतकऱ्यांना ठार करून तीन दिवसांपूर्वी भामरागड तालुक्यात प्रवेश केला. काल पहाटे या तालुक्यातील कोसफुंडी गावात सर्वप्रथम हत्तीचे दर्शन झाले. त्यानंतर तो कारमपल्ली-टेकला जंगलात गेला. त्यानंतर दुपारी ४ वाजताच्या सुमारास कियर येथील शेतशिवारात काम करीत असलेल्या गोंगलू तेलामी नामक शेतकऱ्याला पायाखाली तुडवून ठार केले. त्यानंतर हा हत्ती त्या भागातून पसार होऊन आरेवाडा परिसरातील हिदूर या गावात गेला. याठिकाणी सायंकाळी साडेसात वाजताच्या सुमारास सुरु असलेल्या माता पूजनाच्या कार्यक्रमात त्याने धुडगूस घालून महारी वड्डे, राजे आलामी व वंजे पुंगाटी यांना गंभीर जखमी केले. तिन्ही महिलांना भामरागड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### बस-कारची समोरासमोर धडक; अपघातात मुलीचा मृत्यू, चार जण जखमी

**नंदुरबार-** विसरवाडी रस्त्यावरील वडदा गावाच्या शिवारात असलेल्या वळण रस्त्यावर कार आणि एसटी बसची समोरासमोर धडक झाली. अमळनेरहून सुरतच्या दिशेने जाणारी कार भरघाव येत असताना वडदा गावाच्या शिवारात वळणावर कार व समोरून येणारी गुजरात आगाराची बस यांच्यात समोरासमोर जोरदार धडक झाली. यात कारच्या पुढील भागाचा चक्काचूर झाला. यामध्ये जिग्निशा रवींद्र जाधव या बालिकेला मृत्यू झाला. तर चार जण गंभीर जखमी झाले.

### दोन मुलींसह महिला बेपत्ता

**हडपसर:** कोमल सुधाकर थोरात (वय २७, रा. महंमदवाडी, हडपसर) ही महिला समीक्षा (वय ६) व वेदिका (वय ३) या आपल्या मुलींसह हडपसरमधून बेपत्ता झाली आहे. याबाबत तिचे पती सुधाकर थोरात यांनी हडपसर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. कोमल दहावीपर्यंत शिकलेली असून तिला मराठी व हिंदी भाषा येते. उंची पाच फूट असून रंग सावळा आहे. कोणाला माहिती मिळाल्यास हडपसर पोलिस ठाण्यात कळवावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### रेशन दुकानदाराला जाब विचारणाऱ्या माजी नगराध्यक्षाविरोधात गुन्हा दाखल

**पनवेल :** नवीन पनवेल वसाहतीमधील रेशनदूकानावर कमी उत्पन्न असूनही रेशन मिळत नसल्याने दूकानदार व कार्डधारक यांच्यात जुंपली. पनवेल नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष सूनील घरत आणि त्यांचे १० सहकारी कार्डधारकांसोबत जाब विचारण्यासाठी गेल्यावर दूकानदाराला शिविगाळ व मारहाणीचा प्रकार गुरुवारी रात्री घडला. याबाबत मध्यरात्री माजी नगराध्यक्ष घरत आणि त्यांच्या सहकाऱ्यांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला. लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता सूरु आहे. आचारसंहिते दरम्यान राजकीय पक्षांच्या नेत्यांचा दबाव सरकारी लोकसेवक जुमानत नाहीत. नवीन पनवेल वसाहतीमधील सेक्टर १३ येथील जनता मार्केटमध्ये रोशन किर्तीकर यांचे रेशनदूकान आहे.

### उरण परिसरात गावदेवांच्या जत्रा सुरू

**उरण :** चैत्र महिन्यात ग्रामीण भागातील सध्या ग्रामदैवत, देवीदेवतांच्या यात्रा-जत्रा यांची उरण तालुक्यात सुरुवात झाली आहे. यासाठी पारंपरिक शासनकाठ्या, कुटुंबातील व्यक्तींच्या सामूहिक भोजनाच्या मेजवऱ्या यांची चंगळ असते. यात न्हावा गावची ग्रामदेवता गावदेवीचा यात्रा उत्सव बुधवारी २३ तर पालखी सोहळा २४ एप्रिल रोजी पार पडला. समुद्रकिनाऱ्यावरील डोंगरातील निसर्गाच्या सान्निध्यात मंदिरात विराजमान असलेल्या न्हावा ग्रामस्थांचे ग्रामदैवत असलेल्या गावदेवीवर भाविकांची अपार श्रद्धा आहे. या श्रद्धेमुळे दरवर्षी गावदेवीच्या यात्रा-पालखी सोहळ्यासाठी अनेक तालुक्यांतील ५०-६० हजार भाविकांची दर्शनासाठी गर्दी उसळते. आबालवृद्ध भाविकांच्या मनोरंजन, विरंगुळ्यासाठी वेगवेगळ्या तऱ्हेची दुकाने, आकाशपाळणे यांची मोठी रेलचेल असते.



# मालेगावात मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी धर्मगुरू सरसावले

## मनपात बैठक; मतदान करण्याचे आवाहन

**मालेगाव : प्रतिनिधी**

मालेगाव शहरातील धर्मगुरू व संस्थेचे पदाधिकारी यांना मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन करण्यात आले. आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. आयुक्त तथा प्रशासक रविंद्र जाधव यांचे मार्गदर्शनाखाली उपायुक्त गणेश शिंदे यांनी बैठकीचे आयोजन केले होते.

या बैठकीत शहरातील कुलजमाती तनजीम, निगराह मालेगाव ता.दावते इस्लमी हिन्दं, दाऊदी बोहरा रोशन खयाल, जमाते इस्लामी हिन्दं, जमिअत शिया असना हुसैनी मस्जिद, रजा कॅडमी,जमिअत अहले हदीस, सुन्नी जमि उल्मा, रहेमान फाऊंडेशन, जमिअत-ए-उल्मा सुलेमानी चौक, सुन्नी दावते इस्लाम, जमिअत-ए-उल्मा मदनी रोड, हजर मौलाना मोहम्मद उमरैन महफुज रहेमानी ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल बोर्ड या सर्व संस्थेच्या धर्मगुरू सहभागी झाले होते.यावेळी उपायुक्त शिंदे यांनी मालेगाव शहरातील आगामी लोकशाहीच्या सर्वात मोठ्या उत्सव पर्वात अर्थात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत सर्व कुलजमाती संस्थेच्या धर्मगुरू यांनी स्वतः सक्रिय सहभाग घेऊन आपल्या घरातील, परिसरातील, मस्जिद मध्ये नमाज पठणासाठी येणा-या शहरातील नागरिकांना मतदान करण्यासाठी आवाहन करावे व आपण सर्वांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावुन राष्ट्रिय कर्तव्य पार पाडावे याबाबत माहिती देण्यात आली. मनपा निवडणुक विभागामार्फत मतदान जनजागृतीचे पोस्टर्स देण्यात येईल व ते आपण आपले परिसरातील दर्शनी भागात लावावेत सुचना केली तसेच आगामी लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले.भारत सरकारने जाहिर केलेले वोटर हेल्पलाईन प्सबाबत माहिती यावेळी देण्यात आली. प्रशासन अधिकारी चंद्रकांत पाटील, नगरसचिव साजिद अन्सारी, निवडणुक विभाग प्रमुख अनिल कोठावदे, मालेगाव शहरातील धर्मगुरू डॉ.अन्सारी एकलाख, डॉ.रहिस अहमद, हाफिज अनिस शेख, सुफयान जमाली, सादेन अन्सारी, जमिल मशिऊल्ला, शाहिद एकबाल मो.रमजान, मो. आमीर यासीन मिल्ली, मुफ्ती अताऊरहेमान, जैद अन्सारी, जियाऊ रहेमान, शेख अकबर, जुबैर अहमद, आकीब जुनैद, हिफजुरहेमान तसेच निवडणुक, व जनसंपर्क विभागाचे कर्मचारी इम्तियाज अहमद, अनिल सांगळे, दत्तु घुगे, गौरव पवार, सचिन पिंगळे, उदय आहिरे, आप्पासाहेब आहिरे, शाकीर बेग इ.कर्मचारी उपस्थित होते.जनसंपर्क अधिकारी पंकज सोनवणे सुत्रसंचलन केले. सहा.आयुक्त शेख मो.तौसीफ यांनी आभार मानले.

# वैभव देवरेला न्यायालयीन कोठडी इंदिरानगर पोलीस पुन्हा ताबा घेणार

**नाशिक : प्रतिनिधी**



खासगी सावकार वैभव देवरे याला न्यायालयीन कोठडी मंजूर झाल्याने त्याची रवानगी मध्यवर्ती कारागृहात करण्यात आली आहे. दरम्यान, इंदिरानगर पोलीस इतर गुन्ह्याच्या तपासासाठी त्याला पुन्हा अटक करणार आहे.

देवरे याच्यावर मागील तीन आठवड्यांपासून पोलिसांच्या चौकशीचा ससेमिरा लागला आहे. अवैधरित्या सावकारी करुन कर्जदारास तीन लाख रुपये देत त्याच्याकडून बारा लाख रुपये वसुल केले. या घटनेनंतर पाच तक्रारदार समोर आले. त्यात एका महिलेने देवरेवर जबरी चोरी, दमदाटी व विनभंगाची फिर्याद दिली. या दुसऱ्या गुन्ह्यात त्याला दुसऱ्यांदा अटक झाली होती. त्याच्याकडे तपासात पोलीसांना महत्त्वाची माहिती मिळाली असून त्याअनुषंगाने तपास सुरु आहे. दरम्यान, वरील गुन्ह्यात देवरेच्या पोलीस कोठडीची मुदत (दि. २६) रोजी संपल्याने त्याला तपास पथकाने न्यायालयात हजर केले. त्यानंतर सुनावणी होऊन न्यायालयाने देवरेची न्यायालतीन कोठडी मंजूर करत त्याला तुरुंगात दाखल करण्याचे आदेश दिले. तर, देवरेच्या पत्नीसह इतर संशयितांनी दाखल केलेल्या अटकपूर्व जामीनाच्या अर्जावर सोमवारी सुनावणी आहे.

# शारदाई पुरस्काराचे ५ मे रोजी वितरण

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

येथील शारदा बहुद्देशीय संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्ताने रविवारी (दि.५) सायंकाळी पाचला शारदाई पुरस्काराचे वितरण होणार आहे. जेलरोड मॉडेल कॉलनीतील गणेश मंदिरात हा कार्यक्रम होईल, अशी माहिती अध्यक्षा जयश्री जांभळे, उपाध्यक्ष सी. पी. मिश्रा, कार्याध्यक्ष रजनी बारसे यांनी दिली. अलका कुलकर्णी, तारा ठाकरे यांच्याहस्ते सुरेखा बो-हाडे, संगीता फुके, अनघा धोडपकर, संयुक्ता कुलकर्णी, लिना जोशी, सुमन मुठे, ज्योती अष्टपुत्रे, हिरा वकारे, चारुशिला लाठी यांना पुरस्कार दिले जातील. महेंद्र गायकवाड, सचिव अलका कोठावदे, प्रशांत कापसे, रचना चिंतावर, राजेंद्र चिंतावर, रघुनाथ कोठावदे, जालिंदर गायकवाड, भावना विसपुते, सविता पोतदार, पांडुरंग कुलकर्णी संयोजन करत आहेत.

# पथनाट्यातून नवमतदारांची करणार जनजागृती

## पालिकेडून विविध उपक्रमांद्वारे मतदानाची टक्केवारी वाढवण्यावर भर

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक लोकसभेची निवडणूक २० मे रोजी होणार आहे. शुक्रवार पासून (दि.२६) अर्ज स्विकृतीला सुरवात झाली. दरम्यान नाशिक महानगरपालिकेने नवमतदारांनी मतदान प्रक्रियेत जास्तीत-जास्त संख्येने घराबाहेर पडून मतदानाचा पवित्र हक्क बजवावा. याकरिता विविध उपक्रमाद्वारे महापालिका प्रशासनाकडून प्रयत्न केले जाणार आहे. महत्वाचे म्हणजे पथनाटयाच्या माध्यमातून नवमतदारांना मतदान करण्यासाठी प्रवृत्त करण्याबरोबरच त्यांना साद घातली जाणार आहे.

लोकसभेच्या निवडणुकीच्या पाश्वफभूमीवर जिल्हा प्रशासनाबरोबरच आता महापालिका प्रशासन कामाला लागले आहे. मतदानासाठी विविध उपक्रम हाती घेतले जाणार आहेत. दरम्यान लोकसभा निवडणूक २०१९ ची मतदानाची टक्केवारी निहाय माहिती घेत त्याची तपासणी केली जात आहे. ज्या मतदान केंद्रांवर अतिशय कमी (टक्केवारी निहाय) मतदान झाले, अशा १०० मतदान केंद्र परिसरात कर्मचाऱ्यांनी समक्ष भेट द्यावी. तेथील नागरिक, मतदार यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना मतदानाचे कर्तव्य बजावण्यासाठी त्यांचे प्रबोधन करून जनजागृती करणे. त्या भागांमध्ये किमान ८५ टक्के मतदान होईल यासाठी प्रयत्न करावे. अशा सुचना देण्यात आल्या आहेत. त्या दृष्टिने मनपा अधिकारी, कर्मचारी कामाला लागले आहेत. मतदान जनजागृतीसाठी सेलिब्रिटी, ब्रँड अम्बॅसेडर यांची मुलाखत घेणे. डिजिटल स्क्रीन डीसप्ले, त्या सोशल मिडियावर टाकणे, मनपाच्या सर्व हॉस्पिटलमध्ये मतदान माहितीचे बॅनर, पोस्टर्स लावणे इत्यादी कामांची विभागणी करण्यात आली आहे.

प्रत्येक मतदान केंद्रावर जाऊन अहवाल मागविणे याबाबतची जबाबदारी महापालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर देण्यात आली आहे. शिवाय मनपाच्या विविध विभागांना निवडणूक विषयांतर्गत कार्यक्रमांसाठी होर्डिंग, बॅनर, पॉम्पलेट, बोर्ड यांच्या साहित्याची विभागणी करणे. सोशल मिडियाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे.

### दिव्यांग, ज्येष्ठांना केंद्रावर सुविधा

महापालिकेच्यावतीने मतदान केंद्रांवर दिव्यांगांसाठी रॅम्प तयार करणे, मतदारांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, दिव्यांगासाठी व्हील चेअर, मतदान केंद्राजवळ लागून असलेली पार्किंग व्यवस्था, प्रवेश व्यवस्था (इन–आउट), बॅरिकेटिंग, ८० वर्षांच्यावरील वयोवृद्धांसाठी गृहमतदानाची सोय करणे, महापालिका शाळांमध्ये जेथे मतदान केंद्रे असतील तेथे स्वच्छता मोहीम राबविणे, वीजजोडणी करणे, आदी सुविधा मतदान केंद्रावर दिल्या जाणार आहेत.

# देवळालीत मतदान जनजागृती मोहीम

**देवळाली कॅम्प : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने २१ नाशिक लोकसभा व १२६ देवळाली विधानसभा(अ. जा) मतदारसंघातील (मतदान जनजागृती) कार्यक्रमांतर्गत दिनांक २४ व २५ एप्रिल २०२४ रोजी कॅन्टोन्मेंट बोर्ड हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज देवळाली कॅम्प यांच्यावतीने, तसेच शाळेतील प्राचार्य विष्णू वाघ, पर्यवेक्षिका राजश्री खैरनार, प्रमोद वैद्य , माधव कुटे , रामचंद्र गवळी , सौरभ देवरे सर शिक्षकेतर कर्मचारी, बीएलओ या सर्वांनी कॅन्टोन्मेंट बोर्ड परिसरातील वार्ड क्रमांक एक व दोन मधील मतदारांच्या जनजागृतीसाठी इच्छामणी गणपती मंदिर, जुने बस स्थानक, रिक्षा स्टॅन्ड ,सार्वजनिक ग्रंथालय इत्यादी ठिकाणी तसेच वार्ड क्रमांक एक व दोन मधील गृहभेट देऊन मतदारांना मतदान करण्यासाठी प्रेरित केले तसेच दिनांक २० मे २०२४ रोजी सकाळी सात ते पाच या वेळात आवर्जून मतदान करण्याचे आवाहन केले.




# सुहास वैद्य स्मृती चषक महाराष्ट्र राज्य ब्रीज अजिंक्यपद स्पर्धेला सुरुवात

**नाशिक : प्रतिनिधी**

ब्रीज असोसिएशनच्या वतीने आणि महाराष्ट्र ब्रीज असोसिएशन यांच्या सहकार्याने आणि मार्गदर्शनाखाली नाशिकच्या केन्सिगटन स्पोर्ट्स क्लब चानसी, गंगापूर रोड, नाशिक येथे सुहास वैद्य स्मृती चषक ४४ व्या महाराष्ट्र राज्य ब्रीज अजिंक्यपद स्पर्धे ला मोठ्या उत्साहात सुरवात झाली. या स्पर्धेच्या उद्घाटन मित्र विहार स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष विनोद कपूर यांच्या हस्ते आणि भारतीय ब्रीज फेडरेशनचे सहसचिव आनंद सामंत,महाराष्ट्र ब्रीज असोसिएशनचे उपाध्यक्ष अविनाश देशपांडे, सचिव हेमंत पांडे, नाशिक ब्रीज असोसिएशन चे अध्यक्ष मोहन उकिडवे, सचिव डॉ. अतुल देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातून बावीस संघाच्या १२६ स्पर्धकांनी सहभाग नोंदवून उत्तम प्रतिसाद दिला आहे.



या स्पर्धेत टीम ऑफ फोर (सांघिक स्पर्धा) आणि पेअर्स (जोडी) या दोन प्रकारांचा समावेश आहे. आज टीम ऑफ फोर या सांघिक स्पर्धा स्पर्धांना सुरवात झाली. या स्पर्धेत सात बोर्डचे आठ राऊंड खेळविले जाणार आहेत. या आठ राऊंड नंतर गुणानुक्रमे पाहिले आठ संघ दुसऱ्या टप्प्यासाठी पात्र ठरणार आहेत. तर उरलेल्या १४ संघातील खेळाडूंना पेअर (जोडी) या प्रकारात खेळण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धेत राष्ट्रिय आणि आंतर राष्ट्रीय स्पर्धेत पदक प्राप्त केलेल्या खेळाडू सोबत काही शाळेचे युवा खेळाडू सहभागी झाले आहेत. त्यामूळे या युवा खेळाडूंचा चांगल्या दर्जेदार खेळाडू सोबत खेळण्याची संधी आणि अनुभव महत्त्वाचा ठरणार आहे.

तिसऱ्या राऊंडनंतर पाच व्या क्रमांकावर असलेल्या सुनील माचोर, विजय फातरफेकर, मिलिंद आठवले, अरुण बापट, गोपीनाथ मन्ना आणि अनिल पाध्ये या दर्जेदार खेळाडूंचा समावेश असलेल्या सुनील माचोर संघाने चवथ्या राऊडमध्ये सुंदर खेळ करून ५६. ८६ गुण मिळवून दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. तर रुईया ब्लेझर्स संघाने (५६.. २४) आणि एस, बी. एस. (५४. ९९) या संघानी अनुक्रमे तिसऱ्या आणि चवथ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. त्याखालोखाल श्री राधे ,संघ जेरेजा संघ, मयेकर संघ, मयेकर संघ, अम्ब्रोझा, बालक संघ आणि सरप्राईझ संघ यांनीही चांगला खेळ करून पाच ते दहा या क्रमांकावर झेप घेतली आहे. अर्थात आणखी तीन राऊंड बाकी असल्यामुळे यामध्ये काही बदल होणे अपेक्षित आहे. महाराष्ट्र ब्रीज असोसिएशनचे चेअरमन देवेन दोषी, उपाध्यक्ष डॉ. अविनाश देशपांडे, सचिव हेमंत पांडे, आनंद सामंत, डॉ. अविनाश देशपांडे, अनिरुद्ध सांझगिरी, या स्पर्धे चे स्पर्धा चेअरमन विनोद कपूर, स्पर्धा सचिव डॉ. अतुल देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा खेळविली जात आहे.

या स्पर्धेसाठी स्पर्धा प्रमुख (कॉम्पटिशन डायरेक्टर) म्हणून भालचंद्र दक्षिणदास तर बोर्डचे काम चेतन रावल आणि संगणकीय गुणलेखकाचे महत्वाचे काम विश्वनाथ बेडिया यशस्वीपणे सांभाळत आहेत.

ASHOKA
ASHOKA EDUCATION FOUNDATION
SCHOOL BUSES & CAR FOR SALE
Available for sale, 2010 model diesel school buses 40 seater (Eicher Motors-Model 10.90 Skyline) and 2010 model Car (Maruti swift Dzire VXI Petrol), In good condition.
Only genuine buyers may contact to :
Ashoka Education Foundation
Ashoka Marg. Mob. No: 9881065345

टायटल व्हेरीफिकेशन नोटीस
तमाम लोकांस कळविण्यात येते की,
मिळकतीचे वर्णन :- तालुका जिल्हा नाशिक, पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील मौजे पंचक या गांवचे शिवारातील मिळकत यांसी सर्व्हे नं.९१/२ (सिटी सर्व्हे नं.१७१९) यांसी प्लॉट नं.१९, २०, २१ यांसी एकूण क्षेत्र ९००-०० चौ.मी. या मिळकतींवर बांधलेल्या ईश्वर को.ऑप.हौ.सोसा.लि. या इमारती मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं.१०९ यांसी क्षेत्र २५-८३ चौ.मी. बांधीव क्षेत्र यांसी चतु:सिमा मंजुर बांधकाम नकाशाप्रमाणे.
सदर फ्लॅट मिळकत ही श्री.उत्तम दामोदर पवार व सौ.कमल उत्तम पवार यांचे स्वकष्टार्जित मालकीची व कब्जेवहिवाटीत असून सदर मिळकत त्यांनी दि.०७/०४/२०१७ रोजी ईश्वर को.ऑप.हौसिंग सोसायटी लि. या गृहनिर्माण संस्थेकडून ॲलॉटमेंट डिड ने खरेदी केलेली आहे. सदर नोंदणीकृत दस्ताचा रजि.नं.नसन-२-२०७१-२०१७,दि.७/४/२०१७ असून तेव्हापासून सदर मिळकत श्री.उत्तम दामोदर पवार व सौ.कमल उत्तम पवार यांचे कब्जेवहिवाटीत आहे. त्याअनुषंगाने सदर मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटला श्री.उत्तम दामोदर पवार व सौ.कमल उत्तम पवार यांचे नांव तबदिल आहे. संस्थेने त्यांच्या नावे ५०/- रु. किंमतीचे ९६ ते १०० असे एकूण पाच शेअर्स ॲलॉट केलेले आहे. दि.२०/०४/२०२१ रोजी सौ.कमल उत्तम पवार यांचे निधन झालेले आहे. मयत कमल उत्तम पवार यांना १) श्री.उत्तम दामोदर पवार (पती), २) मच्छींद्र उत्तम पवार (मुलगा), ३) सौ.राजेश्वरी राकेश ढिकले (मुलगी) (लग्नानंतरचे नांव) असे तीनच वारसदार आहेत, असे प्रतिज्ञापत्र वारसदार या नात्याने त्यांनी ईश्वर को.ऑप.हौ. सो.लि. या संस्थेस सादर केले आहे.सदर प्राप्त झालेल्या हक्का वरून वारसदार यांनी आमचे पक्षकाराशी मिळकत विक्री करणेकामी व्यवहार नक्की केलेला आहे. सबब, वरील मिळकतीच्या निर्वेधपणाची खात्री करणेकरीता प्रस्तुतची टायटल व्हेरीफिकेशनची जाहीर नोटीस प्रसिध्द करणेत येत आहे. सबब सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध, कब्जा, बोजा, गहाण, दान, लिन, लिज, कोर्टवाद, अन्नवस्त्र अथवा त्या संबंधीचा इतर कोणताही तत्सम व्यवहार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांचे आत सर्व साक्षांकीत कागदपत्रांनिशी आमचे ऑफीसमध्ये येवून लेखी हरकती नोंदवाव्यात. मुदतीत हरकती न नोंदविल्यास सदर मिळकत निर्विवाद, बोजारहीत व तबदिल करणे योग्य आहे, असे समजण्यात येईल व त्या अनुषंगाने आमचे पक्षकार मिळकत खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या व परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्या मिळकतीवर व आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.
कळावे, ही जाहीर नोटीस. नाशिक. दि.२५/०४/२०२४.
ॲड.रुपाली सुनिल मराठे
मराठे असोसिएटस् टॅक्स कन्सलटन्ट व लिगल ॲडव्हायजर
१०,ओम शांतीवन हौ.सोसा.,लॅम रोड,नाका नं.६,देवलाली कॅम्प,ता.जि.नाशिक

# आजकालच्या कवितांची लय हरवलीय : कोळगावकर

## 'पुस्तकावर बोलू काही' उपक्रमात प्रतिपादन

**नाशिक : प्रतिनिधी**

खेड्यातील निसर्ग वेगळा असतो. तिथली प्रतीकं वेगळी असतात. जुन्या कविता लयबद्ध असल्यामुळे त्या आजही मनात रुंजी घालतात. आजच्या कवितेत ती लय आढळत नाही. ही बाब कवितेसाठी घातक आहे, असे विचार नाशिक आकाशवाणीचे माजी केंद्रसंचालक आणि ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कोळगावकर यांनी मांडले.

येथील गिरणा गौरव प्रतिष्ठानतर्फे सुरू असलेल्या 'पुस्तकावर बोलू काही' या उपक्रमात 'तळपाणी' या साहित्यकृतीवर त्यांनी हुतात्मा स्मारकात संवाद साधला. प्रसिद्ध साहित्यिक मधुकर गिरी अध्यक्षस्थानी होते. श्री.कोळगावकर पुढे म्हणाले की, मी सर्व प्रकारच्या कविता लिहिल्या आहेत. त्यात सातत्यही ठेवले आहे. साहित्य दर्जेदार असेल तर त्याची दखल घेतली जातेच. याचा अनुभव अगदी सुरुवातीच्या काळात घेतला. माझ्या कवितांचे विषयही वेगवेगळे आहेत.




सर्वच वयोगटातील वाचकांसाठी मी सातत्याने लिहीत असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, काल्पनिक साहित्य लिहिण्याच्या त्या काळात डॉ.आनंद यादव यांनी अनुभवावर लिहिण्याचा सल्ला दिला.

तेव्हापासून मी अनुभव आणि प्रसंगांनुरूप लिहू लागलो. ना.धों.महानोर, श्री.पु.भागवत अशा ज्येष्ठ साहित्यिकांच्या आठवणी सांगतानाच त्यांनी आपल्या 'तळपाणी' या कविता संग्रहाचा प्रवास यावेळी मांडत काही कविता सादर केल्या. रत्नप्रभा वाघ आणि दिगंबर काकड या भाग्यवान श्रोत्यांना ग्रंथभेट देण्यात आली. सूत्रसंचालन वैजयंती सिन्नरकर यांनी केले तर आभार अलका दराडे यांनी मानले. दरम्यान, या उपक्रमात येत्या मंगळवारी (दि.३०) प्रख्यात लेखिका प्रा.सुमती पवार ह्या 'चला कापडण्याला...' या साहित्यकृतीवर आपले विचार मांडणार आहेत.

## महत्त्वाचे

### रेडक्रॉस दिनानिमित्त शालेय खुल्या गटासाठी निबंध स्पर्धा

**नाशिक : वार्ताहर**

इंडियन रेडक्रॉस सोसायटी, नाशिकच्या वतीने जागतिक रेडक्रॉस दिनानिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धा दहावीपर्यंतचे शालेय विद्यार्थी आणि खुल्या अशा दोन गटांत होईल. शालेय गटासाठी 'रेडक्रॉस संस्थापक सर हेनरी ड्युनांट यांचे स्फूर्तिदायी चरित्र' तर खुल्या गटासाठी 'रेडक्रॉसच्या कार्याचे आजच्या काळातील महत्त्व' असे विषय ठेवण्यात आले आहेत. शालेय गटासाठी पाचशे शब्द तर खुल्या गटासाठी आठशे शब्दांची मर्यादा राहील. स्पर्धकांनी आपले निबंध जेपीजी अथवा पीडीएफ फाइलच्या रूपात ८२०८११२०८८ या व्हॉट्सअॅप नंबरवर ४ मेपर्यंत पाठवावेत. स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक सन्मानचिन्हे देऊन गौरवण्यात येईल. स्पर्धेचे सविस्तर नियम व अधिक माहितीसाठी ९४२२२४८३८० या क्रमांकावर संपर्क साधावा.

### आज रविराज गंधे यांचे व्याख्यान

**नाशिक : प्रतिनिधी**

सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने पुस्तक मित्र मंडळाचे व्याख्यान शनिवार दि. २७ रोजी सायं. ५.३० वा. स्वा.सै. गो. ह. देशपांडे उद्यान वाचनालय, गंगापूर रोड शाखा, नेर्लीकर हॉस्पिटलजवळ, उदयनगर लेन येथे आयोजित केले आहे. ''माध्यमयात्रेतील माणसं'' या स्वलिखित पुस्तकावर लेखक रविराज गंधे हे आपले मनोगत व्यक्त करणार आहेत. तरी या व्याख्यानाचा लाभ नाशिककर नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके, उपाध्यक्ष वैद्य विक्रांत जाधव, डॉ. सुनील कुटे, कार्याध्यक्ष अॅड. अभिजित बगदे, प्रमुख सचिव देवदत्त जोशी, सहा. सचिव जयेश बर्वे, पुस्तक मित्रमंडळाचे प्रमुख मंगेश मालपाठक व समिती सदस्य रमेश कडलग, सुभाष सबनीस, सुहास टिपरे तसेच सावाना कार्यकारी मंडळाने केले आहे.

# अमेरिका, युरोपला जास्त उच्चांकी निर्यात

**लासलगाव : समीर पठाण**

यंदाच्या द्राक्ष हंगामात पंधरा एप्रिलपर्यंत देशातून १,८१,३९६ टन द्राक्ष निर्यात झाली आहे. अमेरिका युरोपियन युनियनला उच्चांकी १,३१,४२१ टन, तर अन्य देशांना ५०,१९५ टन द्राक्ष निर्यात झाली आहे. अमेरिका आणि युरोपियन युनियनला सरासरी ९० हजार ते एक लाख टन निर्यात होते.

राज्याच्या कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार एक नोव्हेंबर २०२३ ते १५ एप्रिल २०२४ पर्यंत देशातून १,८१,३९६ टन द्राक्ष निर्यात झाली आहे. त्यात अमेरिका आणि युरोपियन युनियनला आजवरची उच्चांकी १,३१,४२१ टन द्राक्ष निर्यात झाली आहे. ही निर्यात प्रामुख्याने नेदरलँडला (हॉलंड) झाली आहे. अमेरिका आणि युरोपियन युनियन वगळता अन्य देशांना ५०,१९५ टन इतकी निर्यात झाली आहे. पण, या आकडेवारीत मुंबईतून झालेल्या निर्यातीचा समावेश नाही. मुंबईतून सुमारे ३० हजार टन निर्यात झाल्याचा अंदाज आहे.

इस्रायल-पॅलेस्टाइन युद्धामुळे लाल समुद्रातून होणारी वाहतूक विस्कळीत झाली आहे. त्यामुळे आफ्रिकेला वळसा घालून वाहतूक करावी लागत आहे. वाहतुकीच्या दरातही वाढ झाली होती. तरीही



> केंद्र सरकारने द्राक्ष निर्यातीसाठी नवनवीन बाजारपेठ शोधून आपल्याकडील शेतमाल जास्तीत जास्त कसा निर्यात होईल, याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. द्राक्षाच्या देशांतर्गत बाजारातील तसेच निर्यातीच्या बाजारातील असुरक्षितता मात्र कायमच आहे. सततचे प्रतिकूल वातावरण, वाढता उत्पादन खर्च आणि मजूर टंचाई या अडथळ्यांवर मात करीत द्राक्षपंढरीतील जिद्दी द्राक्ष उत्पादकांनी निर्यातीची झेप उंचावतच ठेवली आहे. गोड चवीच्या रसाळ व करकरीत द्राक्षांनी गुणवत्तेच्या जोरावर जागतिक बाजारात स्थान निर्माण केले.
>
> – **सुनील गवळी,** द्राक्ष बागायतदार, ब्राह्मणगाव (विं.)

अमेरिका आणि युरोपला यंदा उच्चांकी निर्यात झाली आहे. दरवर्षी अमेरिका आणि युरोपला सरासरी एक लाख टनांपर्यंत निर्यात होते. त्यात यंदा ३१ हजार टनांनी वाढ झाली आहे. भारतातून गेलेली जहाजे प्रामुख्याने नेदरलँडच्या किनारपट्टीवर जातात. तिथून गरजेनुसार युरोपात रस्तामार्गे वाहतूक होते. यंदा कॅनडाला होणाऱ्या निर्यातीला फटका बसला आहे. दरवर्षी कॅनडाला १३ टन वजनाचे ६० ते ७० कंटेनर जातात. यंदा जेमतेम १५ कंटेनर गेले आहेत. द्राक्ष निर्यात हंगाम आता अखेरच्या टप्प्यात आहे. अवकाळी पावसामुळे द्राक्षांचे नुकसान झाले आहे. तसेच लाल समुद्रातून वाहतूक बंद आहे, अन्यथा यंदा विक्रमी निर्यात झाली असती, अशी माहिती महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाचे अध्यक्ष शिवाजी पवार यांनी दिली.

दरवर्षी सरासरी अडीच लाख टन द्राक्ष निर्यात होते. यंदा निर्यातक्षम द्राक्षांची उपलब्धता चांगली होती. वाहतुकीत अडथळे होते, तरीही युरोपला उच्चांकी निर्यात झाली आहे. कॅनडात होणाऱ्या निर्यातीला फटका बसला. हंगामाच्या अखेरीस निर्यातीत सरासरी गाठू. वाहतुकीत अडथळे नसते तर यंदा चांगली निर्यात झाली असती, अशी माहिती निफाड येथील द्राक्ष निर्यातदार अक्षय सांगळे यांनी दिली.

**द्राक्षांना ११० रुपयांपर्यंत विक्रमी भाव**

यंदा द्राक्ष निर्यातीला नोव्हेंबर महिन्यात सुरुवात झाली. सुरुवातीला निर्यातीला दर ४० ते ५० रुपयांदरम्यान होता. हंगाम मध्यावर असताना ६० ते ६५ रुपये प्रति किलो दर होता. अखेरच्या टप्प्यात काही निवडक दर्जेदार द्राक्षांसाठी प्रतिकिलो ९० ते ११० रुपये दर मिळाला आहे.



## हिरे महाविद्यालयात इनोफेस्ट-२०२४ स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**नाशिक : प्रतिनिधी**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात संस्थेचे संवर्धक लोकनेते व्यंकटराव हिरे यांच्या जयंतीचे औचित्य साधत त्यांच्या स्मरणार्थ लोकनेते व्यंकटराव हिरे इनोफेस्ट -२०२४ स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते.

या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात मुख्य अतिथी म्हणून मनोगत व्यक्त करताना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. जोगेंद्र सिंग बिसेन यांनी वरील विधान केले. ते पुढे असेही म्हणाले की, संशोधन व एकंदरीतच शैक्षणिक क्षेत्रात महात्मा गांधी विद्यामंदिरचे मोठे योगदान आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० संशोधन आणि सर्जनशीलतेवर भर देते आणि महाविद्यालयाने या राष्ट्रीय मिशनसाठी एक व्यापक व्यासपीठ मिळवले आहे. प्राचीन भारतीय ज्ञान व्यवस्थेबाबत महात्मा गांधींच्या विधानाचा संदर्भ देत ते म्हणाले की, भारत ज्ञान आणि संशोधनाच्या क्षेत्रात कधीही मागे नव्हता. त्यांनी स्पर्धेतील तरुण सहभागींना आत्मविश्वासाने पुढे जाण्याचे आणि भारतातील तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणारे उद्योजक बनण्याचे आवाहन केले.

महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अधिसभा सदस्य मा. आ. डॉ. अपूर्व प्रशांत हिरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. अपूर्व हिरे यांनी पेटंट दाखल करणे आणि नवनवीन उपक्रमांचे व्यापारीकरण ही काळाची गरज असल्याचे सांगितले. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्वप्नातील भारत - २०२० चा संदर्भ देत त्यांनी निदर्शनास आणून दिले की, भारतातील तरुणांना जागतिक स्तरावर व्यापक आणि दीर्घ संधी आहे. भारत हा जागतिकदृष्ट्या तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने आमच्या तरुणांसाठी नोकरीच्या अनेक संधी खुल्या केल्या आहेत.

## दिंडोरी येथे सहा गाळे जळून २० लाखांचे नुकसान

**दिंडोरी : प्रतिनिधी**

येथील दिंडोरी-कळवण रस्त्यावरील नाईकवाडे यांच्या मालकीच्या गाळ्यांमध्ये शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीमध्ये सहा गाळे जळून खाक होऊन २० लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.



सविस्तर वृत्त असे की, दिंडोरी येथील नवीन मार्केट यार्ड समोरील नाईकवाडे यांच्या मालकीची नऊ गाळे आहेत. सकाळी शिवशंभू फूडचे मालक सूरज भेरड हे नेहमीप्रमाणे सकाळी ८ वाजता हॉटेल उघडण्यासाठी आले असता, त्यांना शेजारील त्र्यंबकराज ऑटोमोबाइल गॅरेजमधून धूर निघताना दिसला. त्यांनी तत्काळ गॅरेजचे मालक अजय जाधव यांना फोन करून सांगितले. त्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी एक तासाच्या अथक प्रयत्नांनी आग आटोक्यात आणली. पोलीस निरीक्षक रघुनाथ शेगर यांनी पाहणी करत पंचनामा केला.

लागलेल्या आगीत शिवशंभू फूड्सचे तीन लाख ८० हजार, त्र्यंबकराज ऑटोमोबाइल्स १५ लाख, साक्षी इंटरप्राइजेस एक लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. प्रथमदर्शनी शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचे दुकान मालकांचे म्हणणे आहे.

## अंजनेरी गडावर जपानुष्ठान सोहळ्याची उत्साहात सांगता

**ओझर : वार्ताहर**

निष्काम कर्मयोगी जगद्गुरू जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराजांच्या कृपाशीर्वादाने उत्तराधिकारी अध्यात्म शिरोमणी श्रीसंत सद्गुरू स्वामी शांतिगिरीजी महाराजांच्या प्रेरणेने व प्रमुख उपस्थितीत हनुमान जन्मोत्सवानिमित्त अंजनेरी गडावर आठवड्याभरापासून सुरू असलेल्या जपानुष्ठान सोहळ्याची सांगता जय बाबाजी..जय श्रीराम..जय हनुमान अशा प्रचंड जयघोषात करण्यात आली. श्री हनुमान जन्मोत्सवाच्या महापर्वकालावर अभिषेक पूजन, सत्संग, भजन करत जन्मोत्सव सोहळा भक्तिपूर्ण वातावरणात झाला.

श्रीराम भक्त हनुमंतरायाची जन्मभूमी असलेल्या अंजनेरी गडाचा सर्वांगीण विकास व्हावा, या एकाच उद्देशाने गेल्या वीस वर्षांपासून निष्काम कर्मयोगी जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज धर्मपीठाचे पीठाधिश्वर अनंतविभूषित समर्थ सद्गुरू स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने आणि प्रमुख



उपस्थितीत श्रीक्षेत्र अंजनेरी गड येथे आठवडाभर जपानुष्ठान व श्रीहनुमान जन्मोत्सवाचे प्रतिवर्षी मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात येते. याहीवर्षी आठवडाभर संपन्न झालेल्या या कार्यक्रमादरम्यान श्रीराम कथा, जपानुष्ठान, अखंड नंदादीप, हस्तलिखित नामजप, व्यसनमुक्ती संकल्प, यज्ञ, श्रमदान यांसह रोज पहाटे ब्रह्ममुहूर्तावर पाच वाजता नित्यनियम विधी, प्राणायाम, ध्यान, भागवत वाचन, महाआरती, सकाळ-सायंकाळ प्रवचन, सत्संग आदी भरगच्च कार्यक्रम झाले. प्रसिद्ध कथाकार अनंत महाराज वहाडणे यांच्या वाणीतून श्रीराम कथा संपन्न झाली. महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत या सोहळ्याची सांगता करण्यात आली. श्री हनुमान जन्मोत्सवदिनी अभिषेक पूजन, नामजप, जन्मोत्सव आदी विविधांगी धार्मिक कार्यक्रम झाले. यावेळी उत्तराधिकारी अनंतविभूषित स्वामी शांतिगिरीजी महाराजांच्या उपस्थितीत अंजनेरी गडावर श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जय बाबाजी भक्त परिवारातील आश्रामीय संत व भाविक उपस्थित होते.

## लासलगावी शालेय शिक्षण घेणारी जान्हवी झाली कलेक्टर

**लासलगाव : वार्ताहर**

नाशिक येथील जिल्हाधिकारी बंगल्याजवळील कोतवाल पार्क येथे रहिवास करताना नाशिकचे जिल्हाधिकारी कार्यालयाचे सुंदर असे निसर्गरम्य निवासस्थान नेहमीच पाहून मी देखील एक दिवस जिल्हाधिकारी होणारच हे स्वप्न नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. बाळासाहेब शेखर पाटील आणि विद्युलता शेखर पाटील यांच्या कन्या हिने शालेय अवस्थेत पाहिलं आणि विवाहानंतर जानव्ही सुमेष नवले पाटील यांनी शालेय अवस्थेत जे आकर्षणाने स्वप्न पाहिले तेच ध्येय नजरेसमोर ठेवून अहोरात्र अभ्यास आणि कष्टमय जीवन जगत सोशल मीडियापासून दूर राहून जे आज घवघवीत यश संपादन केले आहे.



सुरुवातीला निफाडचे पोलीस उपाधीक्षक म्हणून डॉ. बी.जी. शेखर यांनी दरोडेखोरांविरुद्ध धडाकेबाज कारवाई केली, त्यावेळेस निफाड येथे इंग्लिश मीडियमची सोय नव्हती. निफाड येथून काळा पिवळ्या टॅक्सीने कुमारी जानव्हीने २० किलोमीटरचा प्रवास लासलगावपर्यंत दररोज करून कलगीधर इंग्लिश मीडियममध्ये के.जी. आणि सीनियर के.जी.चे शिक्षण घेतले. एवढ्या मोठ्या पोलीस अधिकाऱ्याची मुलगी साध्या काळ्या पिवळ्या टॅक्सीने शिक्षणासाठी लासलगावी येत होती. परंतु कोणतीही ओळख आणि घरी गाडी असताना प्रवासी वाहतुकीचा आधार घेत शिक्षणाचा श्रीगणेशा तिने लासलगाव येथे केला. त्यानंतर निफाड येथील शैक्षणिक सोयीअभावी डॉ. बी. जी. शेखर पाटील यांचा परिवार नाशिक येथे मुलीच्या शिक्षणासाठी स्थलांतरित झाला आणि कुमारी जानव्ही आणि मुलगा आदित्य हे सुरुवातीला सेंट फ्रान्सिस इंग्लिश मीडियम आणि नंतर फ्रावशी अकॅडमी या ठिकाणी शिक्षण घेतले.

अकरावी, बारावीचे शिक्षण नाशिकच्या एच.पी.टी. सायन्स कॉलेजमध्ये तिने चांगल्या मार्कांने या दोन्ही परीक्षा ती उत्तीर्ण झाली.त्यानंतर पुण्याच्या एमआयटी कॉलेजमधून सिव्हिल इंजिनिअरिंगमधील पदवी प्राप्त करताना तिने प्रथम क्रमांक प्राप्त केला. २०२० पासून जिल्हाधिकारी होण्याचे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवत १४५ वी रँक मिळवत आपले कर्तृत्व सिद्ध केले. नाशिक जिल्ह्यात विशेषतः पोलीस खात्याची उज्ज्वल परंपरा आणि प्रतिमा उंचावण्यात डॉ. बी. जी. शेखर यांचे कार्य अवघ्या जिल्ह्याला नव्हे तर महाराष्ट्रात परिचित आहे. ते आपल्या प्रदीर्घ सेवेतून लवकरच सेवानिवृत्त होणार आहेत. त्यापूर्वीच आपल्या वडिलांच्या शानदार कारकीर्दीला भारतीय प्रशासन सेवेचे १४५ व्या रँकचे मोठे यश प्राप्त करून त्यांची कन्या जानव्ही हिने एकप्रकारे सॅल्युट केला आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.



## मोहमुख येथे हनुमान जन्मोत्सव

**कळवण : वार्ताहर**

कळवण तालुक्यातील मोहमुख येथे हनुमान जन्मोत्सवानिमित्ताने साडेतीन दिवसांच्या अखंड हरिनाम भागवत सप्ताहाची उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शिवसेना तालुकाप्रमुख अंबादास जाधव यांच्या हस्ते पूजा करून सांगता झाली आहे.

तालुक्यात ठिकठिकाणी हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यात मोहमुख (ता. कळवण) येथे हनुमान जन्मोत्सव यानिमित्ताने हभप केशव महाराज भोये, दत्तू महाराज खोटरे, नामदेव बाबा चौरे यांचा कीर्तनाचा कार्यक्रम झाला तसेच हभप ज्ञानेश्वर माऊली महाराज तोकडे यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली. या सप्ताहाला प.पू. गुरुवर्य एकनाथबाबा चव्हाण, प.पू गुरुवर्य चंद्रकांतबाबा पगार, हभप धनाताई पवार यांच्या आशीर्वादाने व ग्रामस्थ, गुरुभक्त सरस्वती महिला मंडळ मोहमुख प्रयत्नाने यशस्वी झाला आहे.

## नवे नाशिकमध्ये पर्यावरण व्याख्यानमालेचा शुभारंभ

### आरती शिरवाडकर यांचे प्रतिपादन

**सिडको : वार्ताहर**

नवे नाशिक येथील रा. स्व. संघ संचलित अर्जुन प्रभात व श्रीगुरुजी शाखांच्या वतीने पर्यावरण व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकातील बडदे हॉल येथे जगू या आनंदे या विषयावर पहिले पुष्प नाशिक आकाशवाणीच्या निवेदिका आरती शिरवाडकर यांनी गुंफले.

जनार्दन माळी यांनी प्रास्ताविक भाषण केले. योगाचार्य कृष्णराव बेदडे यांनी मान्यवरांचा सत्कार केला. आरती शिरवाडकर याप्रसंगी बोलताना म्हणाल्या, जीवनात आनंद शोधण्यासाठी आपण बाहेर भटकतो. आनंद हा चंदनासारखा आहे. दुसऱ्याच्या कपाळी लावला की आपले हात सुगंधी होतात. संतांचे अभंग, प्रतिभासंपन्न कवींच्या कविता व साहित्य आनंदाची पेरणी करणारे आहे.

स्वयंसेवक प्रभाकर आहिरे यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला. सावळीराम तिदमे यांनी सूत्रसंचालन केले. विजय महाले यांनी आभार मानले. श्रीकृष्ण वाडेकर, पंडितराव पाटील, शरद जाखडे, मुकुंद पाठक व स्वयंसेवकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. सर्व व्याख्याने सकाळी ७ वाजता सुरू होतात व मन, बुद्धी, अंतःकरण व विश्वमंदिराचे पर्यावरण या विषयावर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे. पर्यावरणावर विनामानधन मार्गदर्शन करू इच्छिणाऱ्यांनी ८००७९७५७६० या नंबरवर संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सफेद कांदा निर्यातीला केंद्राची परवानगी

## सफेद कांदा निर्यातीला केंद्राची परवानगी

**लासलगाव : वार्ताहर**

वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय नवी दिल्ली यांनी सफेद कांद्यास निर्याती करिता मंजुरी देत असल्याची माहिती विदेशी व्यापार विभागाचे महासंचालक संतोष कुमार सारंगी यांनी दिली आहे.देशातून २ हजार मेट्रिक टन सफेद कांदा निर्यातीस परवानगी दिली अशी माहिती नोटिफिकेशन काढून दिली आहे. सफेद कांदा हा मोठ्या प्रमाणात गुजरात राज्यात पिकत असून या सफेद कांद्यास निर्यातीला परवानगी देऊन केंद्राने एकप्रकारे महाराष्ट्र राज्यावर अन्याय केल्याची भावना शेतकरी आणि व्यापारी करत आहे.

मागील महिन्यात केंद्राने काही देशामध्ये एनइसीएल मार्फत कांदा निर्यातीस परवानगी दिली होती. मात्र, यंदा सफेद कांदा निर्यातीसाठी कुठलीच अट टाकलेली नाही. यामुळे गुजरातच्या कांद्याला एक न्याय अन महाराष्ट्र च्या कांद्याला वेगळा न्याय का? असा संतप्त सवाल शेतकऱ्यांकडून



विचारला जात आहे.

कांदा निर्यातबंदी घातल्याने देशामध्ये कांद्याच्या भावामध्ये मोठ्या प्रमाणात घसरण झाल्याचे दिसून आले होते. उन्हाळ कांद्याला सातशेपासून पंधराशे रुपये प्रती क्विंटल भाव मिळत आहे. मात्र, मुबलक कांदा उपलब्ध असतानाही फक्त निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन निर्यातबंदी लादल्याचे महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांनी सांगितले आहे. गेल्या आठ महिन्यांपासून कांद्याचा खेळ सरकारने मांडला आहे. यामध्ये करोडो रुपयांचा फटका सरकारला बसला आहे.

> उन्हाळी कांदा काढणी अंतिम टप्प्यात असताना कांद्याला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून, याचा ऐन लोकसभा निवडणुकीत उमेदवारांना फटका बसू नये यासाठी कांद्याची निर्यातबंदी लावलेली आहे. सरकारकडून शेतकऱ्यांना वेड्यात काढण्याचे काम केले जात आहे. सरकारने संपूर्ण कांद्याची निर्यातबंदी उठवून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.
>
> – **जयदत्त होळकर,** संचालक, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती

> गेल्या आठ महिन्यांपासून कांदा निर्यातबंदीने शेतकऱ्यांचे करोडो रुपयांचे नुकसान झाले आहे. लादलेली निर्यातबंदी यावर मार्ग काढायचे सोडून विशिष्ट संस्थेमार्फत निर्यात करण्यावर भर देत आहे. मात्र, केंद्राच्या या निर्णयामुळे कांदा उत्पादक शेतकरी आणि व्यापारी उद्ध्वस्त झाला आहे.
>
> – **भारत दिघोळे**
> महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटना अध्यक्ष

## वडाळीभोईस २९ पासून श्री विठ्ठल मंदिर प्राणप्रतिष्ठा

**सोग्रस : वार्ताहर**

वडाळीभोई (ता. चांदवड ) येथे सोमवार दि. २९ पासून श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा व कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी सोमवार तारीख २९ रोजी सकाळी मूर्ती मिरवणूक पुण्याहवाचन नवग्रह रुद्र स्थापना आणि रात्री आठ वाजता ह.भ.प. मनोहर महाराज घोडेसर (घोटी) यांचे कीर्तन होईल. मंगळवार तारीख ३० रोजी सकाळी स्थापित देवता पूजन. प्रधान हवन. मूर्ती व मंदिर न्यास आणि रात्री आठ वाजता हभप इंद्रजीत महाराज रसाळ यांचे कीर्तन होईल. बुधवार तारीख एक रोजी शांती पौष्टिक होम, उत्तर पूजा, मूर्ती प्राणप्रतिष्ठा आणि रात्री आठ वाजता हभप रोहिणीताई माने (परांजपे) यांचे कीर्तन होईल. गुरुवार तारीख दोन रोजी सकाळी साडेआठ वाजता मूर्तीस अभिषेक पूजा व सकाळी नऊ वाजता हभप चैतन्य महाराज निंबोळे (पैठण) यांचे काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसादाने या कार्यक्रमाची सांगता होईल.



याप्रसंगी कलश स्थापना, मूर्ती प्राणप्रतिष्ठा, ध्वजपूजन, ध्वजारोहण वीणापूजन, मृदंगपूजन, हार्मोनियम पूजन इत्यादी कार्यक्रम सुजित महाराज देवरगावकर, जयदेवपुरीजी महाराज चंद्रेश्वरगड, धोंडीराम महाराज आहेर, प्रशांत महाराज जाधव, समाधान महाराज पगार, राजूकाका जोशी, श्याम जोशी यांच्या उपस्थितीत होतील. वडाळीभोई येथे होणाऱ्या या विठ्ठल-रुक्मिणी मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा कीर्तन महोत्सव व महाप्रसाद या कार्यक्रमात सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन श्री विठ्ठल-रखुमाई मंदिर व्यवस्थापन समिती व समस्त ग्रामस्थ वडाळीभोई (ता. चांदवड) यांनी केले आहे.

# उद्धव ठाकरे मुंबईत शक्तिप्रदर्शन करणार

## अरविंद सावंत, अनिल देसाई सोमवारी अर्ज भरणार

**मुंबई :**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष सध्या महाविकास आघाडीत आहे. महाविकास आघाडीत ठाकरेंची शिवसेना २१ जागांवर निवडणूक लढवत आहे. मुंबईतील सहा लोकसभा मतदरसंघांपैकी चार लोकसभा मतदारसंघांमध्ये ठाकरेंची शिवसेना निवडणूक लढवत आहे. दक्षिण मुंबई, दक्षिण मध्य मुंबई, मुंबई उत्तर पश्चिम आणि ईशान्य मुंबईत ठाकरेंनी उमेदवार दिले आहेत. यापैकी दक्षिण मुंबई आणि दक्षिण मध्य मुंबईची जागा ठाकरेंसाठी महत्त्वाची आहे. या ठिकाणी त्यांचे विश्वासू सहकारी दक्षिण मुंबईचे विद्यमान खासदार अरविंद सावंत रिंगणात आहेत. दुसरीकडे दक्षिण मध्य मुंबईत अनिल देसाई निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या दोन्ही उमेदवारांचे अर्ज २९ एप्रिल रोजी भरण्यात येणार असल्याची माहिती शिवसेना ठाकरे पक्षाकडून देण्यात आली आहे.

दक्षिण मुंबई लोकसभा आणि दक्षिण मध्य मुंबई लोकसभा मतदार संघांचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दोन्ही उमेदवार २९ एप्रिलला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. दक्षिण मुंबईचे उमेदवार अरविंद सावंत आणि दक्षिण मध्य मुंबईचे उमेदवार अनिल देसाई ओल्ड कस्टम हाऊस येथे २९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता उमेदवारी अर्ज भरणार आहेत, अशी माहिती देण्यात आली आहे. अरविंद सावंत आणि अनिल देसाई यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी युवासेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे देखील उपस्थित राहणार आहेत. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा फोर्ट येथील पुतळ्याजवळ जमन्याचे आवाहन शिवसैनिकांना करण्यात आलं आहे.

शिवसेनेच्या अंगीकृत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना बाळासाहेब ठाकरे यांच्या पुतळ्याजवळ जमन्याचे आदेश देण्यात आले आहेत. बाळासाहेब ठाकरे यांच्या पुतळ्यापासून ओल्ड कस्टम हाऊस इथपर्यंत ठाकरे गट शक्तिप्रदर्शन करत दोन्ही उमेदवारांचे अर्ज दाखल करण्यात येणार आहेत.

**ठाकरेंचे चार शिलेदार मुंबईतून लढणार**

महाविकास आघाडीच्या जागावाटपात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला २१ जागा मिळाल्या. यामध्ये मुंबईतील चार मतदारसंघांचा समावेश आहे. दक्षिण मुंबईत अरविंद सावंत, दक्षिण मध्य मुंबईत अनिल देसाई, उत्तर पश्चिम मुंबईतून अमोल कीर्तिकर आणि ईशान्य मुंबईतून संजय दिना पाटील यांना उमेदवारी दिलेली आहे. दक्षिण मुंबईत अरविंद सावंत यांच्याविरोधात उमेदवार कोण असणार हे अद्याप निश्चित झालेलं नाही. दक्षिण मध्य मुंबईत अनिल देसाई यांच्याविरोधात राहुल शेवाळे यांचं आव्हान आहे. ईशान्य मुंबईतून संजय दिना पाटील यांच्याविरोधात भाजपचे मिहीर कोटेचा यांचं आव्हान आहे. उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघात अमोल कीर्तिकर यांच्याविरोधात उमेदवार महायुतीकडून अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही.

# लोकसभेचा उमेदवारी अर्ज भरताना काय हवे?




लोकसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. अर्ज वितरण जिल्हाधिकारी कार्यालयात सुरू असून, अर्ज मोफत दिला जातो. त्यासाठी उमेदवाराचे नाव, मोबाइल क्रमांक, पक्षाकडून अर्ज भरणार की अपक्ष, अर्ज केव्हा भरणार याची नोंद रजिस्टरमध्ये करून अर्ज स्वीकारणाऱ्याची स्वाक्षरी घेतली जात आहे.

अर्ज एकूण ४४ पानी असून, मराठी व इंग्रजी भाषेत उपलब्ध आहे. अर्जात मालमत्ता, बँक खाते माहिती, सूचकांची नावे, अर्जासोबत प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे. सर्व प्रमाणपत्रांची पूर्तता करून संपूर्ण अर्ज भरलेला असेल तरच तो निवडणूक निर्णय अधिकारी स्वीकारतात.

**अर्ज भरताना आवश्यक बाबी**

नमुना अर्ज २ ए वर उमेदवाराची सही आवश्यक, अर्जासोबत सामान्य उमेदवारासाठी अनामत रक्कम २५ हजार व अनुसूचित जाती, जमातींसाठी १२ हजार ५०० रु. आवश्यक. अनुसूचित जाती, जमातीसाठी जात प्रमाणपत्र आवश्यक. सामान्य उमेदवाराला जात प्रमाणपत्र सक्तीचे नाही. आपला मतदारसंघ सोडून दुसऱ्या मतदारसंघातून अर्ज भरणार असेल तर तहसीलदारांचे पत्र आवश्यक. १०० रु. स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र आवश्यक. प्रतिज्ञापत्रात मूळ प्रमाणपत्रासह नोटरी प्रमाणपत्र आवश्यक. उमेदवाराचे नाव, मतदारसंघाचा उल्लेख, मतदान ओळखपत्रावर ज्याप्रमाणे नाव आहे त्याप्रमाणे नाव असणे आवश्यक. उमेदवारांच्या सह्यांचे नमुने विहित प्रमाणपत्र राष्ट्रीय, प्रादेशिक पक्षाकडून अर्ज दाखल करीत असल्यास नमुना ए व बी प्रमाणपत्र आवश्यक. राष्ट्रीय, प्रादेशिक पक्षाकडून अर्ज दाखल करीत असल्यास संबंधित मतदारसंघातील दोन सूचक आवश्यक. अपक्ष म्हणून अर्ज दाखल करावयाचा असल्यास दहा सूचक आवश्यक. राष्ट्रीयीकृत बँकेत नवीन खाते सुरू करणे आवश्यक. त्या खात्याच्या पासबुकचे झेरॉक्स आवश्यक. तीन महिन्यांच्या आतील पाच फोटो : त्यापैकी उमेदवार अर्जावर, दुसरा मतपत्रिकेवर, तिसरा निवडणूक चिन्हाशेजारी व चौथा निवडणूक रजिस्टरमध्ये लावला जातो, शिवाय एक फोटो जादा द्यावा लागतो.


**विजय पवार**
निवृत्त, जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक


## वारे निवडणुकीचे..

### शिवसेना महिला आघाडीची बैठक

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर काल शिवसेना महिला आघाडीच्या प्रमुख महानगर महिला पदाधिकाऱ्यांची बैठक शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात पार पडली. बैठकीचे नियोजन हे सहसंपर्कप्रमुख सुवर्णा मटाले व महानगरप्रमुख अस्मिता देशमाने यांनी केले होते. बैठकीदरम्यान पक्ष संघटनांच्या दृष्टीने अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली. यावेळी सरलाताई चव्हाण, कावेरी अत्रे, नाशिक पश्चिमच्या विधानसभा समन्वयक मंदाकिनी जाधव, नगरसेविका संगीता जाधव, नाशिक मध्यच्या विधानसभाप्रमुख डॉ. वृषाली व्यवहारे, उपजिल्हा प्रमुख ज्योती फड, नाशिक पूर्वच्या उपमहानगरप्रमुख मंजुषा पवार, नाशिक मध्यच्या उपजिल्हाप्रमुख मोनिका मुथा, नाशिक पश्चिमच्या विधानसभाप्रमुख सुलोचना मोहिते, पूर्वच्या सुनीता जाधव, मध्य उपमहानगरप्रमुख सुष्मा शिरसाठ नाशिक, मध्य विधानसभा समन्वयक प्रणाली बॅनर्जी, भुमिसरा रावेर, विभागप्रमुख पूजाताई शिनगर, सातपूर विभागाच्या उपमहानगरप्रमुख रोहिणी देवरे, मध्यच्या उपमहानगरप्रमुख अर्चना मगर, अलका शिरसाठ, उर्मिला दहिटे, ज्योती निमसे, हर्षदा पवार, विनिता सोनवणे, रजनी त्रिभूवन, अलका हिरे आदी पदाधिकारी उपस्थित होत्या.

### नाशिक, दिंडोरी मतदारसंघांसाठी निवडणूक खर्च निरीक्षक दाखल

**नाशिक : प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत उमेदवार निवडणूक खर्च नियंत्रणासाठी दिंडोरी व नाशिक मतदारसंघासाठी निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून भारतीय महसूल सेवेतील चार आयआरएस अधिकाऱ्यांची नियुक्ती केली असून, ते जिल्ह्यात दाखल झाले आहेत. दिंडोरी मतदारसंघासाठी निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून निधी नायर व मुकंबीकेयन एस. तर नाशिक मतदारसंघासाठी निवडणूक खर्च निरीक्षक सागर श्रीवास्तव व प्रवीण चंद्रा हे नाशिकमध्ये दाखल झाले आहेत. दिंडोरी लोकसभा मतदारसंघांतर्गत असलेल्या येवला, निफाड व दिंडोरी या विधानसभा मतदारसंघांसाठी निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून निधी नायर तर नांदगाव, कळवण आणि चांदवड या विधानसभा मतदार संघांसाठी मुकंबीकेयन एस. खर्च निरीक्षक म्हणून काम पाहणार आहेत. तर नाशिक लोकसभा मतदार अंतर्गत सिन्नर, नाशिक पूर्व आणि नाशिक मध्य या विधानसभा मतदारसंघासाठी प्रवीण चंद्रा तर नाशिक पश्चिम, देवळाली (अ. जा.) आणि इगतपुरी (अ. ज.) या विधानसभा मतदारसंघांसाठी सागर श्रीवास्तव खर्च निरीक्षक म्हणून काम पाहणार आहेत.

# भाकपाचा महाविकास आघाडीचे उमेदवार राजाभाऊ वाजे यांना पाठिंबा

**नाशिक : प्रतिनिधी**

लोकसभा मतदारसंघाचे इंडिया आघाडी व महविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजाभाऊ वाजे यांना भारतीय कम्युनिस्ट पक्षाने पाठिंबा जाहीर केला.

नाशिक लोकसभा मतदारसंघात महाविकास व इंडिया आघाडीची उमेदवारी राजाभाऊ वाजे यांना देण्यात आलेली आहे. आरएसएस प्रणीत भारतीय जनता पार्टीच्या वाढत्या जनविरोधी धोरणांच्या निषेधार्थ कामगार, शेतकरी, योजना कर्मचारी, मानधनावरील कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी कामगार व सर्वसामान्य जनतेचे जगणे मुश्कील करून टाकणाऱ्या सरकारच्या विरोधात देशातील प्रागतिक पक्षांनी एकत्र येऊन तयार झालेल्या इंडिया आघाडीचा घटक पक्षांमध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा समावेश आहे. देशभर इंडिया आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी भाकप प्रचंड संख्येने रस्त्यावर उतरलेला आहे.



नाशिक लोकसभा मतदारसंघात पक्षाच्या वतीने वाजे यांना पाठिंबा देण्यात आला. भारतीय कम्युनिस्ट पक्ष व त्याच्या सर्व जनसंघटना हे वाजे यांच्या विजयासाठी प्रचारात मोठ्या संख्येने सहभागी राहतील, असे आश्वासन देखील पदाधिकाऱ्यांनी दिले. यावेळी भाकपचे राज्य सहसचिव राजू देसले, जिल्हा सचिव महादेव खुडे, शहर सचिव तल्हा शेख, पद्माकर इंगळे, राज्य कौन्सिल सदस्य भास्करराव शिंदे, विराज देवांग, प्राजक्ता कापडणे, रामदास भोंग, मनोहर पगारे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

### दिंडोरीचा निर्णय बाकी

भाकपाने नाशिक लोकसभेसाठी महाविकास आघाडीच्या उमेदवाराला पाठिंबा दिला असला तरी दिंडोरीचा निर्णय अद्याप झालेला नाही. दिंडोरीत माकपाच्या वतीने जिवा पांडू गावित यांनी काल अर्ज दाखल केला आहे. विशेष म्हणजे वरिष्ठ पातळीवर माकपाने महाविकास आघाडीच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याचा निर्णय झाला होता. त्यानंतर गावित यांनीही तशी भूमिका घेतली होती. मात्र, अचानक त्यांनी भूमिका बदलली. आणि काल अपक्ष अर्ज दाखल केला. त्यामुळे दिंडोरी मतदारसंघात भाकपाचा पाठिंबा नेमका माकपाला राहील की मविआला याबाबतचा निर्णय प्रलंबित आहे.



# शिवसेना महिला आघाडीची बैठक

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काल शिवसेना महिला आघाडीच्या प्रमुख महानगर महिला पदाधिकाऱ्यांची बैठक शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात पार पडली. बैठकीचे नियोजन हे सहसंपर्कप्रमुख सुवर्णा मटाले व महानगरप्रमुख अस्मिता देशमाने यांनी केले होते.

बैठकीदरम्यान पक्ष संघटनांच्या दृष्टीने अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली. यावेळी सरलाताई चव्हाण, कावेरी अत्रे, नाशिक पश्चिमच्या विधानसभा समन्वयक मंदाकिनी जाधव, नगरसेविका संगीता जाधव, नाशिक मध्यच्या विधानसभा प्रमुख डॉ. वृषाली व्यवहारे, उपजिल्हा प्रमुख ज्योती फड, नाशिक पूर्वच्या उपमहानगरप्रमुख मंजुषा पवार, नाशिक मध्यच्या उपजिल्हाप्रमुख मोनिका मुथा, नाशिक पश्चिमच्या विधानसभा प्रमुख सुलोचना मोहिते, पूर्वच्या सुनीता जाधव, मध्य उपमहानगरप्रमुख सुष्मा शिरसाठ नाशिक, मध्य विधानसभा समन्वयक प्रणाली बॅनर्जी, भुमिसरा रावेर, विभागप्रमुख पूजाताई शिनगर, सातपूर विभागाच्या उपमहानगरप्रमुख रोहिणी देवरे, मध्यच्या उपमहानगरप्रमुख अर्चना मगर, अलका शिरसाठ, उर्मिला दहिटे, ज्योती निमसे, हर्षदा पवार, विनिता सोनवणे, रजनी त्रिभुवन, अलका हिरे आदी पदाधिकारी उपस्थित होत्या.

# राहुल गांधींना मतदार धडा शिकवतील

## भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांचा इशारा

**मुंबई :**

सोलापूरच्या सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एकेरी व अवमानकारक उल्लेख करून काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी त्यांची संस्कृती दाखवून दिली आहे. त्यांनी केवळ नरेंद्र मोदी यांचा नव्हे, तर देशाच्या सर्वोच्च सांविधानिक पदावरील व्यक्तीचा अपमान केला असून, पराभवाच्या भीतीने वैफल्य आल्यामुळे त्यांचा जिभेवरील ताबा सुटल्याचे स्पष्ट झाले आहे. येत्या लोकसभा निवडणुकीत अशा असभ्य व उर्मट नेत्यांना व त्यांच्या पक्षाला जनता त्यांची जागा दाखवून देईल, असे भारतीय जनता पार्टीचे प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी माध्यम विभागप्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते पंकज मोदी उपस्थित होते.



सोलापूरच्या सभेत राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी यांचा सातत्याने एकेरी उल्लेख केला. त्यांचे हे वक्तव्य आणि वर्तन राजकीय संस्कृतीला शोभणारे नसून, केवळ वैफल्य व अपरिपक्वपणा दर्शविणारे आहे. लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाच्या नेतृत्वाखालील 'एनडीए'ला प्रचंड जनाधार मिळत असून ४०० पेक्षा अधिक जागांवरील भाजपा आघाडीचा विजय निश्चित झाल्याने काँग्रेस व इंडी आघाडीला वैफल्य आले आहे. राहुल गांधी यांच्या भाषणात याआधीही सुसंस्कृतपणा आणि अभ्यासाचा अभावच होता. आता तर त्यांच्याकडे मुद्दे नाहीत, उमेदवारही नाहीत आणि निवडणूक लढविण्याची उमेदही राहिलेली नाही. त्यातच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसच्या जाहीरनाम्याचा पंचनामा करून जनतेची संपत्ती हिरावून घेण्याचा कट उघड केल्यामुळे काँग्रेसची भंबेरी उडाली आहे. जनतेकडील संपत्ती काढून घेण्याचा काँग्रेसचा इरादा त्यांच्या जाहीरनाम्यातूनच उघड झाला असून पंतप्रधान मोदी यांनीच काँग्रेसचा खरा चेहरा जनतेसमोर आणल्याने आता राहुल गांधी यांची पंचाईत झाली आहे.

काँग्रेस व इंडी आघाडीकडे मुद्दे नाहीत, विकासाच्या मुद्द्यावर भूमिका नाही आणि भाजपा आघाडी सरकारच्या कामांशी बरोबरीदेखील करता येत नसल्याने, अशी वेळ येते तेव्हा काँग्रेसचे नेते आपल्याला शिव्याशाप देतात असे पंतप्रधान मोदी यांनी वारंवार म्हटले होते. राहुल गांधी यांनी सोलापुरच्या सभेत पंतप्रधानांविषयी असभ्य व बेताल एकेरी वक्तव्य करून मोदी यांचा तो दावा खरा करून दाखविला आहे. जेव्हा जेव्हा काँग्रेसजन शिव्याशाप देतात, तेव्हा पंतप्रधान अधिक जोमाने देशाच्या सेवेसाठी सज्ज होतात, हा गेल्या दहा वर्षांचा देशाचा अनुभव आहे. त्यामुळे राहुल गांधीच्या बेताल वक्तव्यानंतर आता उरलीसुरली काँग्रेसदेखील संपणार असून देशाच्या संविधानिक नेत्याविषयी अनादराने अपमानजनक भाषा वापरणाऱ्या नेत्याला जनताच त्याची जागा दाखवून देईल, असा विश्वासही श्री. उपाध्ये यांनी व्यक्त केला.

# भाजपाच्या प्रचारात बदल

**नवी दिल्ली :**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान पार पडले. या टप्प्यात कमी मतदान झाले. याच कमी मतदानाने सत्ताधारी भारतीय जनता पक्षाला आपली रणनीती बदलण्यास भाग पाडलंय. त्याच्यामुळेच आजपर्यंत ज्या विषयांचा उल्लेख पक्ष करत नव्हतं त्याच मुद्द्यांचा पक्ष राष्ट्रीय प्रचारात वापर करत आहे. पहिल्या टप्प्यात देशातील लोकसभेच्या १०२ जागांवर मतदान झाले. या १०२ जागांच्या मतदानात ४ टक्के घट नोंदवली गेली, त्यानंतर कमी मतदानाचा मुद्दा मीडियापासून सोशल मीडियावर गाजला. पहिल्या टप्प्यातील मतदानानंतर दुसऱ्या दिवशी शनिवारी राजकीय तज्ज्ञांनी वेगवेगळ्या पद्धतीने त्याचा अर्थ लावला. सत्ताधारी पक्षाच्या प्रमुख मतदार आणि कार्यकर्त्यांमधील उदासीनतेला अनेकांनी कमी मतदानाचे श्रेय दिले. ही चर्चा सुरू असतानाच पंतप्रधान मोदींनी राजस्थानमधील बांसवाडा येथे आपल्या जुन्या शैलीत मुख्य मुद्द्यांवर बोलण्यास सुरुवात केली. या रॅलीत पंतप्रधानांनी एकाच वेळी मुस्लिमांचे तुष्टीकरण,रामनवमी आणि काँग्रेसचा उल्लेख केला. 'विकसित भारत', '४०० पार' आणि 'थर्ड बिग इकॉनॉमी' या घोषणांमध्ये गेल्या ५ वर्षांपासून दबलेले मुद्दे पंतप्रधानांच्या नजरेत भाजपाच्या बड्या नेत्यांनीही मांडायला सुरुवात केली.

**किती बदल झाला?**

निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यानंतर भाजपाचे स्टार प्रचारक नरेंद्र मोदी यांनी राजस्थानमधील बांसवाडा, टोंक-सवाई माधोपूर, छत्तीसगडमधील सुरगुजा, महासमुंद आणि जांजगीर-चंपा येथे सभा घेतल्या आहेत. या सभांमधील भाषणांनी पंतप्रधान मोदींनी भाजपच्या प्रचाराची दिशाच बदलून टाकली. पंतप्रधान आपल्या भाषणात ४ प्रमुख मुद्द्यांना प्राधान्य देत आहेत-

**१. कट्टर हिंदुत्वाचा मुद्दा**

निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यानंतर पंतप्रधान मोदी कठोर हिंदुत्वाचा मुद्दा मांडण्यात व्यस्त आहेत. रामनवमी आणि हनुमान चालिसाचा उल्लेख करून पंतप्रधानांनी काँग्रेसवर निशाणा साधला. जंजगीर लोकसभा मतदारसंघातील रॅलीत पंतप्रधान मोदी म्हणाले की, काँग्रेसच्या काळात हनुमान चालिसाचा पाठ करणेही गुन्हा होता. काँग्रेसच्या राजवटीत तुम्ही तुमचा विश्वास पाळू शकणार नाही. टोंक-सवाई माधोपूरच्या सभेत बोलताना मोदी म्हणाले - काँग्रेसच्या काळात रामाचे नाव घेणेही गुन्हा मानला जात होता. येथे रामनवमीच्या मिरवणुकीवर बंदी घालण्यात आली होती.

**२. मुस्लिमांची भीती दाखवली**

पहिल्या टप्प्यानंतर भाजपाच्या विशेषतः पंतप्रधान मोदींच्या प्रचारात थेट मुस्लिमांची भीती दाखवली गेली. राजस्थानमधील बांसवाडा येथे एका सभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले- काँग्रेस सत्तेत आल्यास तुमची संपत्ती अधिक मुले असलेल्या लोकांमध्ये वाटली जाईल. हे लोक देशाचे घुसखोर आहेत. तुमची मालमत्ता मुस्लिमांना देणे तुम्ही स्वीकाराल का? असे म्हटले. तर लखनऊमध्ये उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी शरिया कायद्याचा उल्लेख केला. योगी आपल्या भाषणात - काँग्रेस सरकार आल्यास शरिया कायदा लागू करेल असे म्हटले.



**३. दहशतवाद आणि राष्ट्रवादाला धार**

निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यानंतर भाजपाने प्रचारात राष्ट्रवाद आणि दहशतवादाच्या मुद्द्याला धार देण्यास सुरुवात केली. पंतप्रधानांपासून ते गृहमंत्र्यांपर्यंत ते आपल्या सभांमध्ये या मुद्द्यांना अधिक महत्त्व देत आहेत. महासमुंद रॅलीत पंतप्रधान मोदी यांनी जगातील अनेक देशांना भारतात कमकुवत सरकार बनवायचे आहे, जेणेकरून त्यांची डाळ सहज वितळेल, तुम्हाला हे आवडेल का? असा सवाल केला. अल्लापुझा सभेत अमित शहा यांनी दहशतवादाच्या मुद्द्यावरून काँग्रेसला कोंडीत पकडले. शाह यांच्या म्हणण्यानुसार, काँग्रेस आणि कम्युनिस्ट पक्ष मिळून केरळमध्ये दहशतवादी संघटनांना आश्रय देत आहेत. रॅलीत लोकांना संबोधित करताना शाह म्हणाले - तुष्टीकरणाचे राजकारण करण्यासाठी काँग्रेस पीएफआयसारख्या दहशतवादी संघटनांना पाठिंबा देत आहे.

**४. संविधान बदलणार नाही**

पहिल्या टप्प्यातील निवडणुकीपूर्वी भाजपाच्या अनेक नेत्यांनी ४०० पार या घोषणेचा संबंध संविधान बदलण्याशी जोडला. विरोधकांनी हा मोठा मुद्दा बनवून लोकसभेच्या या लढ्याला संविधान वाचवण्याच्या लढ्याशी जोडले. पहिल्या टप्प्यातील सुस्त मतदानानंतर भाजपाचे वरिष्ठ नेते यावर आवाज उठवत प्रत्येक मेळाव्यात हा मुद्दा मांडत आहेत. छत्तीसगडमधील रॅलीत खुद्द पंतप्रधान मोदींनी संविधान बदलू नये असे सांगितले. मोदी म्हणाले, जेव्हा-जेव्हा निवडणुका येतात तेव्हा काँग्रेसवाले तेच जीर्ण झालेले टेपरेकॉर्डर वाजवत असतात. भाजपाचे लोक येतील आणि संविधान रद्द करतील, भाजपाचे लोक येतील आणि आरक्षण रद्द करतील. किती दिवस खोटं बोलत राहणार? माझी एक गोष्ट लक्षात ठेवा, मोदी सोडा, बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः येऊन सांगितले तरी कोणीही संविधान बदलू शकत नाही. अमित शहा आपल्या रॅलीत संविधानाशी छेडछाड करू नका, असे ठामपणे बोलताना ऐकायला मिळतात. 'या' गोष्टींचा क्वचितच उल्लेख २२ एप्रिलपर्यंत, भाजपा आपल्या अधिकृत हँडलद्वारे आपल्या जाहीरनाम्यात सांगितलेल्या गोष्टी मोठ्या प्रमाणात सामायिक करत होता, परंतु गेल्या दोन दिवसांपासून हा जाहीरनामा पक्षाच्या सोशल मीडियावरून गायब झाला आहे. तसेच याआधी प्रत्येक रॅलीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी कार्यकर्त्यांना ४०० पेक्षा जास्त घोषणा देण्यास भाग पाडायचे, पण निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यानंतर हे थांबवण्यात आलं आहे. आता प्रत्येक रॅलीच्या शेवटी पंतप्रधान कार्यकर्त्यांना जास्तीत जास्त मतदान करण्याचे आवाहन करत आहेत.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



■ सफेद कांदा निर्यातीला केंद्राची परवानगी ▸▸ पान ६



■ दिंडोरी येथे सहा गाळे जळून २० लाखांचे नुकसान ▸▸ पान ६

■ www.gavakari.online ■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ नाशिक, शनिवार, दि. २७ एप्रिल २०२४

## महत्त्वाचे

### त्र्यंबकरोडवर अपघातात अश्व ठार

**नाशिक :** त्र्यंबकरोड सिग्नलवर अपघातात एक घोडा ठार झाला. उशिरापर्यंत याप्रकरणी सरकारवाडा पोलीसांत गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरु होती. दूध बाजार येथील अक्तर रझा यांच्या मालकीची घोडी शुक्रवारी लग्न सोहळ्यात सहभागी होऊन कार्यक्रमानंतर घराकडे निघाला. याचवेळी घोडी व तिचे दुचाकीवरील सारथी त्र्यंबकनाका सिग्नलवर पोहोचले. त्यानंतर काही क्षणांत अपघात झाला. विचित्र अपघातामुळे सिग्नलवरील इतर वाहन चालकांनाही हादरा बसला. सरकारवाडा पोलिसांनी त्वरित घटनास्थळी धाव घेत अपघातग्रस्त कार ताब्यात घेतली. कारचे पत्रे घोडीच्या मानेला खुपसल्याने अतिरक्तस्त्राव होऊन तिचा जागीच मृत्यू झाला.

### मतदार यादीतील घोळ दुसऱ्या टप्प्यातही कायम

**अकोला :** अठराव्या लोकसभा निवडणुकीतील दुसऱ्या टप्प्याच्या मतदानात यादीतील घोळ अद्याप कायम असल्याने अनेक मतदान केंद्रांवर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. तर काही मतदारांना आपले नाव मतदान यादीत आढळून न आल्याने, आल्या पावली माघारी जावं लागलंय. मात्र, या गोंधळाचा फटका मतदानाच्या टक्केवारीला बसण्याची शक्यताही वर्तविण्यात येत आहे. तर दुसरीकडे वंचितच्या मतदारांची नावे जाणीवपूर्वक मतदार यादीतून गहाळ केल्याचा गंभीर आरोप या मतदारांकडून करण्यात येतोय. विदर्भ आणि मराठवाड्यातील आठ मतदान केन्द्रावर आज मतदानाची रणधुमाळी रंगात आहे. अशातच अकोल्यात सकाळपासून मोठ्या उत्साहात मतदानाला सुरूवात झालीये. गेल्या काही दिवसांपासून आकोल्याती तापमानाने कमालीचा उच्चांक गाठला आहे. त्यामुळे उन्हाची दाहकता लक्षात घेता मतदारांनी सकाळच्या सुमारास मतदान केंद्रांवर मोठी गर्दी करत आपला हक्क बाजवण्याला पसंती दिली आहे.

# शांतिगिरी महाराज, गावित यांचा अपक्ष अर्ज

**नाशिक : प्रतिनिधी**

जय बाबाजी भक्त परिवाराचे शांतिगिरी महाराज यांनी काल नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या पहिल्याच दिवशी नाशिक लोकसभा निवडणुकीसाठी अपक्ष अर्ज दाखल केला. शांतिगिरी महाराज नाशिक लोकसभेसाठी भाजपाकडून इच्छुक होते. मात्र, नाशिकची जागा भाजपाला मिळणार नाही म्हटल्यावर त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. पण शिवसेना शिंदे गटातच अनेक उमेदवार इच्छुक असल्याने शिंदे यांनी कोणतेही आश्वासन दिले नाही.

त्यानंतर राज ठाकरे यांच्या मनसेला महायुतीतील नाशिकची जागा मिळाल्यास मनसेकडून लोकसभा लढवणार अशी चर्चा रंगली होती. मात्र, मनसेने निवडणूक न लढवता भाजपाला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला. त्यामुळे शांतिगिरी महाराज भाजपा, शिवसेना आणि मनसेकडून निवडणूक लढवणार असल्याच्या फक्त चर्चाच ठरल्या. मात्र, शांतिगिरी महाराज यांनी नाशिक लोकसभेसाठी अपक्ष अर्ज दाखल करत आपण निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट केले. तर अद्यापही महायुतीचा नाशिकच्या जागेचा उमेदवार जाहीर होऊ न शकल्याने नेमकी कोणाला उमेदवारी मिळणार याची जोरदार चर्चा रंगली आहे.





### दिंडोरीत माकपाचे गावित यांचा अपक्ष अर्ज

दिंडोरी लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीमध्ये बिघाडी झाली आहे. प्रयत्न करूनही जिवा पांडू गावित यांनी उमेदवारी करण्याचा निर्धार केला आहे. काल त्यांनी अपक्ष अर्ज दाखल केला. याशिवाय, त्यांनी आणखी अर्ज खरेदी केले आहेत. त्यामुळे जिवा पांडू गावित जर रिंगणात उतरले तर महाविकास आघाडीच्या उमेदवाराची अडचण निर्माण होऊ शकते. दुसरीकडे अपक्ष म्हणून माजी खासदार हरिश्चंद्र चव्हाण हे देखील रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. काल अर्ज भरण्याच्या पहिल्याच दिवशी जिवा पांडू गावित यांनी मोजक्या कार्यकर्त्यांसह उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करण्याची मुदत ३ मेपर्यंत असून, त्यानंतर छाननी व माघारी होईल. गावित हे आपल्या भूमिकेवर ठाम राहतात की अर्ज मागे घेतात? यावरच दिंडोरी लोकसभेचे चित्र अवलंबून आहे.

### शांतिगिरी महाराजांकडे सफारी, एसयूव्हीसह नऊ वाहने

#### राज्यात ५३ ठिकाणी जमीन, कोट्यवधींची संपत्ती

नाशिक लोकसभा मतदारसंघातून शांतिगिरी महाराज यांनी पहिल्याच दिवशी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सुरुवातीला भाजपकडून निवडणूक लढविण्याची तयारी केली होती. मात्र, कुठलाही प्रतिसाद न मिळाल्याने काल अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. २९ तारखेला पुन्हा शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

निवडणूक अधिकाऱ्यांकडे दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात शांतिगिरी महाराजांकडे ३८ कोटी ८१ लाख इतकी संपत्ती आहे. त्यांच्याकडे विविध ठिकाणी मठ, गुरुकुल, शेती आणि वाहने असल्याचे प्रतिज्ञापत्रात नमूद करण्यात आले आहे. शांतिगिरी महाराजांकडे एकूण ३८ कोटी ८१ लाख ५३ हजार ५३३ रुपयांची स्थावर आणि जंगम मालमत्ता आहे. शांतिगिरी महाराज यांच्याकडे ९ वाहने असून, त्यांच्यावर ७५ हजारांचे कर्ज आहे. विविध ठिकाणी मठ, गुरुकुल, शेती आणि निवासी मालमत्ता आहे. शांतिगिरी महाराजांजवळ ७१ लाख ६८ हजार ६६४ रुपयांची जंगम मालमत्ता आहे. त्यामध्ये ६७ लाख ९१ हजार ४८६ रुपये मूल्याच्या ९ वाहनांचा समावेश आहे.

शांतिगिरी महाराजांच्या ताफ्यात सफारीबरोबरच एसयूव्हीसारखी वाहनेही आहेत. याशिवाय टेम्पो, पिकअप, दोन स्कूलबस, टाटा ४०७, हायवा, एसयूव्ही, टीयूव्ही अशी विविध वाहने त्यांच्याकडे आहे. १२ बँक खात्यात ७० हजार ४५८ रुपयांची रक्कम असून, ५० हजार रुपये कॅश स्वरूपात आहे. एफडी आणि विमा पॉलिसीचे मूल्य २ लाख ५६ हजार ७२० रुपये आहे. स्थावर मालमत्तेत ५३ ठिकाणी वारसा हक्क आणि स्वमालकीची शेतजमीन असून, निवासी संकुलाचाही समावेश आहे. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरूळ, कन्नड, खुलताबाद, नाशिक जिल्ह्यातील सिन्नर, नगर जिल्ह्यातील कोपरगाव आदी ठिकाणी या मिळकती आहे.

# दीक्षामहोत्सवानिमित्त राजगृहनगरीत भक्तिगीतांची मैफल







**नाशिक : प्रतिनिधी**

ठेवी श्रीनाथ नी माया, समय मारो साधने वाला, हवेली सजावी श्री थारा नाम नी यांसारख्या गुजराथी भक्ती गीतांनी गायक सचिन लिमये व वाद्यवृंदांनी शुक्रवार दि.२६ रोजी दीक्षामहोत्सवानिमित्त ठक्कर डोम येथे उभारण्यात आलेल्या राजगृहनगरीत आयोजित भक्तीसंध्या या मैफलीत प्रभूच्या महतीचे वर्णन करणाऱ्या भक्तीगीताने परिसर दुमदुमून निघाला. तिसऱ्या दिवशी शहरातील दीक्षामहोत्सवानिमित्त उभारण्यात आलेल्या प्रतिकृती पाहण्यासाठी नागरिकांची चांगलीच गर्दी झाल्याचे चित्र होते. सकाळी ९.३० पूजा करण्यात आली. यावेळी गायक प्रशंम संप्रती यांनी भावगीत गात आराधना केली.

### प्रसादालयाची व्यवस्था

दीक्षामहोत्सवास भेट देणाऱ्या भाविकांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली असून, त्यासाठी दीक्षामहोत्सवाच्या स्थळी प्रसादालय तयार करण्यात आले आहे.

### आज होणारे कार्यक्रम

शनिवार दि. २७ रोजी सकाळी ८ वाजता शोभायात्रा निघणार आहे. तर दुपारी २ वाजता शांतीधारा अभिषेक असणार आहे. सायंकाळी ७.३० वाजता भक्ती संध्या बिदाई समारोप असणार आहे. यासाठी गायक शिवम शिंद व गायक हिमांशू मखवाना उपस्थित असणार आहेत.

# गोवंश तस्करी करणारे वाहन पेटवले

**खामखेडा : प्रतिनिधी**

कळवण तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यातून गोवंश तस्करी कत्तलीसाठी जाणारे वाहन खामखेडा येथील चौफुलीच्या पाठीमागे गावातील तरुणांनी अवैध गोवंश वाहतूक करणाऱ्या वाहनाला पकडून दोन गायी व तीन बैल असे पाच जनावरांचे प्राण वाचवले. परिसरातील संतप्त जमावाने सदर वाहन पेटवून देत संताप व्यक्त केला.

शुक्रवारी गायींना कत्तलीसाठी घेऊन जाणारी पिकअप वाहन क्रमांक (एमएच ४१ जी १९४८) हे कळवणकडून येत असल्याचे गावातील तरुणांना समजले. येथील तरुणांनी गावच्या हद्दीत या वाहनाला अडवून वाहनातील सामान चालकाला बाजूला काढायला लावले असता. पिकपमध्ये दोन गाई व तीन बैल कमी जागेमध्ये निर्दयीपणे कोंबून पायाला बांधलेल्या अवस्थेत आढळले. तातडीने या गायींना बाहेर काढून मोकळे केले. पशुवैद्यकीय



अधिकारी डॉ. आचार व डॉ. योगेश सोनवणे यांनी औषधोपचार केला. कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या या गायी असल्याचे भयाण वास्तव यावेळी समोर आले. यावेळी जमलेले तरुण तसेच इतर गावातील तरुण ग्रामस्थ वाहन चालकांना मारहाण करू लागल्यामुळे वाहन चालक व व्यापाऱ्यास सरपंच तसेच ग्रामस्थांनी ताब्यात घेत ग्रामपंचायतीत नेले असता संतप्त जमावातील तरुणांनी पेटवून दिले.

# मेळा बसस्थानकातील एसीचा बिघडला खेळ

## यंत्रणा नादुरुस्त असल्याने उकाड्याने प्रवासी हैराण





**नाशिक : प्रतिनिधी**

राज्यातील पहिले आणि एकमेव वातानुकूलित बसस्थानक म्हणून दोन महिन्यांपूर्वी मेळाबस्थानकाचे गाजावाजा करून उद्घाटन करण्यात आले होते. मात्र, हे स्थानक समस्यांनी ग्रस्त असल्याचे आढळले. दोन महिन्यांतच या बसस्थानकातील एसी (वातानुकूलित यंत्रणा) बंद असल्याने प्रवाशांना उकाड्याला सामोरे जावे लागत आहे.

या बसस्थानकाची व त्यातील सुविधांची पाहणी केली असता त्यातील अनेक समस्या निदर्शनास आल्या. कुंभमेळा काही महिन्यांवर येऊन ठाकला आहे. आत्ताच स्थानकाची अशी अवस्था आहे, तर या मोठ्या कुंभमेळ्यासारख्या आयोजनाच्या वेळी हे स्थानक कसे तोंड देणार, हा प्रश्न आहे. ठक्कर बसस्थानकालगत १.७३ हेक्टर जागेमध्ये वसलेल्या या बसस्थानकात ६०३३.२२ चौरस मीटरमध्ये बसलेल्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. नागरिकांना प्रवेशांसाठी स्वतंत्र प्रवेशद्वार देण्यात आले आहे. मात्र, या प्रवेशद्वारासमोरच झाडांचा पालापाचोळा व कागदकचरा मोठ्या प्रमाणात आढळून आला. बस स्थानकात तळघरात प्रशस्त पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र दोन महिने होऊनही अद्यापही हे पार्किंग बंद असून, नागरिक रस्त्यात व स्थानकाच्या आवारात कोठेही कसेही पार्किंग करीत आहेत. हे बसस्थानक संपूर्ण वातावरणूकलीत आहे, अशी जाहिरात करण्यात आली होती. मात्र सद्यस्थिती काही औरच आहे.

या ठिकाणी केवळ पुण्यासाठी विनावाहक शिवशाही, शिवाई व जन शिवनेरी, पुणे साधी गाडी, स्वारगेट, कोल्हापूर, महाबळेश्वर, हुबळी व बेळगाव या गावांसाठी असलेल्या केवळ चार फलाटांसाठीच ही एसी-वेटींग रूमची व्यवस्था आहे. बाकी वीस पैकी १६ फलाट बिगर एसी आहेत. तेथे पूर्वी सारखीच बसण्याची व्यवस्था आहे. व साधे पंखे लावलेले आहेत. मात्र लोकांची गर्दी आणि गाड्यांच्या प्रतीक्षेत असलेले प्रवासी त्रस्त आढळले.

स्थानकात पिण्याचे पाण्यासाठी मोफत व्यवस्था असा बोर्ड लिहिलेला आढळला. मात्र मोफत पाण्याची व्यवस्था नाही. या स्थानकात आठ ते दहा व्यापारी गाळे बांधण्यात आले आहेत. मात्र ते सर्व बंद आहेत. वेगवेगळ्या सेवा पुरवण्यासाठी आठ ते दहा काउंटर विंडोंची व्यवस्था करण्यात आली आहे मात्र आरक्षण खिडकी वगळता अद्याप कोणतेही खिडकी कार्यान्वीत झालेली नाही. एसी काउंटर व इतर फलाटांवर टेबल ठेवून असे काउंटर उपलब्ध केलेले आढळले.

**अशा संस्था, अशी अवस्था**

**डॉ. धर्मेंद्र मुल्हेरकर, सहसंपादक**

### दररोज १५०० बसेसची वाहतूक

बसस्थानकासाठी स्थानक प्रमुख नियंत्रक आदींपासून स्वीपर व सिक्युरिटीपर्यंत एकूण पन्नास जणांचा कर्मचारीवृंद आहे. हे बसस्थानक नाशिक डेपो मॅनेजर यांच्या अधिपत्याखाली येते. रोहिणी ठाकरे व श्री. राजपूत हे डेपो मॅनेजर आहेत. तर तीन पाळ्यांसाठी तीन स्थानकप्रमुख आहेत. तसेच २४ तास नियंत्रक उपलब्ध असतात. प्रसाधन व्यवस्था सशुल्क उपलब्ध आहे. तसेच हिरकणी कक्षाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. गुजरातच्या वापी व अहमदाबाद शहरांसाठी या ठिकाणी प्लॅटफॉर्म आहे. या बसस्थानकात एकूण २० प्लॅटफॉर्म असून, येथून रोज १५०० बसेसची वाहतूक व ६०,००० प्रवासी ये-जा करू शकणार आहेत असे म्हटले जाते. प्रवाशांसाठी कॅन्टीनसाठीही व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, ते अद्यापही कार्यान्वित न झाल्याने भुकेल्या प्रवाशांना दूरवर आपले अन्न शोधावे लागते. एक खासगी दुकानदार काही पदार्थ व पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या विकत असल्याचे आढळले.

### परिस्थिती सुधारेल ही अपेक्षा

आपल्याकडील बहुसंख्य संस्थांचा कारभार हा आरंभशूरतेचा असतो. मोठमोठ्या घोषणा करून प्रकल्प सुरू होतो. मात्र, देखभालीचे आणि कठोर प्रशासनाची कोणतीही व्यवस्था नसल्याने चांगला प्रकल्पही शेवटी समस्यांचे आगर होतं.ज्या सिंहस्थ कुंभमेळ्याचे नाव घेऊन हे मेळा बसस्थानक कोट्यवधी रुपये (सुमारे १४ कोटी रुपये) खर्च करून बांधण्यात आले आहे. तो सिंहस्थ मेळा अद्याप सुरू व्हायचा आहे. त्या आधीच व सुरू होऊन दोन महिन्यांतच या स्थानकाची अवस्था अशी समस्याग्रस्त झाली आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे अधिकारी या सर्व बाबींची दखल घेतील व मेळा बसस्थानकाची परिस्थिती सुधारतील ही अपेक्षा व्यक्त होत आहे.



❛ धूळ व इतर बाबींमुळे एसी यंत्रणा बंद पडली असून, महामंडळाच्या तंत्रज्ञांनी ते तीन-चार दिवसांपूर्वी दुरुस्तीसाठी काढून नेले आहे. एसीचे मेंटेनन्स एसटी महामंडळच करत असते. लवकरच सर्व यंत्रणा अद्ययावत करण्यात येईल.

**- संजय मोहिते,** बसस्थानक प्रमुख




■ टोयोटो कॉम्प्रेहेन्सिव्ह कार डिटेलिंग सोल्यूशन टीग्लॉसचे अनावरण ▶▶ पान ३

# नाशिक आज गांवकरी

■ देशात अन्नधान्य महागाईचा भडका : आरबीआयने दिले स्पष्टीकरण ▶▶ पान ३



■ gavkarinews.com ■ नाशिक, शनिवार, दि. २७ एप्रिल २०२४

## महत्त्वाचे

### राजेंद्र जडे यांना डॉक्टरेट पदवी बहाल

**नाशिक : प्रतिनिधी**

जडे गुरुजी चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र मधुकर जडे नाशिक यांना गांधी पीस फाउंडेशन नेपाळच्या वतीने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील कार्यासाठी मानद डॉक्टरेट पदवी बहाल करण्यात आली. पुणे-चिंचवड येथील ग. दि. माडगूळकर सभागृहात दि. २० एप्रिल २०२४ रोजी पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न झाला. सोहळ्यास नेपाळ पीस फाउंडेशन अध्यक्ष डॉ. लालबहादूर राणा, समाजसेवक पद्मश्री गिरीशजी प्रभुणे, पद्मश्री डॉ. विजयकुमार शहा, डॉ. आशा पाटील, डॉ. महेंद्र देशपांडे, राष्ट्रीय अध्यक्ष बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघ, गांधी पीस फाउंडेशनचे भारताचे प्रभारी डॉ. सुनीलसिंह परदेशी, डॉ. राजेंद्रसिंह वारीया, डॉ. वीरेंद्रसिंग टिळे, डॉ. आहेर, डॉ. आरती अहिरे, प्रमोद कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत गांधी पीस फाउंडेशन नेपाळ आणि कर्तव्यदक्ष फाउंडेशन भारत यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राजेंद्र जडे हे भाजपा नवीन नाशिक मंडल सरचिटणीस, विधानसभा प्रमुख नाशिक पश्चिम मतदारसंघ ओबीसी मोर्चा, लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्था राष्ट्रीय उपाध्यक्ष, प्रदेश सरचिटणीस अखिल भारतीय सुवर्णकार संस्था अशा अनेक संस्थांवर कार्यरत आहेत. मानद डॉक्टरेट मिळाल्याबद्दल विविध क्षेत्रांतून राजेंद्र जडे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### शिवनई येथे आरोग्य तपासणी व चिकित्सा शिबिर

**नाशिक : प्रतिनिधी**



महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील प्रकृती वेलनस सेंटरतर्फे दि. २५ एप्रिल २०२४ रोजी शिवनई (ता. दिंडोरी) येथे आयुर्वेद चिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात मोफत रुग्ण तपासणी व आयुर्वेदीय औषधी वाटप करण्यात आले. यावेळी ८५ पेक्षा अधिक स्थानिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. आयुर्वेदीय चिकित्सा पद्धती जनसामान्यांपर्यंत पोहचावी म्हणून हा उपक्रम महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे मा. कुलगुरू लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त) प.वि.से.प., अ.वि.से.प.,वि.से.प. आणि मा. प्रति-कुलगुरू डॉ. मिलिंद निकुंभ यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. सदर शिबिरामध्ये आयुष विभागप्रमुख डॉ. गीतांजली कार्ले आणि सहाय्यक प्राध्यापक डॉ. अनुश्री नेटके यांनी रुग्ण तपासणी केली व आंतरवासीयता विद्यार्थी वेदांत जवादे, संगम चव्हाण यांचे रुग्ण तपासणीसाठी सहकार्य लाभले. सदर गावामध्ये थायरॉइड विकार, संधिवात, मधुमेह, लहान मुलांच्या पोषणविषयक तक्रारी, त्वचारोग संबंधित रुग्णांना आयुर्वेदीय मार्गदर्शन आणि मोफत औषध वाटप करण्यात आले. तसेच स्थानिकांना आयुर्वेद व योग यांचे महत्त्व सांगून आयुर्वेदीय वनस्पतींचे वाटप करण्यात आले. सदर शिबिर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, वित्त व लेखा अधिकारी एन. व्ही. कळसकर आणि विद्यापीठ शैक्षणिक कक्ष अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

# सवलत योजनेमुळे मनपाच्या गंगाजळीत भर

## ४९ हजार मालमत्ताधारकांकडून ४६ कोटींचा कर भरणा

**नाशिक : प्रतिनिधी**

**मालमत्ताधारकांनी सवलत योजनेचा लाभ घ्यावा, याकरिता नाशिक महापालिकेच्या वतीने एप्रिल ते जून दरम्यान विविध प्रमाणात सवलत दिलेली असते. दरम्यान, एप्रिलमध्ये सवलत योजनेला मालमत्ताधारकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत असून, तब्बल ४६ कोटींचा कर भरत नागरिकांनी आठ टक्के सवलत योजनेचा लाभ घेतला आहे.**

एप्रिलमध्ये आठ, मेमध्ये सहा तर जून महिन्यात तीन टक्के सवलत करावर दिली जाते. दरम्यान, सवलत सुरू झाल्यापासून आतापर्यंत ४६ कोटींचा कर वसूल झाला आहे. गतवर्षीच्या तुलनेत सात कोटींची सरप्लस वसुली झाली असून, ४८ हजारांहून अधिक मालमत्ताधारकांनी या योजनेचा लाभ घेत आठ टक्के सूट पदरात पाडली. मागील आर्थिक वर्ष संपुष्टात आलेल्या आर्थिक वर्षात करसंकलन विभागाने रेकॉर्डब्रेक २०६ कोटी मालमत्ता कर वसूल केला होता. ही कामगिरी पाहता आयुक्तांनी यंदा गतवर्षीच्या तुलनेत दहा टक्के मालमत्ता करवसुलीचे उद्दिष्ट वाढवून दिले आहे. महापालिका नियमित करदात्यांना प्रोत्साहन म्हणून दरवर्षी सवलत योजना राबवते.

त्यात एप्रिल महिन्यात मालमत्ता कर भरल्यास बिलाच्या एकूण रकमेच्या आठ टक्के सूट देण्यात येते. बिल ऑनलाइन भरले तर दहा टक्के सूट मिळते. मे महिन्यात पाच व जून महिन्यात तीन टक्के सूट मिळते. या योजनेमुळे अनेक नागरिक बिल अदा करून सवलत पदरात पाडून घेतात. गतवर्षी पहिल्या तीन महिन्यांत नव्वद कोटींचा भरणा होत नागरिकांनी प्रतिसाद दिला होता. यंदाही या योजनेला प्रतिसाद लाभला आहे. सर्वाधिक भरणा नाशिक पश्चिम विभागातून तर सर्वांत कमी भरणा नाशिकरोड विभागातून झाला आहे. तीस एप्रिलपर्यंत नागरिकांना आठ टक्के सूटचा लाभ घेता येणार आहे. नाशिककरांनी कर सवलत योजनेचा लाभ घ्यावा,, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.



### सवलतीचा फायदा घ्यावा



सवलत योजनेचा मालमत्ताधारकानी जास्तीत जास्त लाभ घ्यावा. एप्रिलमध्ये आठ टक्के सुट असून तसेच मे व जुन मध्येही सुट आहे. तरी नागरिकांनी या सवलत योजनेचा फायदा घ्यावा. चालू महिन्यात ४६ कोटींचा कर भरणार झाला आहे.

**-विवेक भदाणे,** उपायुक्त कर विभाग, मनपा

| विभागानुसार झालेली करवसुली | |
|---|---|
| पंचवटी | ६ कोटी १५ लाख ५२ हजार ५४३ |
| सिडको | ६ कोटी ७७ लाख ४५ हजार ०१७ |
| नाशिकरोड | ५ कोटी ५२ लाख ७ हजार २२९ |
| सातपूर | ४ कोटी ९४०९३६२ |
| नाशिक पश्चिम | ७ कोटी ९२५५९७४ |
| नाशिक पूर्व | ५ कोटी ८६ लाख १० हजार |

# अग्निसुरक्षेसाठी मनपा शाळेत ३७० एक्स्टिंग्विशर

## आगीची दुर्घटना रोखण्यासाठी निर्णय

**नाशिक : प्रतिनिधी**

मागील काही वर्षांत रुग्णालये, हॉटेल, कार्यालये व शाळांमध्ये आगीच्या दुर्घटना वाढत असून, जीवित व वित्तहानीचा धोका नाकारता येत नाही. महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडून शहरातील रुग्णालये, हॉटेल व रेस्टॉरंट यांना फायर ऑडिट बंधनकारक केले आहे. परंतु शाळांमध्ये हजारो विद्यार्थी शिकत असताना फायर ऑडिट व अग्निशमन प्रतिबंधक उपाययोजनांकडे दुर्लक्ष होत आहे. महापालिकेच्या शाळाही त्यास अपवाद नाही. याप्रकरणी खबरदारीचा उपाय म्हणून प्रत्येक शाळेत आगप्रतिबंधक असलेले चार सिलिंडर (एक्स्टिंग्विशर) बसवण्यास सुरुवात झाली आहे.

स्मार्ट स्कूल अभियानामुळे मनपाच्या शाळा डिजिटल झाल्या असून, मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रिक उपकरणे बसवण्यात आली आहेत. अलीकडच्या काळात आग लागण्याच्या वाढत्या दुर्घटना पाहता मनपा शिक्षण विभागाने स्मार्ट स्कूलमधील उपकरणांची सुरक्षेसोबतच विद्यार्थ्यांची काळजी म्हणून प्रत्येक शाळेत चार छोटे आग विझवणारे सिलिंडर (एक्स्टिंग्विशर) बसवण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, महापालिका प्रशासन सुरक्षेच्या दृष्टीने आगप्रतिबंधात्मक उपाययोजना करताना दिसत आहे. दुसरीकडे मात्र शहरातील अनेक नामांकित मोठ्या शिक्षणसंस्थेच्या शाळा आहेत. त्या ठिकाणी अग्निशमन उपाययोजनांकडे दुर्लक्ष होते. काही ठिकाणी या उपाययोजना कागदी देखावा असून, विद्यार्थ्यांच्या जीवाशी निष्काळजीपणा बेतू शकतो. त्यामुळे आगीची मोठी दुर्घटना घडल्यास जीवित व वित्तहानीची मोठा धोका नाकारता येत नाही. त्यामुळे मनपाच्या अग्निशमन विभागाने याकडे लक्ष देण्याची मागणी होते आहे. अलीकडे महापालिकेच्या ऐंशी शाळांचे स्मार्ट स्कूल उपक्रमांतर्गत कायापालट झाला आहे. डिजिटल स्क्रीन बोर्ड, अत्याधुनिक संगणक कक्ष, सीसीटीव्ही यांसह मोठ्या प्रमाणात विद्युत उपकरणे बसविण्यात आली आहे. शाळांच्या डिजिटिलायझेशवर सत्तर कोटींचा खर्च झाला आहे. शाळांचे रुपडे पालटल्याने मनपाच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा कलही वाढत आहे. अलीकडच्या काळात कमी अधिक विद्युत दाबामुळे शार्टसर्किट होऊन आग लागण्याचा धोका वाढला आहे. आग मोठी असल्यास विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका पोहचू शकतो. तसेच आगीत कोट्यवधीचे उपकरणेही भस्मसात होण्याचा धोका आहे. ते पाहता मनपा शिक्षण विभागाने प्रत्येक स्मार्ट स्कूलमध्ये चार आग विझवणारे छोटे सिलिंडर बसवण्याचा निर्णय घेतला आहे. जेणेकरुन आगीच्या दुर्घटना घडल्यास तत्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे शक्य होईल. तसेच शाळेतील कर्मचाऱ्यांना अग्निशमन उपाययोजनांचे प्रात्यक्षिक दिले जाणार आहे.

प्रत्येक शाळेत प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून ऐंशी शाळांमध्ये ३७० छोटे सिलिंडर बसविले जात आहे. खासगी शाळांनीही अग्निशमन उपाययोजनांबाबत जागृत राहावे. जेणेकरून जीवित व वित्तहानी टाळणे शक्य होईल. स्मार्ट स्कूल उपक्रमांतर्गत शाळांमध्ये इलेक्ट्रिक उपकरणे बसविण्यात आली आहेत. शॉर्टसर्किटच्या धोक्यामुळे आग लागण्याचा धोका नाकारता येत नाही.

**- बापूसाहेब पाटील,** शिक्षणाधिकारी, मनपा




# पाणीकपातीचे संकट टाळण्यासाठी पंपिंगचा आधार

## मृत जलसाठ्यातील पाणी उचलण्याच्या हालचाली

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकमधील गंगापूर व दारणा जलसमूहातून समन्यायी पाणी वाटप निर्णयानुसार मराठवाड्यातील जायकवाडीसाठी तीन टीएमसी पाणी सोडण्यात आले. नाशिक शहराला वर्षभरासाठी ५८०० दलघफू पाणी आरक्षणाची गरज असताना जलसंपदाने ५३०० दलघफू पाणी मंजूर केले. यामुळे मात्र मनपासमोर शहराची ३१ जुलैपर्यंत तहान भागविण्यासाठी ५०० दलघफू पाण्याची कमतरता होती. याकरिता चर खोदण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु शासनाला महिन्यापूर्वी पाठवलेले पत्रच गहाळ झाल्याने शासनाला पुन्हा नव्याने पत्र पाठवावे लागणार आहे. मात्र, या प्रक्रियेसाठी आणखी वेळ जाणार आहे. यावर उपाय म्हणून मनपाच्या पाणीपुरवठा विभागाने वेळेत चर खोदणे झाले नाहीतर त्याऐवजी पंपिंगद्वारे पाणी उचलण्याचा पर्याय हाती घेतला आहे. यापूर्वी नाशिकवर पाणीकपातीचे ढग ओढावल्यावर २०१६ मध्ये मृतजलसाठ्यातील पाणी पंपिंगद्वारे उचलण्यात आले होते.

महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने शासनाला चर खोदण्यासाठी पुन्हा पत्रव्यवहार करत आहे. परंतु या प्रक्रियेला विलंब होण्याची चिन्हे बघता नाशिककरांवर पाणी कपातीचे संकट ओढावू शकते. पाणीकपात टाळण्यासाठी पंपिंगद्वारे मृत जलसाठ्यातील पाणी जॅकवेलपर्यंत आणण्याचा पर्याय मनपाकडून तयार केला जातो आहे. विशेष म्हणजे यापूर्वी २०१६ मध्ये अशी परिस्थिती उद्भवल्यावर पंपिंग करून पाणी लिफ्ट करण्यात आले होते. दरम्यान, मेच्या पहिल्या आठवड्यात चर खोदण्यासाठी निविदा प्रसिद्ध होऊन मेअखेरपर्यंत हे काम मार्गी लागणे अपेक्षित होते. मात्र, मंत्रालयात चर खोदणे सर्वेक्षणासाठी पाठवलेला प्रस्ताव हरवल्याने नव्याने प्रस्ताव पाठविण्याची तयारी पाणीपुरवठा विभागाने सुरू केली आहे. मात्र, अगोदरच विलंब झाला असताना पुढील सर्व कामाला आणखी विलंब होणार आहे. येत्या ३१ जुलैपर्यंत तहान भागविण्यासाठी गंगापूर धरणावर वीस दिवसांचा पाणी तुटवडा असून, शहरावर पाणीकपातीचे संकट आहे. यावर पर्याय म्हणून पाणीपुरवठा विभाग गंगापूर धरणातील मृत जलसाठा पंपिंगद्वारे उचलण्याची तयारी ठेवली आहे. जलसंपदाला गंगापूर धरण मृतसाठ्यातील सहाशे दलघफू पाणी उचलण्यास परवानगी दिली. परंतु, विशिष्ट लेव्हलनंतर पाण्याची पातळी खालावल्यास जॅकवेलपर्यंत पाणी पोहचत नाही. त्यामुळे हा मृत जलसाठा वापरण्यासाठी मनपा पाणीपुरवठा विभागाने धरणात चर खोदण्यापूर्वी सर्वेक्षणासाठी काढलेल्या निविदा आचारसंहितेच्या कचाट्यात अडकली.



चरसाठीच्या प्रक्रियेला विलंब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वेळेप्रसंगी पंपिंगद्वारे पाणी पंप करून थेट जॅकवेलपर्यंत नेले जाईल. त्यादृष्टीने तयारी सुरू आहे.

**- संजय अग्रवाल,** अधीक्षक अभियंता, मनपा

# टॅक्स का रामायण : राज्यस्तरीय कर परिषदेचे नाशिकला आयोजन!

**नॉर्थ महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशन यांच्या वतीने नाशिक येथील हॉटेल ट्रीट, मनोहर गार्डन, गोविंदनगर येथे २८ व २९ एप्रिल रोजी 'टॅक्स का रामायण' या राज्यस्तरीय कर परिषदेचे आयोजन करण्यात आले असून, त्यासाठी राज्यभरातून तसेच गुजरात राज्यातून देखील सुमारे ३०० कर सल्लागार सहभागी होणार आहेत. या परिषदेत विमल जैन यांच्यासारखे अनेक विषयतज्ज्ञ येणार आहेत. या पार्श्वभूमीत कर सल्लागार असोसिएशनचे अध्यक्ष अनिल चव्हाण यांची घेतलेली मुलाखत 'गांवकरी'च्या वाचकांसाठी सादर करीत आहोत.**




**डॉ. धर्मेंद्र मुल्हेरकर**
**सहसंपादक, दै.गावकरी**

**नॉर्थ महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशनची व्याप्ती आणि कार्य काय आहे?**

नॉर्थ महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशन ही संस्था उत्तर महाराष्ट्रातील कर सल्लागार जी संघटना असून, त्यात सनदी लेखापाल वकील व कर सल्लागार यांचा समावेश आहे. करसल्लागार हे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कराबाबत व्यापारी, संस्था, व्यक्ती, पार्टनरशिप तसेच प्रायव्हेट कंपन्या यांना सल्ला देत असतात. तसेच त्यांना कराबाबत येणाऱ्या समस्यांचे निराकरण करून टॅक्स भरण्यासाठी मदत करत असतात, मात्र या कर सल्लागारांनादेखील अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते. त्यासाठी त्यांच्या समस्यांचे निराकरण ही संघटना करीत असते. वेळोवेळी सेमिनार किंवा परिषदांचे आयोजन करून कर सल्लागारांचे ज्ञान अद्ययावत ठेवण्याचे कार्य ही संघटना करत असते. सुमारे ३०० कर सल्लागार या संघटनेचे सदस्य आहेत.

**टॅक्स का रामायण या कर परिषदेचे आयोजन करण्यामागे उद्देश काय आहे?**

टॅक्स प्रॅक्टिस करत असताना करावा बऱ्याच माहितीचे अद्ययावत ज्ञान आत्मसात करतच नाही हे कर सल्लागारांना आवश्यक असते, मात्र बऱ्याचदा कर सल्लागार हे पुरेसा अभ्यास करत नाही तसेच नवीन परिपत्रकांचा अचन करत नाही. त्यामुळे त्यांना कराबाबतच्या सर्वंकष माहितीचे ज्ञान देणे तसेच कर भरण्याबाबत येणाऱ्या समस्यांचे निराकरण करणे कर बाबा तरतुदींचा कोल्हापूर तसेच कर सल्लागार या व्यवसायात असणाऱ्या व्यक्तींचे एकत्र सह स्नेहसंमेलन तसेच हा एक टॅक्ससंबंधी रिफ्रेशर कोर्स उपलब्ध करून देणे हा या परिषदेच्या आयोजनामध्ये उद्देश आहे.

**राज्यस्तरीय कर परिषदेची व कार्यक्रम पत्रिका काय आहे?**

हे राज्यस्तरीय कार्पोरेशन दोन दिवसांच्या असून, दिनांक २८ एप्रिल रोजी सकाळी आठ ते नऊ यावेळी सभासदांचे रजिस्ट्रेशन व नाश्ता होईल व नऊ वाजता प्रथम सत्रास प्रारंभ होईल. त्यानंतर सुरेश कुमार काळे (राज्य न्यायाधिकरण सदस्य), सुभाष हेंडगे (अतिरिक्त आयुक्त राज्य कर ), संजय खरोटे (वरिष्ठ कर सल्लागार) यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन होईल, त्यानंतर विविध सत्रांमध्ये प्रमुख विषयांवरचे व्याख्यान देतील.

**परिषदेमध्ये कोणते प्रमुख व्याख्याते येणार व त्यांचे कोणते विषय असतील?**

एकूण सात सत्रांमध्ये प्रमुख पाहुण्यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असून, देशपातळीवरील कर विषयातील विषय तज्ज्ञ व्याख्यान देणार असून, त्यात पहिल्या सत्रात सनदी लेखापाल रोहित कपूर हे 'असेसमेंट अंडर सेक्शन १४८ ऑफ द इन्कम टॅक्स' या विषयावर व्याख्यान देणार असून, नितेश मोदी हे अध्यक्षस्थानी असतील. दुसरे व्याख्यान सुप्रसिद्ध व्याख्याते सनदी लेखापाल व एडवोकेट विमल जैन हे 'आयटीसी के साइज अंडर जीएसटी अँड वे फॉरवर्ड' या विषयावर व्याख्यान देणार आहेत. तिसऱ्या सत्रात सनदी लेखापाल आंचल कपूर या 'सर्च, सिजर, नोटीस अँड लिटिगेशन अंडर जीएसटी' या विषयावर व्याख्यान देणार असून, अध्यक्षपदी दीपक बापट असतील. चौथ्या सत्रात प्रकाश रिजवानी हे असून, ते 'अपील अंडर जीएसटी इन साइट्स' या विषयावर व्याख्यान देणार आहेत व अध्यक्षपदी प्रदीप क्षेत्रीय असतील. पाचवे सत्रात सनदी लेखापाल विशाल पोद्दार हे क्लासिफिकेशन इश्यूज अंडर जीएसटी हाऊ टू हॅंडल या विषयावर व्याख्यान देणार आहेत व अध्यक्षस्थानी आर. के. देवधर हे असणार आहेत तर सहाव्या सत्रात सनदी लेखापाल योगेश इंगळे हे 'शोकॉज् नोटीस रिप्लाय अँड ऍडजुडीकेशन अंडर जीएसटी' या विषयावर व्याख्यान देणार असून, ॲडव्होकेट दिनेश तांबडे हे अध्यक्षस्थानी असणार आहेत. सातव्या सत्राचे व्याख्याते प्रेमल गांधी हे असणार असून, ते 'चारिटेबल ट्रस्ट कटिंग कॉम्प्लेक्स सिटी अंडर इन्कम टॅक्स' या विषयावर व्याख्यान देणार आहेत तर अध्यक्षस्थानी डी. एन. पारख हे असणार आहेत. शेवटच्या सत्रात अनेक मान्यवर व करतज्ज्ञ हे कर विषयावर उघड चर्चा करणार आहेत.



**करसल्लागारांसमोर कोणती आव्हाने आहेत?**

जीएसटी हा नवीन कायदा आहे. शिवाय, त्यात वारंवार बदल व दुरुस्त्या होत असतात. एका वर्षात ५०० पेक्षा अधिक दुरुस्ती होत असते. त्यात अनेक प्रकारच्या गुंतागुंत होत असते. त्यामुळे अनेक प्रकारच्या पुस्तकांचा व परिपत्रक नियमांचे कर सल्लागाराला करावा लागतो व त्याचे व्यावहारिक ज्ञान त्याला बाळगावी लागते तर योग्य सल्ला देऊ शकतो.

**कर सल्लागार संघटनांचे शासनाकडे काय मागणे आहे?**

विशेषतः जीएसटी किंवा कोणत्याही टॅक्स कररचनेमध्ये बदल वादग्रस्त करायचे असल्यास शासन ते एकदम वेळेवर करते व लगेच ते लागू झाल्याचे घोषित करते. त्यामुळे व्यापाऱ्यांना किंवा व्यक्तींना करांचे नियोजन करता येत नाही व त्यांना आपल्या कर व्यवस्थापन करण्यामध्ये खूप अडचण येते तसेच कधी कधी नुकसानही सहन करावे लागते. उदाहरणार्थ आधार कार्ड व पॅन कार्ड लिंक करण्याबाबतचे निर्देश हे वेळेवर मिळाल्याने टीडीएस कंत्राटदारांना त्याप्रमाणे आधार कार्ड लिंक नसल्याने दंड भरावा लागला व नुकसान झाले. मात्र, नंतर त्यात दुरुस्ती झाली. परंतु जर अशा प्रकारचे बदल काही काळ आधीच शासनाने प्रसिद्ध केले तर त्याप्रमाणे व्यापारी व व्यक्तींना नियोजन करता येईल व त्यांचे नुकसान टळेल व चुकाही टळतील.

तसेच कितीही छोटी खासगी कंपनी असल्यास तिला ऑटो ट्रायल नावाच्या सॉफ्टवेअरमुळे दररोज व्यवहाराची एन्ट्री करावी लागते व ती डिलीट करता येत नाही. त्यामुळे देखील प्रत्येक व्यापाऱ्याला ते करणे खूप अवघड होऊन जाते. कारण त्याच्याकडे स्वतंत्र असा त्यासाठी स्टाफ नसतो. पूर्वी तो महिनाअखेर अथवा तिमाही किंवा वार्षिक या पद्धतीने पूर्ण रेकॉर्ड मेंटेन करीत असे. घोटाळे टाळण्यासाठी दररोज एंट्री होणे आवश्यक असले तरी व्यावहारिकदृष्ट्या ते अवघड होते. तेव्हा याबाबतीत देखील शासनाने विचार करून त्यात दुरुस्ती करण्याची तरतूद ठेवली तर करदात्यांना आपले रेकॉर्ड अद्ययावत करणे सोपे जाईल असे वाटते.

**इन्कम टॅक्समध्ये नवीन करप्रणाली व जुनी करप्रणाली यात काय फरक आहे?**

जुन्या करप्रणालीत करदाता हा गुंतवणूक किंवा बचत करून आपल्या करामध्ये काही सवलती मिळवू शकतो. मात्र, नवीन करप्रणाली अशा प्रकारे कोणतीही सवलत त्याला घेता येत नाही तसेच दोन्हीही करप्रणालीतील आयकराचे स्लॅब वेगवेगळे आहेत. जुन्या कराप्रमाणे शून्य ते अडीच लाखांपर्यंत कोणताही टॅक्स नाही. अडीच लाख ते पाच लाख पाच टक्के, पाच लाख ते दहा लाख वीस टक्के व दहा लाखांच्या वरती ३० टक्के असा कराचा दर आहे. तर नवीन करप्रणालीत तीन लाखांपर्यंत कोणताही टॅक्स नाही. तीन लाख ते सहा लाखांपर्यंत पाच टक्के, सहा लाख ते नऊ लाख दहा टक्के, दहा लाख ते बारा लाख पंधरा टक्के, बारा लाख ते पंधरा लाख वीस टक्के व पंधरा लाखांपेक्षा अधिक तीस टक्के असे कराचे स्लॅब आहेत. तर स्टॅंडर्ड डिडक्शन हे दोन्ही प्रणालीत रु. ५००००/- इतके सारखेच आहेत.

**महाराष्ट्रातून एकूण किती जीएसटी जमा होतो?**

भारतात जमा होणाऱ्या एकूण जीएसटीपैकी १६ टक्के जीएसटी महाराष्ट्रातून जमा होतो. ती रक्कम २७,६८८ कोटी इतकी आहे. त्यामुळे कर सल्लागारांसाठी मोठीच संधी आहे. मात्र, कर निर्धारणांसाठी माहितीचे ज्ञान असणे आवश्यक आहे व ते अशा परिषदांमुळे अद्ययावत होते.

## संपादकीय

# ईव्हीएमचा विजय

ईव्हीएम अर्थात अर्थात इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन म्हणजेच मतदान यंत्रावर मतदान केल्यानंतर ते मत दिलेल्या उमेदवाराला मिळत नाही, मतदान यंत्रात काहीतरी गडबड आहे, मतदान यंत्रात फेरफार केला जाऊ शकतो, मतदान यंत्र हॅक केले जाऊ शकते अशा अनेक शंकाकुशंका गेल्या काही वर्षांत व्यक्त केल्या जात होत्या. मत कोणालाही द्या ते आमच्याच उमेदवाराला मिळेल, असाही आगाऊ प्रचार केला जात होता. मतदान यंत्रांवर अविश्वास व्यक्त केला जात होता. विरोधक आणि काही स्वयंसेवी संस्थाचाही मतदान यंत्राविषयी संशय बळावत होता. मतदान यंत्रे सुरक्षित असल्याचा दावा निवडणूक आयोग सातत्याने करत आला आहे. या दाव्याला आधार म्हणून प्रात्यक्षिकेही घेण्यात आली होती. मतदान यंत्रे सुरक्षित आहेत. त्यात फेरफार करता येत नाही, हे सर्वोच्च न्यायालयाने मतदान यंत्रांवर संशय घेणाऱ्या सर्व याचिका शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावल्याने ईव्हीएम अर्थात मतदान यंत्रांचा विजय झाला. सुनावणीत न्यायालयाने निवडणूक सुधारणांचे स्वागत करत पुन्हा जुन्या म्हणजे मतपत्रिका आणि मतपेटी पध्दतीचा अवलंब करण्यास विरोधच केला होता. मतदान यंत्रात नोंद झालेली मते आणि सर्व व्हीव्हीपॅट पावत्या यांची पडताळणी करणे, मतदानानंतर मतदाराला स्वत:च्या हाताने व्हीव्हीपॅट पावती मतपेटीत टाकण्याची परवानगी देणे या मागण्या सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावत निवडणूक आयोगावर विश्वास ठेवला. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला असला, तरी मतदान यंत्रांविषयी जो काही संशय दूर होईल, याची खात्री देता येत नाही. निवडणूक आयोगाचा विजय झाला असला, तरी मतदान प्रक्रिया निष्पक्षपणे पार पाडावी, संशयाला जागा राहणार नाही, याचा गांभीर्याने विचार करण्याचा सल्ला न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिला. विरोधी पक्ष आणि काही स्वयंसेवी संस्थांनी व्यक्त केलेला संशय सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावल्याने भारत निवडणूक आयोगाचा विजय झाला आहे. ईव्हीएमऐवजी पुन्हा पारंपरिक पध्दतीने मतपत्रिका आणि मतपेट्यांचा वापर करण्यास सर्वोच्च न्यायलयाने आधीच नकार दिला होता. ईव्हीएमविषयी असलेला संशय दूर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने आयोगाला दिले होते. आयोगाने सर्वोच्च न्यायालयात आपली भूमिका स्पष्ट केली होती. ईव्हीएममध्ये मतांची आणि मतदान आणि जमा होणार्या मतदान पावत्यांची खातरजमा करावी, हीच याचिकाकर्त्यांची मागणी होती. याचिकाकर्त्यांनी ईव्हीएममध्ये काहीतरी गडबड होत असल्याचा संशय व्यक्त केला होता. पण, संशय घेणेच चुकीचे असल्याचा निर्वाळा सर्वोच्च



न्यायालयाने दिल्याने विरोधी पक्ष आणि याचिकाकर्त्यांचा मुखभंग झाला आहे. मतदान यंत्रातील मते आणि सोबतच्या मत पावत्या यांची तोंडमिळवणी करण्याचा आदेश द्यावा, अशी मागणी करणार्या याचिका न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांनी फेटाळून लावल्या असल्या, तरी निवडणूक आयोगाची जबाबदारी वाढवून उमेदवारांना काही अधिकारही मिळाले आहेत. निकाल जाहीर झाल्यानंतर सात दिवसांच्या आत संबंधित ईव्हीएमची पूर्ण चाचपणी करण्याची मागणी करण्याचा उमेदवारांना अधिकार देण्यात आला आहे. तज्ज्ञ अभियंत्यांच्या पथकामार्फत ही तपासणी केली जाईल. यासाठी येणारा खर्च संबंधित उमेदवाराला उचलावा लागेल. ईव्हीएमशी छेडछाड केल्याचे निष्पन्न झाले, तर हा खर्च उमेदवाराला परत दिला जाईल. एखाद्या पराभूत उमेदवाराला संशय आला, तर त्याला यंत्राची तपासणी करवून घेण्याचा अधिकार आहे. ईव्हीएमशी छेडछाड केल्याचे निष्पन्न झाले, तर खर्च उमेदवाराला परत दिला जाणार असला, तरी छेडछाड झाल्यानंतर पुढे काय करायचे? यावर न्यायालयाने काहीही निर्देश दिलेले नाहीत. मात्र, ईव्हीएमवर संशय घेणाऱ्यांना सुनावले आहे. व्यवस्थेवर थेट अविश्वास दाखविणे चुकीचे असल्याचे मत न्यायालयाने व्यक्त केले आहे. अंधपणे व्यवस्थेवर अविश्वास दाखवला तर त्याचा परिणाम विनाकारण संशय निर्माण करण्यामध्ये होऊ शकतो, असे न्यायमूर्ती दत्ता म्हणाले. त्यांनी पेपर स्लिप मोजण्यासाठी यंत्रिक व्यवस्था राबवता येऊ शकते का? याची चाचपणी करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला दिले. याचा अर्थ भविष्यात मतपावत्या यंत्राद्वारे मोजता येऊ शकतात. तंत्रज्ञानात दररोज बदल होत असल्याने ही बाब अशक्य नाही. निकाल जाहीर करण्यापूर्वी न्यायालयाने निवडणूक आयोगाची बरीच झाडाझडती घेतली. कंट्रोल युनिट किंवा व्हीव्हीपॅटमध्ये कोणते मायक्रो कंट्रोलर बसवले जातात? मायक्रोकंट्रोलर एकाच वेळी प्रोग्रामेबल आहे का? ईव्हीएममध्ये किती सिम्बॉल लोडिंग युनिट्स उपलब्ध आहेत? निवडणूक याचिकांची मर्यादा ३० दिवसांची आहे आणि त्यामुळे ४५ दिवस ईव्हीएममध्ये डेटा साठवला जातो, परंतु कायद्यात ती सुरक्षित ठेवण्याची मर्यादा ४५ दिवस आहे, साठवणुकीचा कालावधी वाढवावा लागेल का? असे प्रश्न सुनावणीत आयोगाला विचारण्यात आले. मतदान युनिटमध्ये बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅट युनिट असते. सर्व युनिटचे स्वतःचे मायक्रो कंट्रोलर असतात. या नियंत्रकांशी छेडछाड करता येणार नाही. हा प्रोग्राम सर्व मायक्रोकंट्रोलर्सना एकदाच फीड केला जाऊ शकतो. निवडणूक चिन्हे अपलोड करण्यासाठी एक ईसीआय आणि दुसरी भारत इलेक्ट्रॉनिक्स अशा दोन कंपन्या आहेत. सर्व ईव्हीएम ४५ दिवस स्ट्राँगरूममध्ये सुरक्षित ठेवण्यात येतात. निवडणुकीसंदर्भात कोणतीही याचिका दाखल झाली आहे की नाही, याची खातरजमा केली जाते. याचिका दाखल झाल्यास स्ट्राँगरूम सील केली जाते. अशा प्रकारची उत्तरे निवडणूक आयोगाने न्यायालयात दिली. यावर समाधान व्यक्त करत न्यायालयाने याचिका फेटाळल्या. ईव्हीएम याचिकांतून सुटका झाली असली, तरी आयोगाला आणखी एका याचिकेवर सफाई द्यावी लागणार आहे. ती याचिका म्हणजे 'नोटा'! मतदान यंत्रावर दिलेल्या यादीमधील उमेदवारांपैकी एकही उमेदवार पसंत नसेल तर? तर नोटाचा पर्याय निवडणूक आयोगाने दिला आहे. नोटा म्हणजे काय? नन ऑफ द अबोव्ह ('यापैकी कुणीही नाही'). नोटाचा वापर २०१३ मध्ये पहिल्यांदा झाला. छत्तीसगड, मिझोरम, राजस्थान आणि मध्यप्रदेश, दिल्ली या ठिकाणी झालेल्या मतदानावेळी नोटाचा वापर झाला होता. जर या नोटाला सर्वांत जास्त मते मिळाली, तर त्या मतदारसंघातील निवडणूक रद्द करावी, अशी मागणी करणारी एक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. यावर निवडणूक आयोगाला नोटीस बजावण्यात आली आहे. नोटाविषयी निवडणूक आयोगाला भूमिका स्पष्ट करावी लागणार आहे. निवडणूक सुधारणा होत असल्या, तरी त्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. ईव्हीएमबाबत तेच झाले आता नोटावर तीच वेळ आली आहे.

## विचारधन



### नामधारकाने टाळण्याच्या गोष्टी

आपले विचार स्वार्थाचे नसावेत. स्वार्थामध्ये अभिमान नेहमी जागृत असतो. स्वार्थी मनुष्याला जगात सुख मिळणे कधीही शक्य नाही. नीतीची बंधने पाळा. परस्त्री मातेसमान माना. प्रपंचात एकपत्नीव्रताने राहणारे गृहस्थ लोक ब्रह्मचारीच होत. परद्रव्याची अभिलाषा धरू नका. त्याला विष्ठेसमान माना. दुसऱ्याच्या पैक्याचा अभिलाष धरण्यात आपला किती घात आहे याची नुसती कल्पनाच केलेली बरी. परस्त्री, परद्रव्य, यांच्याप्रमाणेच परनिंदा हीही अत्यंत त्याज्य आहे. परनिंदेने न कळत आपण आपलाच घात करीत असतो. परनिंदेमध्ये दुसऱ्यांच्या दोषांचे चिंतन होत असल्याकारणाने, ते दोष आपल्याकडे येत असतात. या सर्व गोष्टी सांभाळून तुम्ही नाम घ्या, नामाचे प्रेम तुम्हाला अगदी खात्रीने येईल. हे सर्व करीत असताना तुमचे आईवडील, बायकोमुले, यांच्या बाबतीत असलेले कर्तव्य करायला चुकू नका आणि त्या कर्तव्यात आसक्ती राहू देऊ नका. कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता केलेले कर्म हे कर्तव्यच होय. ते कर्तव्य सांभाळून नीतिधर्माने वागून आपला प्रपंच करा आणि भगवंताचे स्मरण ठेवा. मग तुमचा प्रपंचच परमार्थरूप बनून भगवंताचे प्रेम तुम्हाला मिळेल हा माझा भरवसा तुम्ही बाळगा. प्रपंच हा मिठासारखा आहे. भाकरीत मीठ किती घालायचे असते? तर अगदी थोडे-फक्त चवीपुरते! परंतु आपण मिठाची भाकरी करतो आणि त्यात परमार्थाचे चिमूटभर पीठ टाकतो; मग ती भाकरी खाता येईल का? खरे समाधान मिळाल्यावर मनुष्य खेळासारखा प्रपंच करतो. त्यामध्ये तो वर चढला किंवा खाली पडला तरी सारखाच राहील; दुसऱ्याने डाव टाकल्यावर तो आपणही डाव टाकील! पण डाव हरला किंवा जिंकला तरी त्याची त्याला पर्वा राहणार नाही. प्रपंचात अनेक वस्तू आहेत, पण भगवंताजवळ एकच वस्तू आहे. प्रपंचात कितीही वस्तू आणल्या तरी त्या पुऱ्या पडत नाहीत, कारण एका वस्तूच्या आणण्यामध्येच दुसऱ्या वस्तूच्या आणण्याचे बीज आहे. पण भगवंताचे तसे नाही; भगवंताची वस्तू एकदा आणली की, पुन्हा ती आणायला नको. समजा, एका दुकानात पुष्कळ माल भरलेला आहे; पण आपल्याला पाहिजे ती वस्तू तिथे नाही, म्हणजे आपल्या दृष्टीने तिथे काहीच नाही! त्याचप्रमाणे सर्व प्रकारच्या मानसिक शक्ती असून, तिथे भगवंत नसेल, तर त्या असून नसून सारख्याच समजाव्यात. परमात्म्याला प्रपंचरूप बनविण्याऐवजी आपण प्रपंचाला परमात्मरूप बनवावा. यातच जन्माचे सार्थक आहे.

# लोकसंख्या नियंत्रण हा प्रचाराचा मुद्दा का नाही?

मुंबईत नोकरीनिमित्त प्रतिदिन लोकल रेल्वेचा प्रवास करावा लागतो. काही वर्षांपूर्वी एप्रिल, मे महिना आला की, लोकल गाड्यांची गर्दी बरीचशी कमी झालेली असे, कारण मुंबईतला चाकरमानी आंबे-फणस खाण्यासाठी कोकणात आपल्या गावी गेलेला असे. आज मात्र स्थिती बदलली आहे. सुट्यांचे दिवस मग ते विद्यार्थ्यांचे असोत वा सरकारी कर्मचाऱ्यांचे मुंबईच्या लोकल गाड्या या दिवसांतही ओसंडून वाहत असतात. सकाळी कार्यालयांत जाण्याच्या आणि सायंकाळी कार्यालये सुटण्याच्या वेळेत लोकल गाड्यांच्या क्षमतेपेक्षा किमान ५ पटीने अधिक माणसे गाड्यांच्या डब्यांत अक्षरशः गुरांसारखी कोंडून प्रवास करत असतात. याखेरीज लोकल डब्यांच्या दुतर्फा दरवाजावर लटकणारी मंडळी मैलोन्मैलांचा रेल्वे प्रवास अक्षरशः पायांच्या बोटांवर उभे राहून करतात. या लटकण्याच्या सर्कशीत धावत्या रेल्वेतून पडून प्रतिदिन किती बळी जातात आणि किती आयुष्यभरासाठी जायबंदी होतात याची तर मोजदादच नाही. गर्मीच्या उकाड्यात तर गर्दीत कोंडल्यामुळेही कित्येकांचा जीवसुद्धा जातो. आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी हा जीवनमरणाचा प्रवास इथला नोकरदारवर्ग नित्यनेमाने करत असतो. यामध्ये नोकरदार स्त्रियांचे होणारे हाल तर डोळ्यांना पाहवतही नाहीत. नोकरी-व्यवसायाच्या आशेने प्रतिदिन हजारोंचे लोंढे मुंबईत येत असतात. राज्यातील प्रगत आणि प्रगतिशील सर्वच शहरांची आज हीच स्थिती आहे. लोकल रेल्वेचा जीवघेणा प्रवास नको म्हणून काहीजण कर्ज काढून वाहने घेतात; मात्र वाढत्या वाहनांमुळे कार्यालयीन वेळेत प्रमुख रस्त्यांवर सामान्य मुंबईकरांना प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. दिवसागणिक वाहनसंख्येत वाढच होत असल्याने ध्वनिप्रदूषण, वायुप्रदूषणसुद्धा कमालीचे वाढत आहे, ज्याचा परिणाम हवेच्या गुणवत्तेवर होऊन गेल्या काही महिन्यांपासून मुंबई आणि मुंबईच्या आजूबाजूच्या शहरांची हवा विषारी झाली आहे. याचे परिणाम म्हणून लहान मुलांसह वयोवृद्ध, गर्भवती स्त्रिया श्वसनविकारांनी ग्रस्त झाले आहेत. या सर्व परिस्थितीला कारणीभूत एकच घटक आहे, तो म्हणजे 'लोकसंख्यवाढीचा भस्मासुर'. वाढत्या लोकसंख्येमुळे ग्रामीण भागात रोजगाराचा प्रश्न निर्माण होतो आणि रोजगाराच्या शोधासाठी ग्रामीण भागातील तरुणवर्ग शहराकडे वळतो. वाढत्या लोकसंख्येमुळे आज शहरांचा श्वास कोंडतो आहे. ज्या ज्या ठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, जीवनावश्यक बाबींची सुबत्ता निर्माण होईल त्या त्या ठिकाणी भविष्यात अशीच अवस्था निर्माण होईल. लोकसंख्येच्या बाबतीत चीनला मागे टाकून आपल्या देशाने पहिला क्रमांक पटकावला आहे. आज सर्वत्र लोकसभा निवडणुकांचे वारे वाहत आहे. काही राज्यांतील काही भागांत निवडणुका पार पडल्या आहेत तर काही ठिकाणी येणाऱ्या महिन्याभरात त्या होणार आहेत. सर्वच पक्ष कंबर कसून तयारीला लागले आहेत. पक्षांचे जाहीरनामे प्रसिद्ध झाले आहेत ज्यामध्ये देशातील आजच्या समस्यांचा उल्लेख करून आमचा पक्ष त्या समस्या कशा सक्षमपणे



सोडवू शकतो याची हमी देण्यात आली आहे; मात्र सर्व समस्यांचे मूळ असलेल्या लोकसंख्यावाढीवर नियंत्रण आणण्याचे आश्वासन

**कटाक्ष**
**जगन घाणेकर**

कोणत्याच पक्षाच्या जाहीरनाम्यात आज दिसून येत नाही याचे आश्चर्य वाटते. चीनमध्ये वाढती लोकसंख्या देशाच्या विकासावर परिणाम करत असल्याचे लक्षात येताच तेथील सरकारने लोकसंख्येवर नियंत्रण आणण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू केले. १९७९ सालापासून चीनने एकल अपत्य धोरण देशभरात सक्तीने राबवले. ज्यामुळे सुमारे ४०० दशलक्ष नवीन जन्म चीनला रोखता आले. भूभागाच्या बाबतीत भारताच्या तीनपटीने मोठ्या असलेल्या चीनने लोकसंख्येच्या बाबतीत मागील अनेक दशकांपासून आपले नाव पहिल्या क्रमांकावर कायम ठेवले होते. वाढत्या लोकसंख्येमुळे देशाचा विकास खुंटत असल्याचे लक्षात आल्यावर मात्र चीनने ती रोखण्यासाठी पुष्कळ मेहनत घेतली. एप्रिल २०२३ मध्ये भारत हा चीनला मागे टाकून जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला. विकासाच्या बाता करणाऱ्या आपल्या सरकारने मात्र वाढत्या लोकसंख्येचेही भांडवल बनवले. मानवाच्या मूलभूत गरजा पुरवणारे नैसर्गिक स्रोत मर्यादित असल्याने वाढत्या लोकसंख्येचा ताण त्यावर पडत आहे. शहरासारख्या ठिकाणी पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांची संख्या आणि क्षमता मर्यादित आहे. अल्प पावसामुळे ही जलाशये भरली नाहीत तर पाणीकपातीचे संकट ओढवते. शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे हे संकट वर्षागणिक अधिक भयावह होऊ लागले आहे. रोजगारासाठी लोकांचे लोंढेच्या लोंढे प्रतिदिन शहराकडे धाव घेतात. ज्यामध्ये परप्रांतीयही असतात आणि बांगलादेशी घुसखोरही असतात. यांच्या निवासासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि झोपडपट्टी दादा यांच्या आशीर्वादाने ठिकठिकाणी अनधिकृत वस्त्या आणि झोपडपट्ट्या निर्माण होऊ लागल्या आहेत. मतांच्या लाचारीसाठी हे स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासाठी वीज आणि पाणी यांसह कागदपत्रांची आणि रोजगाराची सोयही करून देतात. या सर्वांमुळे मागील अनेक पिढ्यांपासून शहरांत राहणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ लागला आहे. वाढत्या उद्योगधंद्यासह शहरांतील श्रीमंतांची संख्याही वाढल्याने शहरांत ठिकठिकाणी टोलेजंग इमारती उभ्या राहू लागल्या आहेत. या सर्वांसाठी झाडांची आणि नैसर्गिक संपत्तीची सर्रासपणे कत्तल केली जात आहे. वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण आणण्यासाठी काही ठोस उपाययोजना काढण्याऐवजी राजकीय पक्ष प्रचारामध्ये रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्याची भाषा करत आहेत. गरिबांना घरे बांधून देण्याची, मोफत शिधा उपलब्ध करून देण्याची आश्वासने देत आहेत. लोकसंख्येवर नियंत्रण आले की, यांतील बहुतांश समस्या आपसूकच सुटणार आहेत हे राजकीय पक्षांना केव्हा कळणार? आज लोकसंख्येवर नियंत्रण आणले नाही तर भविष्यात शहरी भागांत जगणेही अवघड होईल हे निश्चित!

# भाविकांचे श्रद्धास्थान श्रीक्षेत्र काळभैरवनाथ

**भक्तांच्या हाकेला धावणाऱ्या आणि नवसाला पावणाऱ्या मांगूरच्या श्री काळभैरवनाथ देवाचा लौकिक सर्वदूर पसरला आहे. कर्नाटक - महाराष्ट्रातील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान व ग्रामस्थांचे ग्रामदैवत असलेल्या श्रीक्षेत्र काळभैरवनाथ यात्रा महोत्सव शनिवार दि. २७ एप्रिल २०२४ ते मंगळवार दि. ३० अखेर संपन्न होत असून, यात्रेचा मुख्य दिवस रविवार आहे. त्यानिमित्ताने या महोत्सवानिमित्त थोडक्यात...**

मांगूर गावचे ग्रामदैवत असलेले काळभैरवनाथ देवस्थान असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या ठिकाणच्या मंदिरात भैरवनाथांच्या दर्शनासाठी भाविकांची नेहमीच मोठी गर्दी असते. भक्तांच्या हाकेला धावणारे आणि त्यांच्या मनोकामना पूर्ण करणारे देवस्थान म्हणून या मंदिराकडे पाहिले जाते. जन्मकाळ सोहळा, यात्रा व सणासुदीच्या काळात या ठिकाणी महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षणीय आहे. महाराष्ट्र - कर्नाटक सीमेवर निपाणी तालुक्यातील दूधगंगा नदीवर वसलेलं आणि श्री भैरवनाथांच्या पदस्पर्शाने पावन झालेले मांगूर हे गाव, येथील ग्रामस्थांची या दैवतावर मोठी श्रद्धा आहे. या दैवतावर श्रद्धा ठेवून कोणतेही काम केल्यास ते पूर्णत्वास जाते असा भाविकांचा अनुभव आहे. येथील मंदिरामध्ये काळभैरव आणि बाळभैरव अशा दोन मूर्ती एकत्र आहेत. काळभैरवाची मूर्ती चतुर्भुज व बाळभैरवाची मूर्ती त्रिभुज आहे.



काळभैरवाच्या उजव्या वरच्या हातात डमरू व खालच्या हातात तलवार आहे तर डाव्या हातात वर त्रिशूळ व खालच्या हातात पानपात्र आहे. बाळभैरव मूर्ती त्रिभूज असून, त्याच्या हाती ढाल व तलवार आहे. जवळच एक जागृत वेताळ मंदिर

**दृष्टिक्षेप**
**राजू जाधव**

असून, मंदिरासमोर भव्य असे पटांगण आहे. या ग्रामदेवतेविषयी वयोवृद्ध जाणकारांकडून लोककथा सांगितली जाते. ती अशी दूधगंगा - वेदगंगा नदीच्या संगमावरील हा परिसर शांत व रम्य असा आहे. या परिसराच्या वैभवावर एका क्रूर राक्षसाची नजर पडली हा राक्षस परिसरातील जनतेला त्रास देऊ लागला. त्यामुळे जनतेने भगवंताची पूजाअर्चा करून प्रार्थना केली या प्रार्थनेच्या आधारेच जनतेने भैरवनाथाला प्रसन्न करून घेतले. भैरवनाथाने दुष्ट राक्षसाचा वध करून जनतेची त्यांच्या त्रासातून सुटका केली. जनतेच्या रक्षणासाठीच भैरवनाथाचे मांगूर येथे वास्तव असल्याचे बोलले जाते. प्रतिवर्षी गुढीपाडवा झाल्यानंतर येणाऱ्या तिसऱ्या रविवारी व जोतिबाची यात्रा झाल्यानंतर येणाऱ्या रविवारी ही यात्रा भरते. रविवारी यात्रेचा मुख्य दिवस असतो. या दिवशी श्रींची प्राणप्रतिष्ठापना, अभिषेक व श्रींची पालखी मिरवणूक सासणकाठ्यासह निघते. भाविक गुलालाची उधळण करीत भैरोबाच्या नावानं चांगभलंच्या गजरात हा परिसर दुमदुमून सोडतात. गुढीपाडव्या दिवशी कुराडे व इंग्रोळे यांच्या दोन सासणकाठ्यांचे पूजन करून भैरवनाथ मंदिरासमोर या सासणकाठ्या बांधून पाडव्यापासून यात्रेपर्यंत प्रत्येक रविवारी रात्री सासणकाठ्यांची भैरवनाथ मंदिराच्या मिरवणुकीने फेरी काढली जाते. यात्रेदिवशी नंदगाव (ता. करवीर) येथील पांडुरंग मगदूम यांची सासणकाठी येते. या तिन्ही सासणकाठ्या मानाच्या आहेत. विशेष म्हणजे बेळगांव जिल्ह्यातील एकमेव श्रींची पालखी व सासणकाठ्यांची मिरवणूक सोहळा असतो आणि तो पाहण्यासाठी भाविकांची मांदियाळी असते. यात्रेदरम्यान आतशबाजी ऑर्केस्ट्रा, तमाशा, कुस्तीसारख्या कार्यक्रमांची रेलचेल असते. मंदिरासमोर भव्य मंडप उभारणी करून मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येते. यात्रेमुळे परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघतो. मांगूर चंदेरीनगरीत सर्व जातीधर्मांचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. कोणतेही सामुदायिक कार्य अथवा सण, उत्सव सर्वजण भक्तीभावाने पार पडतात. या मागे ग्रामस्थांमध्ये काळभैरवनाथांबद्दल असणारी श्रद्धा दिसून येते. अशा या श्री काळभैरवनाथ यात्रा महोत्सवास येणाऱ्या सर्व भाविकांचे सहर्ष स्वागत व खूप साऱ्या शुभेच्छा !!

# आधुनिक भारतीय वास्तववादी चित्रकलेचा निर्माता : राजा रविवर्मा

आजच्याच दिवशी १८४८ साली राजा रविवर्मा या प्रसिद्ध चित्रकाराचा जन्म केरळमधील कोईल तंपुरन किळीमनूर राजवाड्यात झाला. त्यांचे वडील संस्कृत व आयुर्वेदाचे विद्वान होते अन् आई एक प्रसिद्ध कवयित्री होती. आईने लिहिलेला पार्वती स्वयंवर हा काव्यसंग्रह त्यांच्या आईच्या मृत्यूनंतर राजा रविवर्मा यांनी प्रसिद्ध केला होता. त्यांच्या घरात साहित्य व संस्कृतीचे वातावरण होते. त्यांचे काका चित्रकार होते. त्याचा प्रभाव त्यांच्या चित्रावर होता. तिरुअनंतपुरम येथील राजदरबारी असणारे इंग्रज गृहस्थ ओडर जेन्सन व रामस्वामी नायडू यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. राजा रविवर्मा त्रावणकोर येथील राजघराण्याचे चित्रकार होते. त्यांनी भारतभर प्रवास केला होता. भारतीय संस्कृती व कला यांचा अभ्यास त्यांनी केला होता. आपले देवदेवता कशा आहेत याचे वास्तव लोकांना राजा रविवर्मा यांच्या चित्रावरून कळले. आजही त्यांची हिंदू महाकाव्ये व पुराणे यातील चित्रे प्रमाण मानली जातात. त्रावणकोर येथील दिवाणांच्या सल्ल्यानुसार त्यांनी मुंबईतील घाटकोपर येथे लिथोग्राफिक प्रिंटिंग प्रेस १८९४ साली काढली. ही प्रेस त्या काळी देशात सर्वांत मोठी प्रेस होती. नंतर ती मळवली येथे लोणावळ्याजवळ नेली. दुर्दैवाने ते प्रेस आगीत नष्ट झाले. राजा रविवर्मा यांचे महाराष्ट्राशी विशेष नाते होते. महाराष्ट्रातील स्त्री त्यांनी त्यांच्या अनेक चित्रांत चित्रित केली आहे. १८७३ मध्ये त्यांना चित्रकला स्पर्धेत सुवर्णपदक मिळाले होते. त्याच वर्षी व्हीएनन्ना येथे भरलेल्या जागतिक चित्रप्रदर्शनात त्यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. यामुळे जागतिक पातळीवर त्याचे लक्ष वेधले गेले. त्यांनी काढलेली दुष्यंत व शकुंतला, नळ व दमयंती, विश्वमित्र व मेनका ही चित्रे विशेष गाजली आहेत. भारतीय संस्कृती व कला यांचा त्यांचा अभ्यास गाढा होता. युरोपियन चित्रकाराप्रमाणे कमिशन पोर्टेट काढणारे ते पहिले भारतीय कलाकार होते. राजा रविवर्मा यांना आधुनिक भारतीय वास्तववादी चित्रकार असे म्हटले जाते. राजा रविवर्मा यांना अनेक मानसन्मान आयुष्यात मिळाले. जागतिक पातळीवर भरलेल्या शिकागो येथील प्रदर्शनात त्यांना पुरस्कार मिळाला होता. सातव्या एडवर्डच्या हस्ते त्यांना कैसर ए हिंद ही पदवी मिळाली होती. राजा रविवर्मा यांची प्रसिद्धी त्या काळी





एवढी होती की, त्यांची अनेक चित्रे देशातील राजवाड्यात दिमाखाने वावरत असत. चित्रकलेच्या या महान कलाकाराला मात्र दीर्घायुष्य लाभले नाही. वयाच्या केवळ ५८ व्या वर्षी त्यांचे निधन २ ऑक्टोबर १९०६ रोजी झाले. त्यांच्या स्मरणार्थ भारत सरकारतर्फे १९९३ सालापासून राजा वर्मा पुरस्काराचे दरवर्षी आयोजन केले जाते. चित्रकला क्षेत्रातील नामवंत कलाकारांना या पुरस्काराने गौरविले जाते. आजही त्यांची अनेक चित्रे विविध कलादालनात पाहून कलाप्रेमी भावविश्वात रंगून जातात. भारतात चित्रकलेचे युग बालक व युवावर्गात निर्माण होवो हीच राजा रविवर्मा यांच्या जन्मदिनी इच्छा व आशा.

## जनमनाचे प्रतिध्वनी

### स्कॉटलंडमध्ये डॉक्टरांची कमतरता

स्कॉटलंडमधील पश्चिम किनारपट्टीला असलेल्या बेंबकुला या भागात डॉक्टरांची खूपच कमतरता आहे. सरकारने या भागात राहून काम करण्यासाठी भारतीय रुपयात दीड कोटी रुपये पगार दरमहा देऊ केला आहे. या पगाराचा विचार केल्यास युके किंवा युरोपमध्ये जेवढा पगार डॉक्टरांना मिळतो त्याच्या ४० टक्के जास्त आहे. या पगार व्यतिरिक्त जे ताबडतोब हजर होतील त्यांना ताबडतोब दहा हजार पौड देण्याचे कबूल केले आहे. इतकेच नाही तर राहण्याची सोयही सरकारने केली आहे. इतक्या सोयी व सवलती देऊनही या भागात येण्यास डॉक्टर्स तयार नाहीत ही बातमी नुकतीच वाचली. या भागात डॉक्टर्स न येण्याचे कारण म्हणजे या भागात शहरी सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. लोकांना गावात राहिल्यासारखे वाटते. आज भारतातसुद्धा हीच परिस्थिती आहे. खेड्यात नोकरीसाठी राहण्यास बहुतेक तयार नाहीत. प्रत्येकाला शहरी आकर्षण आहे. वास्तविक निसर्ग व हवा या दृष्टीने पाहिल्यास खेड्यातील जीवन शहरातील जीवनापेक्षा आरोग्यदायी आहे. तरीपण शहराचे आकर्षण काही कमी होत नाही. भारतीय प्रदेशातसुद्धा हाच ट्रेंड दिसतो आहे. आजही नोकरी, शिक्षण यासाठी अनेकजण खेडे सोडून शहरात येत आहेत. हाच ट्रेंड कायम राहिल्यास लोकांचा ओघ भविष्यात शहराकडे राहील.

### जर्मनीत सात लाख रिक्त पदे

सध्या जर्मनीची ओळख जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था तसेच युरोप खंडातील मोठी अर्थव्यवस्था म्हणून प्रसिद्ध आहे. सध्या तिथे ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढत आहे आणि दुसऱ्या बाजूला तरुणांची संख्या कमी होत आहे. यामुळे गेली काही दिवस येथे तब्बल सात लाख कर्मचारी रिक्त आहेत. आणखी एक वर्षाने सुमारे ७० लाख प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची गरज देशाला भासणार आहे. डायसे वेले अहवालानुसार तेथे यामुळे आर्थिक प्रगतीवर प्रतिकूल परिणाम होत आहे. याचा फायदा भारताने उठविला पाहिजे. तेथे अनेक सुशिक्षित तरुणांना नोकऱ्या मिळू शकतात. सध्या एका आकडेवारीनुसार जर्मनीत विविध विद्यापीठांत सुमारे ४३ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. एकूण विद्यार्थ्यांमध्ये हे प्रमाण सुमारे १४ टक्के आहे. आयटी व इंजिनिअरिंग क्षेत्रात मोठा वाव असल्याचे कळते. जर्मनीत सध्या जन्मदर १.४ एवढा कमी आहे. एकूणच जर्मनीला नोकऱ्यांची आवश्यकता आहे. याउलट परिस्थिती भारताची आहे. येथे हजारो तरुण नोकरीच्या शोधात आहेत. त्यामुळे त्यांना देशात नोकऱ्या व उद्योग कसे देता येतील हे सरकारने पाहावयास हवे. देशातील सुशिक्षित व तरुण मनुष्यबल नोकरी किंवा उद्योगात सामावून घेतल्यास देशातील बेरोजगारीचे संकट कमी होईल. **- शांताराम वाघ, पुणे**

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह)
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

# देशात अन्नधान्य महागाईचा भडका : आरबीआयने दिले स्पष्टीकरण

**नवी दिल्ली :**

देशात अन्नधान्य महागाई मोठ्या प्रमाणात वाढली आहे. याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. देशात अन्नधान्य महागाईचा दर हा ५ टक्के आहे. अन्नधान्य चलनवाढीचा दर हा ८ टक्क्यांच्या वर आहे. दरम्यान, ही वाढती महागाई कमी कधी होणार? याबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने स्पष्टीकरणं दिलं आहे. महागाईच्या संदर्भात आरबीआयने नेमकं काय म्हटलंय? त्या संदर्भातील माहिती पाहुयात.

सध्या भारतात अन्नधान्य महागाई दर वाढत आहे. भविष्यात ही समस्या कमी होणार असल्याची माहिती आरबीआयने दिली आहे. कारण देशामध्ये पुरवठा साखळी विकसीत होईल. अन्न पुरवठ्याचे वेगवेगळे स्रोत उपलब्ध होतील. त्यामुळं अन्नपदार्थांच्या किमतीत झालेली वाढ कमी होईल. देशातील सामान्य लोकांच्या बऱ्यापैकी पैसा हा अन्नपदार्थावर म्हणजे खाण्यावर खर्च होतो. अन्नपदार्थाच्या किमती कमी होण्यासाठी उत्पादकता वाढवण्याची गरज आहे. उत्पादकता वाढल्यामुळं महागाईचा दर आपोआप कमी होणार आहे.

आरबीआयच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, भारत जसाजसा विकसित होईल तसतशा समस्या कमी होतील. महागाईचा दर कमी होण्यास मदत होईल असं आरबीआयच्या अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. दरम्यान, देशात नैसर्गिकरित्या वैविध्यपूर्ण भौगोलिक वातावरण आहे. जगातील अनेक भागांपेक्षा चांगले हवामान



आहे. यामुळं आपण कृषी क्षेत्रातील उत्पादकता वाढवून महागाई कमी करु शकतो, अशी माहिती आरबीआयच्या अधिकाऱ्यांनी दिलीय. दरम्यान, मार्च २०२४ मध्ये किरकोळ महागाईचा दर हा ४.८५ टक्क्यांच्या निच्चांकी पातळीवर पोहोचला होता. मात्र, एप्रिल महिन्यात महागाई दरात वाढ झाली आहे.

हवामानातील बदल आणि जागतिक तणावामुळं महागाईत वाढ होत आहे. तसेच दुसऱ्या बाजूला इराण इस्त्राईल यांच्यातील युद्धाचा तणाव आहे. त्यामुळं महागाई वाढत आहे. चालू तिमाहीत म्हणजे जानेवारी ते मार्च महिन्यात किरकोळ महागाईत घट झाली होती. मात्र, एप्रिल महिन्यात काही प्रमाणात महागाई वाढल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, या अन्नधान्याच्या महागाईबरोबरच कच्च्या तेलाच्या किमतीतही वाढ होऊ शकते. या महागाईचा मोठा फटका नागरिकांना बसू शकतो. दरम्यान, येणाऱ्या काळात महागाईचा दर कमी होण्याची शक्यता आरबीआयच्या अधिकाऱ्यांनी वर्तवली आहे. उत्पादकता वाढवली की, महागाई दर होईल असं अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे.

## भारत वेब३ असोसिएशनकडून पीईसी फ्रेमवर्कची घोषणा

**नवी दिल्ली :**

व्हर्च्युअल डिजिटल ॲसेट (व्हीडीए) इकोसिस्टम अधिक शक्तिशाली करण्याच्या दिशेने वाटचाल करत भारतातील प्रमुख वेब३ व क्रिप्टो मालमत्ता उद्योग संस्था भारत वेब३ असोसिएशन (बीडब्ल्यूए) ने सदस्य व्हीडीए व्यासपीठांवर टोकन्स सूचीबद्ध करण्यासाठी मार्गदर्शकतत्त्वे जारी केली आहेत. बीडब्ल्यूए सदस्य व्हीडीए व्यासपीठांदरम्यान सविस्तर चर्चा आणि सहयोगानंतर ही मार्गदर्शकतत्त्वे जारी करण्यात आली आहेत. यामुळे टोकन लिस्टिंग प्रक्रियांमध्ये सातत्यता व अखंडता राखण्याच्या खात्रीसाठी प्रमाणीकृत व पारदर्शक प्रक्रिया स्थापित करण्यास मदत होईल.

ही मार्गदर्शकतत्त्वे टोकन्स सुचीबद्ध करण्याकरिता प्रबळ प्रक्रियांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर भर देतात, जे इन्व्हेस्टर प्रोटेक्शन, मार्केट एफिशिएन्सी आणि क्रेडिबिलिटी अँड सेफगार्ड्ससाठी पीईसी-फ्रेमवर्कचा वापर करत सुरक्षित, सुस्पष्ट व विकसित होत असलेल्या वेब३ स्थितीकरिता आधार म्हणून काम करतात. पारदर्शकता व सातत्यपूर्ण मूल्यांकन निकषांचे पालन करणाऱ्या व्हीडीए प्लॅटफॉर्म्सचा शोध घेत असलेले प्रतिष्ठित प्रकल्प व गुंतवणूकदारांचे लक्ष वेधून बाजारपेठेतील आत्मविश्वास वाढवण्याचा या मार्गदर्शकतत्त्वांचा मनसुबा आहे.

ही मार्गदर्शकतत्त्वे विशेषतः व्हर्च्युअल डिजिटल ॲस्सेट्सना (व्हीडीए) सादर करतात, जे विद्यमान ब्लॉकचेनवर टोकन केलेल्या मालमत्तांचा किंवा ब्लॉकचेन किंवा इतर डिस्ट्रिब्युटेड लेजर टेक्नॉलॉजी (डीएलटी) नेटवर्क्सवर निर्माण केलेल्या मूल्याच्या युनिट्सचा संदर्भ देतात. एअरड्रॉप्स, एनएफटी, आयसीओ/आईओ/आयडीओ इत्यादीमध्ये समाविष्ट टोकन्स, तसेच जोखीमांशी संबंधित मानकांचे सादरीकरण या मार्गदर्शकतत्त्वांमध्ये समाविष्ट नाहीत.

बीडब्ल्यूएने सदस्य कंपन्यांसाठी डिसेंबर २०२३ मध्ये कंझ्युमर प्रोटेक्शन गाइडलाइन्स देखील जारी केल्या. या उपक्रमाचा पारदर्शकता व जबाबदारी वाढवण्याचा आणि विकसित होत असलेल्या वेब३ इकोसिस्टमप्रती ग्राहकांमध्ये विश्वास निर्माण करण्याचा मनसुबा आहे.

हे दोन महत्त्वपूर्ण गाइडलाइन्स आणि प्रगतीपथावर असलेल्या विकासासह बीडब्ल्यूएचा स्वयं-नियमनाला चालना देण्याचा उद्देश आहे, जेथे बाजारपेठेतील आत्मविश्वास वाढवण्यासोबत ग्राहकांचे संरक्षण करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. भारत वेब३ असोसिएशन सर्वोत्तमता व नाविन्य तेप्रती कटिबद्ध आहे, तसेच भारतातील वेब३ इकोसिस्टमसाठी जबाबदार विकास व शाश्वततेसाठी विश्वसनीय वातावरण निर्माण करत आहे.

**भारत वेब३ असोसिएशनबाबत**

भारत वेब३ असोसिएशन उद्योग संस्था आहे, जी भारतातील वेब३ इकोसिस्टममधील आघाडीच्या सदस्यांना एकत्र आणते. बीडब्ल्यूए जागरूकता वाढवण्याप्रती, संशोधन करण्याप्रती, उद्योग मानक स्थापित करण्याप्रती, भारतातील टॅलेंटला निपुण करण्याप्रती, ग्राहक हितांचे संरक्षण करण्याप्रती कटिबद्ध आहे, तसेच भारतात संपन्न वेब३ इकोसिस्टम निर्माण करण्याच्या उद्देशासह भागधारकांना आवाज उठवण्यास प्रेरित करत आहे. आपल्या मिशनचा भाग म्हणून बीडब्ल्यूए विचारशील नेतृत्वाच्या माध्यमातून जागरूकतेचा प्रसार करण्याचा, महत्त्वपूर्ण भागधरकांसोबत सहयोग करण्याचा आणि उद्योगाचा चेहरा म्हणून आपल्या ध्येयांचा प्रसार करण्याचा प्रयत्न करते.

## गुजरातचा २ हजार मेट्रिक टन पांढरा कांदा होणार निर्यात; केंद्र सरकारचा निर्णय

**नवी दिल्ली :**

कांद्यावरील निर्यातबंदी असल्याने शेतकरी वर्गात केंद्र सरकारविरुद्धात नाराजी आहे. त्यात वाणिज्य मंत्रालयाने गुजरातमधील २ हजार पांढरा कांदा निर्यात करण्यास परवानगी दिली. सरकारच्या या निर्णयामुळे महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

मात्र, त्याला अद्याप परवानगी न देता सरकारने फक्त गुजरातच्या पांढऱ्या कांद्याबाबत निर्णय घेतला. वाणिज्य मंत्रालयाने परिपत्रक काढून याबाबतची माहिती दिलीय. दरम्यान, केंद्र सरकारने ८ डिसेंबरपासून निर्यात बंदी लागू केलीय. ही निर्यात बंदी हटवण्यात यावी अशी मागणी शेतकरी अनेक दिवसांपासून करत आहेत. मात्र त्याला अद्याप परवानगी न देता सरकारने फक्त गुजरातच्या पांढऱ्या कांद्याबाबत निर्णय घेतला. या कांद्याची निर्यात मुंद्रा पोर्ट, पिपापाव पोर्ट आणि नाव्हाशेव्हा म्हणजे जेएनपीटी पोर्टवरून केली जाणार असल्याची माहिती वाणिज्य मंत्रालयाने परिपत्रकातून दिलीय.

राज्यातील कांद्याचा प्रश्न बिकट होत असताना शेतकरी सातत्याने निर्यात खुली करण्याची मागणी केली जातेय. पण त्यावर सरकारने अद्याप कोणताच निर्णय घेतला नाहीये. त्यादरम्यान गुजरातच्या पांढऱ्या कांद्याची २००० मेट्रिक टन निर्यातीसाठी परवानगी देण्यात आलीय. सरकारच्या या निर्णयामुळे शेतकरी आक्रमक होण्याची शक्यता.

केंद्र सरकारने कांद्याची निर्यातबंदी लागू केल्याने राज्यात कांद्याचे दर घसरलेत. कांद्याचे दर घसरल्याने बळीराजाला कमी दरात कांद्याची विक्री करावी लागतेय. शेतकऱ्यांना मोठा तोटा सहन करावा लागत आहे. यामुळे शेतकरी, शेतकरी संघटना आदींच्या माध्यमातून कांदा निर्यात खुली करण्यासाठी आंदोलने करण्यात आली आहेत. मात्र, अद्यापही यावर तोडगा निघू शकलेला नाहिये. त्याचदरम्यान केंद्र सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाने गुजरातच्या पांढऱ्या कांद्याच्या निर्यातीसाठी परवानगी दिल्याने राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी नाराजी झाले.

केंद्र सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाने याबाबतचे परिपत्रक काढले असून यानुसार २ हजार मेट्रिक टन पांढरा कांदा निर्यात केला जाणार आहे. गुजरात राज्यातील मुंद्रा पोर्ट, पिपापाव पोर्ट आणि नाव्हाशेव्हा/जेएनपीटी पोर्टवरून निर्यात केली जाणार आहे. विशेष म्हणजे एनसीएल च्या माध्यमातून निर्यात न करता थेट निर्यातदारांच्या माध्यमातून हि निर्यात केली जाणार आहे. यावर महाराष्ट्र शेतकरी संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांनी या निर्णयावर प्रतिक्रिया दिलीय. एकीकडे लाल आणि उन्हाळ कांदा कवडीमोल भावात विकला जात आहे, गेल्या अनेक दिवसांपासूनची असलेली निर्यात खुली करण्याच्या मागणीवर शासन अद्यापही उदासीन आहे.

## एपिलेप्सीबाबत जागरूकता आवश्यक

**जळगाव :**

नुकतेच झालेल्या जागतिक आरोग्य दिनानिमित्त जळगाव येथील मेंदु विकारतज्ज्ञ डॉ. नीलेश किनगे यांनी एपिलेप्सीबद्दल माहिती दिली. एपिलेप्सी म्हणजे काय तर ही अशी स्थिती आहे ज्यामुळे लोकांना वारंवार फिट्स येतात(झटके/दौरे). मेंदूतील असामान्य विद्युत क्रियांमुळे झटके येतात. फिट्समुळे व्यक्तीला आकुंचन होऊ शकते, किंवा हालचाल होऊ शकते किंवा व्यक्ती विचित्रपणे वागू शकतो. एपिलेप्सी कोणत्याही वयात सुरू होऊ शकते.यासंबंधीची अधिक माहिती देताना डॉ. नीलेश किनगे म्हणाले की, एपिलेप्सीची लक्षणे काय आहेत.तर विविध प्रकारचे फिट्स आहेत.प्रत्येक लक्षणांचा एक वेगळा संच कारणीभूत ठरतो. बहुतेक फिट्स फक्त काही सेकंद किंवा मिनिटे टिकतात. ज्या लोकांना टॉनिक-क्लोनिक किंवा ग्रँड माल झटके येतात ते अचानक आकुंचन होतात, कडक होतात आणि नंतर धक्कादायक हालचाल करतात. इतर प्रकारचे दौरे कमी नाट्यमय लक्षणे निर्माण करतात. उदाहरणार्थ, काही लोकांच्या फक्त १ हाताने किंवा चेहऱ्याच्या एका भागात थरथरणाऱ्या हालचाली असतात. इतर लोक अचानक प्रतिसाद देणे थांबवतात आणि काही सेकंद टक लावून पाहतात. कधी कधी लोक सांगू शकतात की, त्यांना फिट्स येणार आहेत. त्यांना विशिष्ट भावना असते किंवा विशिष्ट वास येतो. या भावना किंवा वासाला आभा म्हणतात. एपिलेप्सीच्या चाचणी करीता ईईजी आणि सीटी किंवा एमआरआय स्कॅनचा वापर केला जातो. कधी कधी एक तर कधी दोन्ही प्रकारे चाचण्या केल्या जातात एक ईईजी मेंदूतील विद्युत



क्रियाकलाप मोजतो आणि सीटी किंवा एमआरआय स्कॅन या चाचण्या मेंदूची चित्रे तयार करतात.

एपिलेप्सीचा उपचार विरोधी औषधांनी केला जातो. त्यांना अँटी-एपिलेप्टिक किंवा अँटी-कन्व्हलसंट औषधे देखील म्हणतात. ही औषधे एपिलेप्सी बरा करू शकत नाहीत, परंतु ते फिट्स टाळण्यास मदत करू शकतात. एपिलेप्सी विरोधी वेगवेगळी औषधे आहेत. तुमच्यासाठी योग्य तुमचा फिट्स आणि इतर घटकांवर अवलंबून आहे.

कोणत्याही प्रकारचे फिट्स असलेल्या व्यक्तीला मदत करण्यासाठी या सामान्य प्रक्रिया आहेत त्या म्हणजे व्यक्तीला जमिनीवर हलवा, त्या व्यक्तीला हळूवारपणे एका बाजूला वळवा, हे व्यक्तीला श्वास घेण्यास मदत करेल. कठोर किंवा तीक्ष्ण कोणत्याही व्यक्तीच्या सभोवतालचे क्षेत्र साफ करा, यामुळे दुखापत टाळता येते, त्याच्या डोक्याखाली दुमडलेल्या जाकीटसारखे काहीतरी मऊ आणि सपाट ठेवा,चष्मा काढा,गळ्यात स्कार्फ किंवा काहीही सैल करा ज्यामुळे श्वास घेणे सोपे होईल. फिट्स असलेल्या व्यक्तीबाबत पुढील गोष्टी करू नये. व्यक्तीला दाबून ठेवू नका किंवा त्याच्या हालचाली थांबवण्याचा प्रयत्न करू नका, व्यक्तीच्या तोंडात काहीही घालू नका, यामुळे दात किंवा जबड्याला इजा होऊ शकते, तोंडाने श्वास देण्याचा प्रयत्न करू नका (सीपीआर सारखे), फिट्स आल्यानंतर लोक सहसा स्वतःहून पुन्हा श्वास घेऊ लागतात. जोपर्यंत व्यक्ती पूर्णपणे सावध होत नाही तोपर्यंत त्याला पाणी किंवा अन्न देऊ नका. फिट्स संपेपर्यंत आणि तो किंवा ती पूर्णपणे जागृत होईपर्यंत व्यक्तीसोबत रहा. ते संपल्यानंतर, व्यक्तीला सुरक्षित ठिकाणी बसण्यास मदत करा. एकदा ते सावध झाले आणि संवाद साधण्यास सक्षम झाले की, काय घडले ते त्यांना अगदी सोप्या भाषेत सांगा.व्यक्तीला सांत्वन द्या आणि शांतपणे बोला. त्या व्यक्तीने वैद्यकीय ब्रेसलेट किंवा इतर आपत्कालीन माहिती घातली आहे का ते तपासा. स्वतःला आणि इतर लोकांना शांत ठेवा.

## व्होडा-आयडियाच्या उलाढालीचा विक्रम १,००० कोटी समभागांचे व्यवहार

**नवी दिल्ली :**

खासगी क्षेत्रातील दूरसंचार कंपनी असलेल्या व्होडाफोन आयडियाच्या १,००० कोटींहून अधिक समभागांचे गुरुवारी व्यवहार पार पडले. एकाच कंपनीच्या समभागात मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री उलाढाल होण्याचा हा नवीन विक्रम आहे.

सार्वजनिक समभाग विक्रीपश्चात (एफपीओ) व्होडा-आयडियाच्या समभागात गुरुवारच्या सत्रात खूप मोठे चढ-उतार दिसून आले. मुंबई शेअर बाजार आणि राष्ट्रीय शेअर बाजारात एकत्रित मिळून १,०५५ कोटी समभागांची खरेदी-विक्री पार पडली. या आधी २३ एप्रिलला व्होडा-आयडियाच्याच समभागांमध्ये उलाढालीच्या ३०८ कोटी समभाग संख्येचा विक्रम यातून मोडीत निघाला आहे. समभागाने सत्रात ११.९० रुपयांची नीचांकी तर १४.४० रुपयांची उच्चांकी पातळी गाठली.

मोठ्या संस्थात्मक गुंतवणूकदारांच्या पाठबळामुळे कंपनीने एफपीओच्या माध्यमातून १८,००० कोटी रुपयांची यशस्वीरीत्या निधी उभारणी केल्यामुळे समभागात नवीन स्वारस्य निर्माण झाले आहे. कंपनीने ७४ सुकाणू गुंतवणूकदारांकडून (अँकर इन्व्हेस्टर) ५,४०० कोटी रुपयांची उभारणी केली. व्होडा-आयडियाने ११ रुपये प्रति शेअर या दराने सुकाणू गुंतवणूकदारांना ४९१ कोटी शेअरचे वाटप केले.

## लग्नाच्या दागिन्यांची खरेदी म्हणजे चंदुकाका सराफ!

**नाशिक : प्रतिनिधी**

**१८२७ पासून बारामतीची सुवर्णपेढी म्हणून ओळखले जाणारे चंदुकाका सराफ! तेव्हापासून आजपर्यंत जसा काळ बदलला, तशा पद्धती बदलल्या, डिझाइन्स बदलत गेल्या आणि ट्रेंडही बदलले. या बदलत्या काळाला अनुसरून वाटचाल करणाऱ्या चंदुकाका सराफ या सुवर्णपेढीला संपूर्ण महाराष्ट्रात आजही दागिने खरेदीसाठी प्रथम प्राधान्य दिलं जातं.**

चंदुकाका सराफ™ SINCE 1827 बारामतीची सुवर्णपेढी™

याच चंदुकाका सराफ यांनी आता आजच्या काळानुरूप विवाह दागिन्यांची नवीन श्रेणी आता सादर केली आहे. यामध्ये नववधूच्या खास अलंकारांसह वऱ्हाडी मंडळींसाठी देखील कलात्मक दागिने घडविण्यात आले आहेत. या विवाह दागिन्यांमध्ये पारंपरिकता व आधुनिकता यांचा सुरेख संगम साधण्यात आलेला आहे. हराम नेकलेस, चोकर, कलर स्टोन प्लस डायमंड नेकलेस, पार्टीवेअर कॉकटेल रिंग्ज अशा अनेक नावीन्यपूर्ण दागिन्यांचा समावेश या नवीन श्रेणीमध्ये तुम्हाला पाहावयास मिळणार आहे.

परंपरा, शुद्धता, विश्वास, पारदर्शकता, नावीन्य ही मूल्ये आत्मसात करणाऱ्या चंदुकाका सराफ यांनी महाराष्ट्रात ग्राहकांशी विश्वासाचे नाते जोडले आहे. जुन्या पिढीपासून नव्या पिढीपर्यंत सर्वांना आवडतील अशी ही विवाह श्रेणी आहे. चंदुकाका सराफ सर्व शोरूममध्ये ही श्रेणी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तेव्हा ज्यांच्या घरात लग्नकार्य ठरले आहे, त्यांनी आपल्या जवळच्या शोरूमला आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन चंदुकाका सराफ यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

## टोयोटो कॉम्प्रेहेन्सिव्ह कार डिटेलिंग सोल्यूशन टीग्लॉसचे अनावरण

**नाशिक : प्रतिनिधी**

आपल्या 'ग्राहक-प्रथम' संस्कृतीच्या अनुषंगाने, टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रायव्हेट लिमिटेड (टीकेएम)ने आज आपला रिव्होल्यूशनरी कार केअर ब्रँड, टीग्लॉस लॉन्च करण्याची घोषणा केली, ज्याने कार डिटेलिंगच्या जगात ब्रँडचा प्रवेश केला आहे. भारतातील ग्राहकांमधील उच्च दर्जाच्या आणि विश्वासार्ह कार डिटेलिंग सेवांच्या वेगाने वाढणाऱ्या मागणीला प्रतिसाद देत, टीकेएम टोयोटा वाहनांसाठी विशेषतः तयार केलेल्या सर्वसमावेशक सोल्यूशन्ससह कार केअर इंडस्ट्रीला पुन्हा परिभाषित करण्यासाठी सज्ज आहे. टीग्लॉस कार केअर सेवा भारतातील प्रत्येक अधिकृत टोयोटा डीलरशिपवर १ मे २०२४ पासून दिले जातील. हे ग्राहकांना मालकीचा आनंददायी अनुभव सुनिश्चित करून, व्यावसायिक पद्धतीने दर्जेदार कार केअर सोल्यूशन्समध्ये सोयीस्कर प्रवेश देते. टीग्लॉस ब्रँड अंतर्गत, कार निर्माता उद्योगात प्रथमच, टीकेएम वाहनाचे आतील आणि बाहेरील सौंदर्य वाढवण्यासाठी सेवांची विस्तृत




श्रेणी ऑफर करेल. यामध्ये सिरॅमिक कोटिंग, अंडरबॉडी कोटिंग, सायलेन्सर कोटिंग आणि इंटीरियर पॅनेल प्रोटेक्शन समाविष्ट आहे. या कार केअरचा उद्देश केवळ वाहनांचे सौंदर्यात्मक आकर्षण वाढवणे नाही तर पर्यावरणीय घटकांपासून काही प्रमाणात संरक्षण करणे देखील आहे.

ग्राहक आतील सुधारणा आणि बाह्य सुशोभीकरण सेवा यांसारख्या सर्वसमावेशक सेवांचा देखील लाभ घेऊ शकतात. या सेवा कार ला नवीन जीवन देतात. कारचे सौंदर्यात्मक आकर्षण वाढवतात आणि ती कार नवीन असल्यासारखीच दिसते याची खात्री करतात. याव्यतिरिक्त, प्रवाशांच्या हितासाठी, टीग्लॉस सेवा एसी डक्ट क्लीनिंग आणि बाष्पीभवक साफसफाईसह पृष्ठभागाच्या पलीकडे जातात, एक उत्साहपूर्ण वातावरणास निर्माण करतात, आरोग्यदायी ड्रायव्हिंग वातावरणास प्रोत्साहन देतात. टोयोटा वाहनांच्या मालकांना अभिमान आणि समाधानाची नवीन भावना देऊन, वाहनांच्या अंतर्गत आणि बाह्य भागांना नवसंजीवनी देण्यासाठी सर्व सेवा काळजीपूर्वक तयार केल्या आहेत. टोयोटा किर्लोस्कर मोटरचे वाईस प्रेसिडेंट सबरी मनोहरया उपक्रमावर बोलताना म्हणाले, टोयोटा किर्लोस्कर मोटरची 'ग्राहक-प्रथम' तत्त्वज्ञानाशी अतूट बांधिलकी अधोरेखित करणारा एक नावीन्यपूर्ण आणि उद्योगातील पहिला उपक्रम टीग्लॉसचे अनावरण करताना आम्हाला आनंद होत आहे. उच्च-गुणवत्तेच्या सामग्रीचा केवळ वापरच नव्हे तर वाहनाच्या सौंदर्याचे दीर्घायुष्य सुनिश्चित करण्यासाठी, बाह्य आणि आतील भागांसह सेवा अत्यंत व्यावसायिक पद्धतीने दिल्या जातील याची खात्री करण्यासाठी अत्यंत कुशल आणि प्रशिक्षित व्यावसायिकांकडून सेवा घेतल्या जातील. आमच्या सध्याच्या ग्राहकांना मालकीचा आनंददायी अनुभव सुनिश्चित करून, टोयोटा वाहन खरेदी करण्याचे स्वप्न प्रत्यक्षात आणणे हा कार्यक्रम आणि विशेष योजनांचा उद्देश आहे.

# गुंतवणूकदारांसाठी स्ट्रेस टेस्टचा अर्थ काय?

मार्च २०२४ पासून, असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड इन इंडियाने मालमत्ता व्यवस्थापन कंपन्यांना त्यांच्या स्मॉल आणि मिड-कॅप फंड योजनांवर स्ट्रेस टेस्ट घेणे अनिवार्य केले. या टेस्ट उच्च विमोचन दबाव हाताळण्याच्या फंडाच्या क्षमतेचे मूल्यांकन करतात, गुंतवणूकदारांना तरलता जोखमीबद्दल माहिती देतात. गुंतवणूकदारांचा एक महत्त्वपूर्ण भाग त्यांच्या युनिट्सची पूर्तता करतो, एकतर बाजारातील मंदीच्या काळात किंवा जेव्हा गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास कमकुवत होतो अशा परिस्थितीचे अनुकरण करणे आहे हे या टेस्टचे मूलतः उद्दिष्ट आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन ही टेस्ट दोन बाबींवर घेतली जाईल; प्रथम पोर्टफोलिओच्या २५% लिक्विडेट करण्यासाठी लागणाऱ्या वेळेचे मूल्यांकन करण्यासाठी आणि दुसरे, पोर्टफोलिओच्या ५०% लिक्विडेट करण्यासाठी लागणाऱ्या वेळेचे मूल्यांकन करण्यासाठी.

**संख्यांच्या पलीकडे पाहणे : एक समग्र दृष्टिकोन**

लिक्विडेशनसाठी दिवसांची संख्या हा एक मौल्यवान डेटा पॉइंट असला तरी, फंडाच्या तरलतेच्या सर्वसमावेशक आकलनासाठी इतर घटकांचा विचार करणे महत्त्वाचे आहे. काही प्रमुख घटक आहेत जे गुंतवणूकदाराने विचारात घेतले पाहिजेत.

■ रोख आणि बॉटम-हेवी पोर्टफोलिओ : गृहीत धरा की एखाद्या योजनेमध्ये रोख किंवा लार्ज-कॅप स्टॉक्ससाठी तुलनेने जास्त वाटप आहे, जे सामान्यतः अधिक लिक्विड मानले जातात. हे सूचित करते की निधीची पूर्तता हाताळण्याची क्षमता कार्यक्षम आहे, कारण निरोगी रकमेच्या उपलब्धतेमध्ये विमोचनदरम्यान बफर म्हणून काम करण्याची क्षमता असते.

■ जोखीम उपाय : स्टॉकचा बीटा हे अस्थिरतेवेळी त्याच्या प्रतिसादाचे संकेत आहे. साधारणपणे १ पेक्षा कमी बीटा असलेले स्टॉक्स बाह्य अस्थिरतेने कमी प्रभावित मानले जातात आणि त्याउलट कमी बीटा सूचित करतो की फंडाची कामगिरी बेंचमार्कपेक्षा



**अश्विन पटनी**
**प्रमुख उत्पादने आणि पर्याय, क्विसस एएमसी**

कमी विचलित होऊ शकते, संभाव्यतः काही स्थिरता देऊ शकते. त्यामुळे गुंतवणूकदारांनी पोर्टफोलिओच्या एकूण बीटाचा विचार करणे आवश्यक आहे ते निर्धारित करण्यासाठी योजनेचा विमोचन करताना किती परिणाम होईल. पोर्टफोलिओच्या होल्डिंग्समधील जोखीम समजून घेण्यासाठी किंमत-ते-कमाई गुणोत्तर (पीई गुणोत्तर) विचारात घेण्यासारखे आणखी एक पैलू आहे.

■ दीर्घकालीन ट्रेंड समजून घ्या : फक्त ताज्या तणाव टेस्ट निकालांवर लक्ष केंद्रित करू नका. कालांतराने तरलता कशी बदलली याचे विश्लेषण करा. तरलता सतत खालावत राहिल्यास आज चांगली वाटणारी संख्या कदाचित खरी ठरणार नाही.

■ एकाग्रता पातळी : उच्च किंवा वाढत्या गुंतवणूकदारांच्या एकाग्रतेमध्ये विविध जोखीम घटक निर्माण करण्याची क्षमता असते. पुढे, फंडाचा महत्त्वपूर्ण भाग धारण करणाऱ्या गुंतवणूकदारांच्या कमी संख्येमुळे तरलतेवर परिणाम होऊ शकतो. जर काही मोठ्या गुंतवणूकदारांनी त्यांच्या युनिट्सची पूर्तता केली तर ते एक वेगळा परिणाम निर्माण करू शकतात. गुंतवणूकदारांनी लार्ज कॅप समभागांमध्ये रोख होल्डिंगसह या पैलूचा विचार करणे अत्यावश्यक आहे. याव्यतिरिक्त, फंडाची जोखीम घेण्याची आणि कमी करण्याची क्षमता समजून घेण्यासाठी फंडाने बाजारातील उतारादरम्यान कशी कामगिरी केली हे समजून घेणेदेखील महत्त्वाचे आहे.

**गुंतवणूकदारांसाठी महत्त्वाचे उपाय**

स्मॉल आणि मिड-कॅप फंडाच्या तरलता आणि जोखीम प्रोफाइलचे मूल्यांकन करण्यासाठी स्ट्रेस टेस्ट हे एक मौल्यवान साधन आहे, हे गुंतवणूकदारांनी समजून घेतले पाहिजे. इतर संबंधित डेटा पॉइंट्ससह स्ट्रेस टेस्टचे निकाल समजून घेऊन, गुंतवणूकदार त्यांच्या स्मॉल आणि मिड-कॅप म्युच्युअल फंड गुंतवणुकीबद्दल माहितीपूर्ण निर्णय घेऊ शकतात. शिवाय, स्ट्रेस टेस्ट हा एक वेळचा उपाय नाही. -चडी ते त्यांच्या दीर्घकालीन जोखीम व्यवस्थापन धोरणांमध्ये समाविष्ट करत आहेत आणि ते या चाचण्यांचे सतत निरीक्षण करतील आणि आवश्यकतेनुसार त्यांची धोरणे तयार करतील. असे म्हटले जाते की, केवळ हेडलाइन नंबरच्या पलीकडे पाहण्याची आणि जोखीम असलेल्या परताव्याचे लक्ष्य ठेवण्यासाठी वर नमूद केलेल्या पॅरामीटर्सचा विचार करण्याची जबाबदारी गुंतवणूकदारांवर आहे. फंडाची खरी तरलता आणि बाजारातील वादळांना तोंड देण्याच्या क्षमतेचे मूल्यांकन करण्यासाठी सर्वांगीण दृष्टिकोन स्वीकारणे अत्यावश्यक आहे. बाजारातील चढउतारांना बळी पडणे सोपे आहे, परंतु वैयक्तिक जोखीम सहन करण्याची क्षमता आणि गुंतवणुकीच्या उद्दिष्टांशी जुळणारे अधिक विवेकपूर्ण गुंतवणूक निर्णय घेणे ही कल्पना आहे.

लोकसभा निवडणूक २०२४ • गांवकरी
महासंग्राम
■ शनिवार, दि. २७ एप्रिल २०२४







# दुसऱ्या टप्प्यातील मतदानाची क्षणचित्रे



## आमदार बच्चू कडू यांनी सपत्नीक बजावला मतदानाचा हक्क

**अमरावती :** प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांनी काल आपल्या बिलोरा या गावी पत्नी नयना कडूंसह मतदानाचा हक्क बजावला. अमरावती लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने उमेदवार देण्यात आला आहे. दिनेश बूब प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने निवडणुकीच्या रिंगणात आहेत.



## मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी मतदानाचा हक्क बजावला

**जालना :** मतदान करताना आपली लेकरं डोळ्यासमोर ठेवा. पाडण्यात खूप मोठा विजय, यावेळेस पाडणारे बना, आपण कुठला उमेदवार दिला नाही, कुणाला पाठिंबा दिला नाही, मराठा आरक्षण कायद्याची अंमलबजावणी न केल्यास विधानसभेची तयारी सुरू केली. विधानसभेपर्यंत आरक्षण न दिल्यास समाजाला मार्ग देणार, असे यावेळी जरांगे यांनी सांगितले.



## आधी मतदान मग लग्न

मतदानाकरिता नवरदेवाची मोटारसायकल राइड
बुलढाण्यातील हिवरखेड येथील अमर विश्वनाथ बावणे यांचा काल शुभविवाह असताना त्यांनी मतदानासाठी मतदान केंद्र गाठलं.



वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी पत्नी प्रा. अंजलीताई आंबेडकर यांच्यासह अकोल्यात मतदानाचा हक्क बजावला.



## काँग्रेस उमेदवार वसंत चव्हाण यांचे औक्षण

नांदेड : लोकसभेचे काँग्रेसचे उमेदवार वसंत चव्हाण यांचं त्यांच्या नायगाव येथील निवासस्थानी मुलगी, सून, पत्नी आणि परिवारातील महिलांनी औक्षण केले. औक्षण करून वसंत चव्हाण मतदान करण्यासाठी रवाना झाले. मतदान करून ते मतदारसंघात दिवसभर फिरणार आहेत.



मतदान केल्यानंतर खूण दाखवताना नवनीत राणा.




मतदानाचा हक्क बजावताना प्रताप जाधव.

## आखाडा

### मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी त्र्यंबकला जनजागृती



**त्र्यंबकेश्वर : प्रतिनिधी**

मतदान जागृती होऊन मतदानाचा टक्का वाढण्यासाठी त्र्यंबकेश्वर नगर परिषद कार्यालयात, मुख्याधिकारी तथा प्रशासक त्र्यंबक नगरपरिषद यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मतदान जनजागृती बैठकीत त्र्यंबक नगरपरिषद हद्दीतील हॉटेल मालक, रसावंतीगृह मालक, सलून पार्लर, व्यापारी व नगरपरिषद गाळाधारक यांची यांनी शहरातील मतदान टक्केवारी वाढवण्यासाठी दिनांक २० मे रोजी मतदान करणाऱ्या नागरिकांना आकर्षक सूट देण्यात यावी, असे आवाहन केले आहे. तसेच आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने केंद्र शासनाकडून जास्तीत जास्त सहकार्य मिळण्यासाठी आपल्या मतदारसंघातील खासदार यांची निवड करून आपल्या मागण्या केंद्र शासनापर्यंत पोहोचवण्यासाठी मोठ्या प्रमाणात मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.खासदारांच्या निवडीत आपला सहभाग मोठा असावा, असे आवाहन करण्यात आले. या वेळेस उपस्थित हॉटेल मालक, रसावंतीगृह मालक, सलून पार्लर, व्यापारी व नगरपरिषद गाळाधारकांनी सकारात्मक प्रतिसात दिला. नगरपरिषद कार्यालयाच्या वतीने मतदान जनजागृतीकरिता स्टिकर वाटप करण्यात आले आहे. मतदान जागृतीसाठी मंगळवारचा आठवडे बाजार, देवदेवतांच्या यात्रा व महाप्रसाद भंडारा, लग्नसमारंभ या ठिकाणी नगरपरिषद अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित राहतात व मतदानाचा टक्का वाढवावा यासाठी प्रबोधन करत आहेत. त्यासोबत बहुरूपी, वासुदेव, कलापथक, नाट्यपथक यासह लोककलावंत यांची मदत घेऊन जनजागृती सुरू करण्यात आली आहे.

## शालजोडे

**उमेदवारांची माहिती, संपत्तीचे विवरण
असते धक्कादायक आणि विलक्षण !
मातब्बर उमेदवार, नवकोट नारायण
दलबदलू, दादा-भाई, शिक्षणाने साधारण
नोकरी, व्यवसाय नाही फक्त राजकारण धंदा
तरी पैसाअडका जमीनजुमला,
सोने-नाण्याचा बंदा!
घराणेशाहीने वारसदारा वतन आंदण
प्रौढ लोकशाहीचे असे अवमूल्यन!**

■ विजय भदाणे

# मंगलसूत्रच्या मुद्यातून भाजपाकडून महिलांचा अपमान

## आकाश छाजेड यांची पत्रकार परिषदेत टीका

**नाशिक : प्रतिनिधी**

भाजपाचा पराभव दिसू लागल्यामुळे विकासाचा मुद्दा पुढे न आणता धर्म तसेच मंगळसूत्र असे विषय घेऊन महिलांचा अपमान करत जनतेची दिशाभूल करण्याचे काम भारतीय जनता पक्षाकडून होत असल्याची टीका नाशिक शहर काँग्रेसचे अध्यक्ष आकाश छाजेड यांनी काल काँग्रेस कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली.

भाजपा नेते माधव भंडारी यांनी नाशिकमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत काँग्रेसचा जाहीरनामा म्हणजे मुस्लिम लीगचा जाहीरनामा असल्याची टीका केली होती. त्यावर उत्तर देण्यासाठी नाशिक काँग्रेसने काल पत्रकार परिषद घेत भाजपावर चांगलीच टीका केली असून, शहरात स्मार्ट सिटी योजनेत मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला. देशातील महिलांचा अपमान सातत्याने भारतीय जनता पक्षाकडून होतो आहे. भाजपाच्या नेते नाशिक शहरामध्ये येऊन बेताल वक्तव्य करतात, त्यांचा काँग्रेस पक्षातर्फे निषेध करत असल्याचे छाजेड म्हणाले.

काँग्रेसच्या वचननाम्यामध्ये महिलांची सुरक्षा तसेच महालक्ष्मी महिला योजनेच्या निमित्ताने महिलांना सुरक्षित उत्पन्न या देशातील बेरोजगार तरुणांना हाताला काम शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव व जातनिहाय जनगणना व्हावी, असे विविध मुद्दे घेऊन काँग्रेस पक्षाचा वचननामा लोकांसमोर ठेवलेला आहे. स्वतःच्या जाहीरनामा याबद्दल न बोलता कुठलाही विकासाचा मुद्दा डोळ्यासमोर नसल्यामुळे काँग्रेस पक्षाच्या वचननाम्याबद्दल बोलण्याची वाईट परिस्थिती भाजप नेत्यांवर आली. भाजपला पराभव डोळ्यासमोर दिसत असल्याने बेताल वक्तव्य करण्यात येत असल्याचे छाजेड म्हणाले.

या पत्रकार परिषदेला काँग्रेस नाशिक शहर प्रवक्ते राजेंद्र बागूल, माजी सभागृहनेते सुभाष देवरे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हास सातभाई, नाशिक शहर सेवा दलाचे अध्यक्ष डॉ. वसंत ठाकूर, नाशिक शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष स्वप्निल पाटील, नाशिक जिल्हा एनएसयूआयचे अध्यक्ष अल्तमश शेख, नाशिक शहर अनुसूचित जमाती विभागाचे अध्यक्ष संतोष ठाकूर, नवीन नाशिक ब्लॉक काँग्रेसचे अध्यक्ष विजय पाटील, शहर प्रवक्ते जावेद इब्राहिम, शहर कार्यालय सरचिटणीस राजकुमार जेफ, रामकिशन चव्हाण, सिद्धार्थ गांगुर्डे, प्रथमेश वर्दे, संतोष हिवाळे आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**नाशिक : पत्रकार परिषदेत आकाश छाजेड, राजेंद्र बागूल, उल्हास सातभाई, वसंत ठाकूर, संतोष ठाकूर.**

### बाळासाहेब थोरात राहणार उपस्थित

सोमवार दि. २९ रोजी महाविकास आघाडीचे नाशिकचे उमेदवार राजाभाऊ वाजे आणि दिंडोरीचे उमेदवार भास्कर भगरे निवडणूक अर्ज दाखल करणार आहेत. त्यावेळी काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात उपस्थित राहणार आहेत. अर्ज दाखल झाल्यानंतरच शहरातील महाविकास आघाडीच्या वतीने प्रचारसभांचे नियोजन करण्यात येणार आहे.

### स्थानिक मुद्यावर आधारित प्रचार

महानगरपालिकेतील भ्रष्टाचार, स्मार्ट सिटीतील भ्रष्टाचार यांसह शहरातील गुन्हेगारी आणि ड्रग्जमाफिया यावर काँग्रेसकडून प्रचारात प्रकाश टाकण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

# तुतारीच्या नामसाधर्म्याने राष्ट्रवादीसमोर अडचणी

**नाशिक : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या फाटाफुटीनंतर शरद पवार गटाला निवडणूक आयोगाने तुतारी फुंकणारा माणूस ही निशाणी दिली आहे. परंतु आता निवडणूक आयोगाचे जे १९० चिन्हे आहेत. त्यात तुतारी नामसाधर्म्य असलेले आणखी एक तुतारी चिन्ह असल्याने राष्ट्रवादी शरद पवार गटासमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अजित पवार गट बाहेर पडल्याने फूट पडली. त्यानंतर निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व चिन्ह अजित पवार यांना दिला. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला निवडणूक आयोगाने तुतारी हे चिन्ह दिले. यंदाची लोकसभा निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट तुतारी फुंकणारा मनुष्य या चिन्हावर लढणार आहे. जिल्ह्यातील दिंडोरी लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे भगरे यांना या चिन्हावर




निवडणूक लढवावी लागणार आहे. मात्र, निवडणूक आयोगाने अकरा प्रमुख राजकीय पक्षांसाठी चिन्ह निश्चित करून दिले आहे. त्यासह अपक्ष उमेदवारांसाठी १९० वेगवेगळे चिन्ह जिल्हा निवडणूक विभागाला दिले. अपक्ष उमेदवारांना त्यांच्या मागणीनुसार चिन्ह देण्यात येतात. निवडणूक आयोगाच्या यादीत १७४ क्रमांकावर तुतारी हे चिन्ह आहे. त्याचे मराठी भाषांतर हे तुतारी करण्यात आले आहे. दोन्ही चिन्हांमध्ये साधर्म्य नाही, मात्र तुतारी या शब्दात साधर्म्य असल्याने राष्ट्रवादीने आक्षेप घेतला.

# रक्षा खडसे यांच्या मालमत्तेत पाच वर्षांत साडेसात कोटींनी वाढ



**जळगाव :**

महायुतीच्या रावेर मतदारसंघातील भाजपच्या उमेदवार खासदार रक्षा खडसे यांच्याकडे २४ कोटी ९२ लाख तीन हजार ८३५ रुपयांची मालमत्ता असून, पाच वर्षांत साडेसात कोटींनी मालमत्ता वाढली आहे. त्यांच्यावर रुपये ७७, ३६,३८१ एकूण कर्ज असून, त्यात सासरे एकनाथ खडसे यांच्या २३ लाख रुपयांचा समावेश आहे. रक्षा खडसे यांनी दाखल केलेल्या उमेदवारी अर्जात मालमत्तेचे विवरण दिले आहे. शेती आणि व्यापार हे त्यांचे उत्पन्नाचे साधन आहे. २०१९ लोकसभा निवडणुकीवेळी त्यांनी १७ कोटी २७ लाख १३ हजार ७३४ रुपयांची मालमत्ता दाखविली होती.

त्यावेळच्या प्रतिज्ञापत्रात खासदार खडसेंकडे कॅप्टिव्हा मोटार, स्वराज ट्रॅक्टर, फोर्ड इंदेवहार मोटार, तसेच सुमारे सहा लाख ५४ हजारांचे दागिन्यांची नोंद होती. यावेळच्या प्रतिज्ञापत्रात खडसेंनी २०२२-२३ वर्षाचे उत्पन्न ८९,५३,३९० रुपये दाखविले असून, कन्या क्रिषिका आणि मुलगा गुरुनाथ यांच्या नावे असलेली मालमत्ता, रोकड व इतर बाबींचाही उल्लेख आहे. शेतजमीन, खुले भूखंड व इतर मालमत्ता जिल्ह्यातील मुक्ताईनगरसह पिंप्रीअकाराऊत, घोडसगाव, हरताळे (ता. मुक्ताईनगर), बोहर्डी (ता. भुसावळ), मानपूर (ता. भुसावळ), कोचरा (ता. शहादा, नंदुरबार), वाकोडी (ता. मलकापूर, जि. बुलडाणा) येथे शेतजमिनी असून, मुक्ताईनगर, कोथळी, सातोड येथे बिगरशेती जमिनी, तसेच खुले भूखंड आहेत. मुक्ताईनगर येथे पेट्रोलपंप, जळगावसह पवई (मुंबई) येथे निवासी इमारती (बाजारमूल्य- रुपये ३,७४, ५३, ५००) असून, कन्या क्रिषिका (रु.२,०९,५४,६००) आणि मुलगा गुरुनाथ (रु.२,०९,५४,५००) यांच्या नावेही मालमत्ता आहेत.

# निवडणुकीत दारूचा महापूर

## अडीच कोटींचा मद्यसाठा जप्त

**नाशिक : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून जिल्ह्यात आतापर्यंत पोलीस, उत्पादन शुल्क विभागाने सुमारे साडेपाच कोटींचा अवैध मद्यसाठा, अमली पदार्थांसह इतर सामग्री जप्त करण्यात आली आहे. यात दोन कोटी ४५ लाखांची दारू तर २४ लाख ५४ हजार रुपयांच्या अमली पदार्थांचा समावेश आहे.



निवडणूक काळात मतदारांना प्रलोभन दाखविण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब केला जातो. या काळात मद्याचा महापूर वाहत असल्याचा अनुभव आहे. या पार्श्वभूमीवर, मद्याची अवैध वाहतूक व अमली पदार्थ विक्रीवर यंत्रणांकडून काटेकोरपणे लक्ष दिले जात आहे. लोकसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर १६ मार्च रोजी आचारसंहिता लागू झाली. तेव्हापासून आतापर्यंत विविध यंत्रणांनी केलेल्या कारवाईची माहिती जिल्हा निवडणूक शाखेने अहवालातून दिली आहे. त्यानुसार या काळात एक कोटी ७१ हजार ६६३ लिटर मद्यसाठा जप्त करण्यात आला. त्याची किंमत सुमारे अडीच कोटीच्या घरात आहे. इगतपुरी तालुक्यात मोठ्या प्रमाणात मद्यसाठा पकडण्यात आला. नाशिक पश्चिम व नाशिक मध्य विधानसभा क्षेत्रात हे प्रमाण सर्वांत कमी आहे. त्याचवेळी एक लाख १७ हजार ग्रॅम विविध प्रकारचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. त्याची किंमत २५ लाखांच्या आसपास आहे. याच काळात दोन कोटी ७१ लाख रुपये किमतीची अन्य सामग्री जप्त करण्यात आली. आचारसंहिता लागू झाल्यापासून पाच कोटी ४१ लाख रुपयांचा अवैध मद्य व अमली पदार्थांचा साठा जप्त करण्यात आल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांनी दिली.